नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

# निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.


वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.**

**सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.**

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका




अनुक्रमणिका

# *अनुक्रमणिका*

या वर्षीची दिवाळी आणि पुढील वर्ष
'युगवाणी'चे लेखक, वाचक, वि. सा. संघाचे सदस्य,
साहित्यिक, साहित्यप्रेमी आणि समस्त मराठी जनतेला
आनंदाचे व सुखासमाधानाचे जावो, ही शुभकामना

**राम शेवाळकर**
अध्यक्ष,
वि. सा. संघ, नागपूर

अनुक्रमणिका

युगवाणीच्या संपादकपदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून आजवर वाचक-लेखकांना संबोधून आपले मनोगत व्यक्त करण्याचा मोह आवरला होता. युगवाणी अधिकाधिक सकस करण्याचा प्रयत्न मात्र मनोमन होता. दिवाळीच्या प्रकाशपर्वावर आपणही थोडेसे लिहावे असे वाटले, म्हणून हा लेखनप्रपंच.

मराठी साहित्यात समृद्ध भर पडत आहे काय ? असा प्रश्न गेल्या काही वर्षांपासून मनात आहे. गेल्या काही दिवसापासून तर तो अधिक तीव्रपणे जाणवतो आहे. सत्यकथा बंद झाल्यानंतर मराठी वाङ्मयाचे प्रतिबिंब धारण करणारे वाङ्मयीन नियतकालिक उरले नाही. आर्थिक ओढाताणीमुळे अनेक वाङ्मयीन योजना आणि संकल्पही थिटे पडू लागले आहेत. अशा स्थितीत वि. सा. संघ आणि युगवाणीने लेखक आणि वाङ्मयप्रेमींना व्यासपीठ देण्याचा संकल्प केला आणि डिंडिम न करता प्रयत्न सुरू केले. आज युगवाणी महाराष्ट्रातील चार हजाराहून अधिक घरी पोहचते. मराठीतील कोणत्याही वाङ्मयीन नियतकालिकाला एवढी प्रसारसंख्या क्वचितच लाभली असेल.

युगवाणीकडे येणाऱ्या ललित लेखनाचे प्रमाण बरेच वाढले आहे. समीक्षा, संशोधनासोबतच कथा, कविता आणि ललित लेखही आवर्जून युगवाणीकडे येऊ लागले आहेत. नव्याजुन्या लेखकांना युगवाणीत अगत्याने लिहावे, असे वाटू लागले आहे, ही अर्थातच फार आनंदाची बाब आहे. पण हे सारे साहित्य नजरेखालून घालताना तळपणारी, दाहक अशी एखादी ओळ, व्यक्तिरेखा, एखादा प्रसंग, एखादा विचार सापडतो का, याचा शोध घेण्याचा आमचा गंभीर प्रयत्न आहे. संपादकाच्या व्यक्तिगत आवडीनिवडी आणि वाङ्मयीन मूल्यनिष्ठा हा भाग लेखकांना न्याय देताना अडसर ठरू नये, याचीही दक्षता आहे. पण अनेकदा व्यथित व्हायला होते. सकस आणि महत्त्वाचे लेखन होतच नाही, असे नाही. पण त्याचे प्रमाण फार कमी आहे, असे प्रकर्षाने जाणवू लागले आहे.

असे का व्हावे ? लेखणी सिद्धहस्त झाली नसेल तर प्रभावी अभिव्यक्तीचा थोडा प्रश्न असतो. पण तरी अनुभवाचे, विचाराचे अस्सलपण जाणवायला नको का ? विशेषतः नव्या लेखकांच्या बाबतीत हा विचार मनात येतो. नामांकित लेखकांचा प्रश्न आणखी वेगळा. लेखनाच्या सततचक्रात त्यांचे व्यक्तिमत्त्व हरवून जाते की काय, अशी भीती असते. त्यांच्या लेखनाच्या गांभीर्याचाही प्रश्न असतोच. अनुभवांना अभ्यास, वाचनाची, साहित्याच्या व जीवनाच्या प्रवाहात झोकून देण्याच्या वृत्तीची जोड मिळाली तर अभिव्यक्ती केवढी सशक्त होऊन जाईल !


प्रतिभावंताच्या निर्मितीत होणारी पुनरावृत्ती हीही चिंताजनक बाब आहे. नवलेखकांना अनुकरणाची कुबडी स्वीकारण्याचा मोह का व्हावा ? मळलेल्या म्हणून आपण ज्या पायवाटा स्वीकारतो, त्या वाङ्मयीन संपन्नतेच्या दिशेनेच जातात, असे हमखास सांगता येत नाही. त्यामुळे तर अनुकरणवृत्ती अधिकच आत्मघातकी ठरू शकते. "आपण चालू ती वाट आणि आपण जाऊ ती दिशा" असा निर्धार आणि विश्वास दर्शविणाऱ्या साहित्याचा शोध लागला पाहिजे. डोळे थोडे उघडे ठेवून आजूबाजूला पाहिले तर कित्येक 'अस्पर्श' विषय दिसतात. त्यावर जबरदस्त लिखाण शक्य आहे. चित्रपटगृहाचा डोकरकीपर, उंच इमारती बांधणारा गवंडी, पाठीवर मूल बांधून दगड फोडणारी बाई, खोल खाणीतले आयुष्य किंवा सेवायोजन कार्यालयाच्या रांगेतील तरुण हे आजच्या ललित लिखाणाचे विषय का होऊ नयेत ? ह्याशिवाय असेच कितीतरी नाट्यमय, जिवंत आणि आव्हान देणारे विषय सहज गवसण्यासारखे आहेत. आपल्या व्यक्तिगत जीवनातले अनुभवसुद्धा तेवढ्याच प्रामाणिकपणे उतरले, तरी साहित्यात समृद्ध भर घालणारे लेखन गवसू शकेल.

यापूर्वी वाचाच नसलेले कित्येक आता लिहूबोलू लागले आहेत. त्यांचे साहित्य मराठीला नवचैतन्य देणारे ठरू शकते. पण अहंकार, अभिनिवेश आणि विकृत मार्गदर्शनामुळे असे कित्येक दमदार लेखक वाया चालले आहेत, हे बघून कमालीचा क्लेश वाटतो.

मराठी साहित्यात समृद्ध भर घालू शकणाऱ्या लेखकांचा आणि अशा लेखनाचा शोध सुरू आहेच. त्याला वाचक-लेखकांची साथ मिळावी आणि युगवाणीच्या रूपाने उपलब्ध असलेल्या व्यासपीठाचा अर्थपूर्ण उपयोग व्हावा, अशी अपेक्षा आहे.

– प्रकाश देशपांडे

अनुक्रमणिका



# स्थानबद्ध

वसंत आवाजी डहाके



अनुक्रमणिका

इथं आल्यापासून कानांवर अखंड खिळे ठोकण्याचे आवाज. सकाळी, दुपारी, संध्याकाळी, रात्री, पहाटे. सतत. लाकूड कापणे, रंधा मारणे, घासणे. तिच्या सर्व हालचालींच्या सोबत हे आवाज. तिला स्वतंत्रपणे, मनाच्या स्तब्धतेत जगताच येत नाही.

गॅलरीच्या दाराशी खाली फरशीवर ती बसली आहे. पलीकडे असल्याच नव्या इमारती. काही वसतीसाठी तयार असलेल्या, काही होऊ घातलेल्या. अंधार पडला की कुठल्या इमारतीत माणसं राहायला आली हे दिव्यांच्या उजेडाच्या चौकोनांवरून तिला कळतं. या इमारतीमध्ये वीज अजून आलेली नाही आणि बाहेरही विजेचे खांब नुस्ते उभे आहेत, त्यांवर दिवे नाहीत. त्यामुळे काळोखात उमटणारे अंधुक उजेडाचे चौकोन, त्यापलीकडच्या माणसांच्या मूक हालचाली आणि स्तब्धतेवर ठोकले जाणारे खिळे तिच्या सोबतीला असतात.

संध्याकाळ होऊ घातली आहे. दिव्यांमध्ये तेल भरून ते पेटवले पाहिजेत. ती उठत नाही. फक्त डोळे आत खोलीकडे वळवते. अफाट पांढऱ्या भिंती, पांढरेपणाचा वास घेऊन असलेल्या. बाकी रिक्तता. खोलीत या भिंतींखेरीज काहीही नाही. काही आणावं, करावं असं तिला वाटत नाही. या मोकळ्या खोलीप्रमाणेच तीही रिक्त होऊन गेली आहे. काही दिवसांनंतर आपण चालणं, बोलणंदेखील विसरून जाऊ. असंच त्याच्या शेजारी निर्जीव पडून राहू. मग कुणीतरी येईल आणि नगरपालिकेच्या गाडीतून घेऊन जाईल.

ती दोघं अतिशय उत्साहानं इथं आली होती. कितीतरी योजना त्यांनी आखल्या होत्या. घर कसं लावायचं, सजवायचं याचे किती बेत त्यांनी केले होते. पण ते सगळं आता पक्षाघात झाल्यासारखं निरर्थक होऊन गेलं आहे.

पूर्वी तिला त्याचा अतिशय राग येत असे. तो उठत का नाही, चालत का नाही म्हणून ती संतापत असे. त्याच्यासोबत आपलं आयुष्य जखडलं आहे, याबद्दल ती स्वतःला छळत असे. त्याला असंच टाकून निघून जावं. दूर. जिथं त्याची आठवणदेखील येणार नाही.


पण ते शक्य नाही हे तिचं तिलाच समजलं. आपण कुठंही जाऊ शकत नाही. त्याच्याशिवाय जगण्याची आपली सवयच मोडली आहे आणि स्वतःसोबतच त्यानं आपल्यालाही अधू केलेलं आहे. काही दिवस ती भाजी, धान्य वगैरेसाठी थोडा काळ बाहेर जायची. पुढं तेही तिनं सोडून दिलं. तीन दिवसांनी भाजी नि आठवड्याला किराणा तिच्या घरीच पोहचू लागला.

त्याचे हातपाय चोळून देणं, त्याला भरवणं, औषधं देणं, त्याच्याजवळ बसून वाचणं किंवा नुस्तं बसणं. तो डोळे मिटून पडलेला असेल तर बाहेरच्या खोलीत चटई टाकून पडणं.

अलीकडे ती आपल्या जवळ आहे की नाही याकडेही त्याचं लक्ष नसायचं. स्वतःला सोडवून घेतल्यासारखा तो डोळे मिटूनच असायचा.

पूर्वी ती बाहेर जाऊ नये, सतत तिनं आपल्याजवळ बसावं असा तो आग्रह करायचा. काही कामासाठी तिला बाहेर जावं लागलं तर तो वाट पाहात राहायचा. त्यावेळी ती त्याच्यावर रागवायची. एक खिळलेलं शरीर दुसऱ्या हालचाल करणाऱ्या शरीरावर सत्ता गाजवीत आहे असं वाटून ती भडकायची. तो क्षीण स्वरात तिच्याविषयीची ओढ व्यक्त करायचा. त्याचे डोळे विव्हळ आणि करुण असायचे. त्यावेळी तिच्या मनात त्याच्याविषयी कोरडेपणा निर्माण होत असे. त्याच्या वळवळणाऱ्या हातावर ठेवलेल्या तिच्या हाताच्या स्पर्शात अलिप्तता असे.

ती उठली. त्याच्या खोलींच्या दाराशी जाऊन तिनं आत पाहिलं. तो संध्याकाळच्या सौम्य उजेडात डोळे मिटून पडलेला होता. आपण आलो आहोत हे कळूनही तो आता आपल्याकडे डोळे उघडून पाहात नाही. हळूहळू त्यानं स्वतःला



अनुक्रमणिका

वदलून टाकलं. त्याच्यातं आता आपल्याविषयीच केवळ नव्हे तर कशाहीविषयीची ओढ नाही.

अगदी जवळ, मस्तकात खिळे ठोकले जात आहेत.

त्याच्याकडे पाहतापाहता हातापायात खिळे ठोकलेल्या, रोड, यातनांनी भेसूर बनलेल्या ख्रिस्ताची प्रतिमा तिला दिसू लागते.

ती वळून बाहेरच्या खोलीत येते.

आता उजेड मावळून काळोख पडतो आहे.

तेल भरण्याचा नि दिवे उजळण्याचा तिला कंटाळा आला आहे.

ती गॅलरीत येते आणि समोर पाहत राहते. समोरच्या काही इमारतींमध्ये उजेड. बाकी काळोखात धूसर.

बराच वेळ काळोखात पाहत ती उभी असते. काळोख होतो, दिवे लागतात, दिव्यांच्या उजेडात जेवणी होतात, झाकपाक होते, अंथरूणं टाकली जातात, दिवे मंद होतात, शरीरं परस्परांच्या उजेडात मालवून जातात. असा दिवस संपतो. आपला दिवस सुरू होत नाही, संपतही नाही.

२

तिच्या समोरच्या इमारतीची खिडकी उजळते.

आधी नुस्ती पिवळटपांढरी भिंत. मग एक आकृती तिला दिसते.

ती कुतूहलानं त्या आकृतीकडे पाहते. चेहरा लाल आणि पांढऱ्या रंगानं रंगवलेला. अंगासरशी तंग कपडे घातले आहेत की शरीरच पिवळ्या रंगानं रंगवलेलं आहे, तिला समजत नाही. डोक्यावर केस नसावेत किंवा मग घट्ट टोप बसवला असावा.

ती आकृती त्या खिडकीसमोर खोलीच्या मध्यावर स्थिर उभी आहे. मग ती हलते. एक हात पुढे येतो. दुसरा मागे पिळल्यासारखा मुरडतो. तोंड आकांतानं वासलेलं. पण आवाज नाही. मग ती आकृती उंच उसळते. हवेत एक पाय फेकला जातो. दुसरा पाय. विलक्षण गतीनं हात! अवकाशात भराभरा शेकडो हात उगवावे तसे.

ती त्या आकृतीकडे पाहते आहे. तिच्या डोळ्यांसमोरच्या त्या खिडकीच्या चौकोनातलं चित्र सतत बदलत जाणारं.

खिळे ठोकले जाण्याचे आवाज आता मस्तकातून खाली छातीत, ओटीपोटात.

ती वेदनेनं कळवळते.

गॅलरीतून ती आत खोलीत येते. काळोख दाटला आहे.

काळोखात चाचपडत ती मेणबत्त्या शोधते.

सापडलेल्या पाचही मेणबत्त्या पेटवते. बाहेरच्या खोलीत फरशीवर मेणबत्त्या.

गॅलरीकडचे दार बंद करून घेते. काच लावलेल्या खिडक्या बंद आहेत.

खोलीत मेणबत्त्यांचा पिवळसर उजेड. मोकळ्या भिंती. अवकाश.

ती निर्वस्त्र होते. केस मोकळे सोडते.

मधोमध स्थिर उभी.

ती पक्षी आहे. तिच्या भोवती पिंजऱ्याचे गज.

ती त्वेषानं त्या गजावर धडकते. तिची चोच दुखावते.

पुनःपुन्हा ती धडका देते. तिचे पंख विस्कटतात.

मोकळे केस कपाळावर, डोळ्यांवर.

तिचं शरीर त्वेषानं ताणलेलं.

पायांच्या बोटांवर संपूर्ण शरीर तोलून धरते. मागे फेकते. पुढे झेपावते.

पिंजऱ्यात दुसरा पक्षी आलेला आहे. किंवा केव्हापासून होताच तो. खाली पडलेला. चुरगळलेला. ती चोचीनं त्याला कुरवाळते. मग अनिवार रागानं त्याच्यात चोच खुपसते.

तो पक्षी बळानं उठतो. तिच्याकडे येऊ लागतो.

त्याची पिसं फुललेली. ती हळूहळू मागे सरते.

मग पुढे येऊ लागते. चोचीत चोच. पंखांत पंख.

अचानक तो पक्षी कोसळतो.

ती एकटीच एका लयींत. मागंपुढं.

तिचे डोळे तजेलदार. चेहरा झळाळून गेलेला.

क्षणभरानं तिचं शरीर पिळलं जातं. ती खाली कोसळते.


काही काळानंतर बाहेरचं दार ठोठावलं जातं.

ती उठत नाही.

पडूनच राहते.

आता मांड्यांमध्ये खिळे ठोकले जात आहेत.

□ □



## प्रतिसृष्टी

ना. वा. ठेंगडी

मला नेहमी असे वाटते की, इतिहासात थोर म्हणून गाजून गेलेल्या व्यक्तींबद्दल ज्या आख्यायिका प्रचलित होतात, त्यांच्यावरून मानवी मनाची उकल करण्याचा प्रयत्न करावा. पुष्कळदा अशा आख्यायिकांना इतिहासात आधार नसतो. आपण असे धरून चालू या की त्या खोट्या असतात. तरीसुद्धा त्या वर्षानुवर्षे चालत आलेल्या

असतात. ज्याअर्थी त्या मनुष्याला सोडाव्याशा वाटत नाहीत, त्याअर्थी मानवी मनाला अन् बुद्धीला पटणारे असे त्यात काहीतरी असले पाहिजे. मानवी कहाणी म्हणून त्याचे मूल्य जबरदस्त असले पाहिजे. इतिहासात होऊन गेलेला आणि वास्तव घटना जगून गेलेला नायक एकीकडे आणि हा आख्यायिकांमधील नायक एकीकडे अशी जर रचना आपण करतो म्हटले तर एक मोठे मनोज्ञ चित्र निर्माण होते. वास्तवात होऊन गेलेला नायक अत्यंत कठोर निर्णय घेणारा नेता असतो, पराक्रमी लढवय्या असतो, शत्रूचा कर्दनकाळ असतो. प्रसंगी त्याने अत्यंत क्रूर कृत्येही पार पाडलेली असतात. परंतु आख्यायिकांमधून त्याच्या खाजगी जीवनातले जे बारकावे सांगितले गेले असतात, ते या जीवन-दर्शनापेक्षा फार निराळे जीवनदर्शन घडवितात. आख्यायिकांमधून आलेले खाजगी जीवन एका विशिष्ट क्रमाने मांडून त्याची एक सुसंगत मानवी कहाणी तयार करण्याचा प्रयत्न करावा. आपल्या असे लक्षात येते की, मानवी कथा म्हणून तिचे मूल्य फार मोठे ठरते. इतिहासात वास्तवात जगून गेलेला नायक आणि आख्यायिकांमधून कल्पना-सृष्टीत रंगविला गेलेला नायक असे दोन नायक आपल्या डोळ्यांपुढे एकाच वेळी उभे राहतात. त्यांच्यात नेमकी संगती काय असते, कोण जाणे; पण हे दोन नायक एकमेकांशी विसंगत वाटत नाहीत. इतिहासातल्या वास्तवाला आधार देणारी आणि त्याला पूरक ठरणारी कल्पनेतली एक प्रतिसृष्टी आपल्यापुढे उभी असते. या प्रतिसृष्टी-तून ऐतिहासिक वास्तव घटनांचे अर्थ लावणे ही एक मोठी गंमत असते. इतिहास साऱ्यांना माहीत असतो व तो ठाम असतो. ही प्रतिसृष्टी लवचिक असते. ती लवचिकच असायला पाहिजे. लवचिक राहील, तरच तिला मानवी मनात काही स्थान राहील. लवचिक आहे म्हणूनच तिचे मानवी मनात काही स्थान आहे. खूप वास्तव वाचण्याचा किंवा ऐकण्याचा जेव्हा माणसावर ताण पडतो, तेव्हा माणसाने खुशाल या प्रतिसृष्टीकडे वळावे.

या प्रतिसृष्टीमध्ये एक मुसोलिनी आहे. त्याचे क्लेरेट्टाशी असलेले प्रेमप्रकरण इतिहासाला माहीत आहे. क्लेरेट्टा शेवटी मुसोलिनीबरोबरच मारली गेली, ही घटना एव्हाना ऐतिहासिक सत्याच्या दालनात प्रविष्ट झालेली आहे. पण मुसोलिनीची इतिहासातील खरी प्रतिमा कशी आहे ? एक क्रूर आणि जुलमी हुकूमशहा ! क्रूर, जुलमी आणि तितकाच महत्त्वाकांक्षी ! इटली या देशात आला हा. हा होऊन गेल्याला फार वर्षे झाली नाहीत, तरी त्याच्याविषयी आख्यायिका भरपूर आहेत. काही ऐकण्यात आल्या, काही वाचण्यात. फार क्रूर, फार जुलमी, फार महत्त्वाकांक्षी मुसोलिनी मनुष्याच्या मनाला पेलला नाही, म्हणूनच की काय मनुष्याने आख्यायिकांमधून मुसोलिनीची एक मानवी आकृती तयार केली. त्यात क्वचित् भित्रेपणा आहे, क्वचित् दुबळेपणा आहे, क्वचित् हळवेपणा आहे, क्वचित् वैतागही आहे. क्लेरेट्टा-बद्दल तो फार हळवा असल्याच्या कथा आहेत. त्याच्या लहानपणी तो फार दुबळा आणि भित्रा होता, असे सांगितले जाते. एक प्रसंग सांगतात, तो असा की, लहानपणी खेळताना एका मित्राने त्याला मारले. तो रडत घरी आला. त्याचे वडील म्हणाले,, "असा रडत घरी काय येतोस भागुबाई-सारखा ? त्याने तुला मारले, तर तू उलट त्याला नाही मारायचेस ? घे हा धोंडा आणि घाल त्या मुलाच्या डोक्यात." लहानपणचा तो दुबळेपणा अन् भित्रेपणा टाकून मुसोलिनी जो पुढे अत्यंत निडर आणि आक्रमक बनला, तो याच प्रसंगातून अशी आमची आख्यायिकांमधली प्रतिसृष्टी आम्हाला सांगते.

मुसोलिनी पुढे ज्या हुकूमशाही वृत्तीचा बनला, त्या वृत्तीची बीजे त्याच्या किशोर वयातील वैतागात आहेत, असे आमची प्रतिसृष्टी आम्हाला सांगते. किशोर वयात लहान गावातले घर सोडून तो एका शहरात पोटापाण्याचा धंदा करण्याकरिता आला. कुटुंबातली गरिबी म्हणून त्याला असे घर सोडून शहरात यावे लागले. परंतु शहरात त्याला धंदाही मिळेना आणि नोकरीही मिळेना. नुसतीच भटकन्ती. लोकांकडून उपेक्षा, अवहेलना आणि हिडिसफिडिस. खायला काय ? तर कधीमधी पाव ! झोपायला ? एका दुकानाच्या समोरच्या लाकडी फळ्या ! तो दुकानदार दुकानाला कुलूप लावून घरी गेला की या किशोर मुसोलिनीने

दुकानासमोरच्या फळचांवर आपले वस्तानं मांडा-यचे. झोपायला कितीही उशीर होवो, उठायचे मात्र तो दुकानदार अगदी सकाळी दुकान उघडा-यला येण्याच्या आधी. हो, म्हणजे एखादवेळी त्या दुकानदाराच्या दृष्टीस पडलो, तर झोपण्याची ही हक्काची जागाही जायची ! आमच्या प्रति-सृष्टीमध्ये मुसोलिनीचे त्याच्या आईला अत्यंत वैतागाने अन् उद्वेगाने लिहिलेले एक पत्र आहे. त्याने ही सारी हकीकत आपल्या आईला कळवि-लेली आहे. इतिहासाने जो वास्तवातला म्हणून मुसोलिनी रंगविला आहे, त्याच्याशी प्रतिसृष्टीतील या घटना विसंगत तर ठरत नाहीतच, परंतु त्या अत्यंत सुसंगत ठरतात. किशोरवयात आलेल्या या अनुभवांमधूनच जगाविषयीचा कडवटपणा त्याच्या मनात निर्माण झाला असला पाहिजे आणि त्यातूनच पुढे तो एक निर्मम आणि बेदर-कार असा हुकूमशहा झाला असला पाहिजे, अशी एक तर्कसंगती आपण लावू शकतो की नाही ? सहज लावू शकतो. वास्तव सृष्टीचे आणि प्रति-सृष्टीचे हे असे मोठे मजेदार नाते असते. क्लेरेट्टा मुसोलिनीवर भाळली यात आपल्याला नवल वाटू नये, अशी एक कहाणी आख्यायिकेच्या स्वरूपात आमच्यापुढे आहे. मुसोलिनी तरुणपणी अतिशय देखणा होता. देखणा अन् तेजस्वी. त्याचे एक वलय निर्माण झाले होते. हे वलय किती मोठे होते, याचे वास्तवात घडलेले एक उदाहरण सांगतो. महात्मा गांधी युरोपमधून प्रवास करीत होते. प्रवासात इटलीमधून जाण्याचा योग आला. इटलीमध्ये जे काही दिसले, त्यासंबंधीच्या आपल्या प्रतिक्रिया गांधीजींनी रोमा रोलाँला पत्र पाठवून कळविल्या. त्यात मुसोलिनीची केवढी स्तुती आहे ! अहिंसेचा शांत, सोज्वळ पुजारी म्हणून इतिहासाने पुढे ज्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले, ते गांधीजी, पुढे अत्यंत क्रूर हुकूमशहा ठरलेल्या मुसोलिनीची एका दिपविणाऱ्या क्षणी स्तुती करून गेले. तर मूळ मुद्दा असा की, मुसोलिनीचे तरुणपणी एक लखलखणारे वलय होते. देखणेपणा, शौर्याच्या कहाण्या आणि वलय मिळून तरुणपणचा एक मुसोलिनी होता. प्रतिसृष्टीमध्ये अशी एक कथा सांगतात की, एका कमी उंचीच्या पुलावर मुसोलिनी लष्करी गणवेशात उभा आहे, पुलाच्या खाली पाण्याचा प्रवाह वाहतो आहे, पाण्यात मासोळ्या आहेत आणि पुलाच्या कठड्यावरून वाकून मुसोलिनी हातातल्या लांब काठीने एका मासळीशी खेळत आहे, असे त्याचे एक चित्र त्या काळात फार प्रचलित होते. इटलीमधल्या प्रत्येक नवयौवनेने सामानाने भरलेल्या आपल्या ट्रंकेच्या तळाशी अगदी खोल हे चित्र जिवाभावाने जपून ठेवले होते! केवढी रोमँटिक कल्पना आहे ! मुसोलिनीच्या एकूण क्रूर प्रतिमेशी विसंगत वाटणारी आहे खरी; परंतु जगाने मान्य केलेल्या क्लेरेट्टा–मुसोलिनी प्रकरणाशी पूर्ण सुसंगत अशी ही कल्पना आहे. मुसोलिनीच्या प्रतिसृष्टीमधल्या या कथा रोमहर्षक वाटतात ना ? पण ही रोमहर्षकता येथेच थांबत नाही. पुढे रोमहर्षकतेने अगदी कळस गाठला आहे. मुसोलिनी अजून सत्तेवर यावयाचा आहे. सत्ता नजरेच्या टप्प्यात नाही, यावद्दल त्याची जवळजवळ खात्रीच झालेली आहे. तो अगदी आरामात आपल्या काही सहकाऱ्यांशी गप्पागोष्टी करीत बसला आहे. गप्पा रंगल्या आहेत. तेवढ्यात एक निरोप्या येतो आणि मुसोलिनीला वाकून प्रणाम करतो. म्हणतो, "इटलीचे मंत्रिमंडळ बनविण्याकरिता आपल्याला बोलावले आहे." जीवनातली ही केवढी प्रचंड उलथापालथ ! ध्यानीमनी नसताना अचानक आलेले मंत्रिमंडळ बनविण्याचे निमंत्रण ! कोणाच्याही जीवनात याहून जास्त रोमहर्षक क्षण असू शकेल काय ?

अशी ही आमची प्रतिसृष्टी. हिच्यात एक टॉल्स्टॉय आहे. रशियातला जगप्रसिद्ध लेखक. महान् कादंबरीकार. पण त्याचे व्यक्तिगत जीवन कसे होते ? त्याचे बायकोशी पटत नव्हते. म्हणजे पटवून घ्यायचा तो कसोशीने प्रयत्न करायचा; परंतु ती आपली सदैव भांडायलाच तयार. टॉल्-स्टॉयच्या म्हातारवयापर्यंत हे असंच चाललं होतं. टॉल्स्टॉय उबगला. एका मध्यरात्री गुपचुप घरातून बाहेर पडला. जख्ख म्हातारा होता आणि तशात आजारीही होता. अंग तापानं फणफणलेलं होतं. अडखळत, पडतझडत त्यानं स्टेशन गाठलं. एका लहानशा गावाचं ते स्टेशन. तशात मध्य-रात्र. गर्दी तर नव्हतीच, पण त्याला ओळखणारं



अनुक्रमणिका

कुणीच नव्हतं. त्यानं आपल्या हातातली घोंगडी आपल्या अंगाभोवती लपेटली अन् एका डब्याच्या एका कोपऱ्यात अंगाचं मुटकुळं करून बसला. तिथंच झोपला. तिकीट तपासणारा आला. त्यानं टॉलस्टॉयला उठवलं. "तू कोण?" म्हणून विचारलं. टॉलस्टॉयनं आपली माहिती सांगितली. तिकीट तपासणारा हादरला. एक जगप्रसिद्ध लेखक त्याच्या गाडीतून या अशा वेळी या अशा अवतारात प्रवास करीत होता. टॉलस्टॉयची ती विकलांग अवस्था पाहून त्यानं त्याच्या अंगाला हात लावला. अरे बापरे! भयंकर ताप!! त्यानं टॉलस्टॉयला पुढल्याच स्टेशनवर हात देऊन उतरवलं. अत्यंत आपुलकीनं अन् आस्थेनं त्या स्टेशनच्या वेटिंग रूममध्ये नेलं. तिथं स्वतः अंथरूण टाकलं अन् त्यावर टॉलस्टॉयला झोपवलं. आपण आता फार जगणार नाही, हे टॉलस्टॉयच्या लक्षात आलं. त्यानं त्या तिकिट-तपासनीसाला जवळ बोलावलं अन् आत ओढत चाललेल्या आवाजात अडखळत सांगितलं, "मी लवकरच मरणार आहे. माझं फक्त एक काम करा. मी मेलो हे माझ्या बायकोला कळवू नका. यदाकदाचित् तिला कळलंच, तरी ती येणार नाही, याची मला खात्री आहे. पण ती आलीच, तर तिला माझ्या प्रेताला हात लावू देऊ नका." अशी विचित्र मागणी आहे ही! ही कथा प्रत्यक्ष घडलेली असो किंवा नसो; परंतु या घटनेत जे कारुण्याचे पोत आहेत, ते हृदयाची काहिली करणारे आहेत. यातून अत्यंत ताकदीचे असे महाकाव्य जन्माला येऊ शकते. घटनेच्या वास्तव-अवास्तवाशी आपल्याला काहीही करावयाचे नाही; आपल्याला त्यातील भावानुभाव मनःपूर्वक जपायचा आहे.

मृत्यूच्या घटनेवरून आठवलं. नेपोलियनच्या मृत्यूची हकीकत अशीच हृदयात कालवाकालव करणारी आहे. पण कालवाकालव होते ती नेपोलियनच्या मृत्यूतील शोकात्मता लक्षात येऊन नव्हे, तर त्याच्या आईची केविलवाणी स्थिती पाहून. नेपोलियनचे मूळचे गाव म्हणजे खेडेच. तेथे त्याची म्हातारी आई आहे. आजुबाजूच्या जगाशी अत्यंत जुजबी संबंध असलेली ही म्हातारी एका झोपडीवजा घरात रहात आहे. एकटीच. आपला मुलगा फ्रान्सचा बादशहा होण्याइतपत पराक्रमी निघाला आणि जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून त्यानं त्या दिशेनं मजल मारली, हे त्या म्हातारीच्या गावीही नाही. कोणी तिला काही सांगायलाही तयार नाही. त्या खेड्यात कोणाला काही माहीत असेल, तर ना! त्या म्हातारीला एक बाकी वाटत होतं की, कधी ना कधी आपला मुलगा आपल्याला भेटायला येईल. येईलच. ती डोळ्यात प्राण आणून त्याची वाट पहात होती. त्याच्या भेटीसाठी तिनं मृत्यूला थोपवून धरलं होतं. वर्षानुवर्षं ती वाट पहात होती.

पण तिच्या आधी नेपोलियनच मेला. आणि फ्रान्सला दुःखाचा धक्का बसला. देशभरातले तरुण दुःखाने वेडेपिसे झाले आणि मिळेल त्या वाटेने नेपोलियनच्या अन्त्यदर्शनासाठी मोठमोठ्याने त्याचा जयजयकार करीत निघाले. म्हातारी ज्या खेड्यात रहात होती, त्याच्या जवळच्या शहरातीलही तरुण लोंढ्यालोंढ्यांनी निघाले. त्यांना म्हातारीचे खेडे पार करून पुढच्या शहरात जायचे होते. ते म्हातारीच्या खेड्यात आले. पायीच होते ते. त्यांच्या मुखातून नेपोलियनचा जयजयकार सतत चालला होता. म्हातारीच्या झोपडीजवळून काही तरुण चालले होते. म्हातारीने गलका ऐकला. नेपोलियनचे नावही ऐकले. म्हातारी लगबगीने बाहेर आली. तिने एका तरुणाला विचारले, "तुम्ही ज्या नेपोलियनचे नाव घेत आहात तो नेपोलियन कोण आहे?" तो माझा मुलगा तर नव्हे ना, असे वास्तविक म्हातारीला विचारायचे होते. पण तिने एकदम तशी हिंमत केली नाही. दुसरा एक तरुण एकदम समोर आला आणि म्हातारीकडे पाहून रागाने म्हणाला, "नेपोलियन कोण म्हणून विचारतेस म्हातारे तू? तुला लाज कशी वाटत नाही? सारं जग ज्या नेपोलियनला ओळखतं, त्या नेपोलियनला तू ओळखत नाहीस? फ्रान्सचा बादशहा नेपोलियन...फ्रान्सचा मानबिंदू नेपोलियन...फ्रान्सच्या तरुणांचा स्फूर्तिदाता नेपोलियन..." तिसऱ्या एकाचा म्हातारीविषयींचा संताप तर इतका अनावर झाला की, त्याने म्हातारीला ढकलून दिले. म्हातारी आपल्याच झोपडीच्या मोडक्या दाराशी जाऊन पडली. तरुणांचा घोळका पुढे निघून गेला. म्हातारी पडल्या जागेवरून नुसतीच ओरडत राहिली, "अरे

बावांनो, अरे पोरांनो...अरे जरा माझं ऐकून तर घ्या, माझ्या मुलाचंही नाव नेपोलियन आहे, म्हणून विचारलं !"

आमच्या प्रतिसृष्टीतली ही कथा काळजाला घरं पाडणारी नाही, असं कोण म्हणेल? याच नेपोलियनच्या जीवनात एक प्रेमप्रकरण घडलं. या प्रेमप्रकरणाच्या तारुण्यातल्या हकीकती प्रतिसृष्टीतही लपलेल्याच आहेत, तर मग उघड इतिहासाला त्या कुठल्या ठाऊक असणार? पण नेपोलियनची एक प्रेयसी होती म्हणतात. तो एल्बाच्या तुरुंगात असताना ती गुप्तपणे त्याला भेटायला गेली होती. तुरुंगातल्या विकल जीवनात प्रेयसीचे अचानक आगमन झालेले पाहून कोणाला काय वाटावे? सामान्य प्रतिक्रिया अशी असावी की; त्याने आनंदाने उभारून जावे. देहभान विसरून जावे. आणि तिला दृढ आलिंगन द्यावे. पण नेपोलियनच्या बाबतीत यातले काहीच घडले नाहीं. तिला पाहताच त्याने मोठ्या उत्सुकतेने अन् अधीरपणाने विचारले, "तू कोणत्या मार्गाने इथपर्यंत आलीस, ते सांग. त्याच मार्गाने मला पळून जायचे आहे." आहे की नाही गंमत ! आपला जीव धोक्यात घालून प्रेयसी याला भेटायला येते आणि अशा प्रसंगी कुठलाही प्रेमालाप करण्याचे सोडून हा तिला सरळ व्यावहारिकच प्रश्न विचारतो, "तू कोणत्या मार्गाने आलीस?" पण नेपोलियनची वास्तव इतिहासात जी प्रतिमा आहे, तिच्याशी ही घटना अजिबात विसंगत नाही. उलट, वास्तव इतिहासातल्या वास्तव नेपोलियनला या घटनेतून उठावच मिळतो.

प्रतिसृष्टीत नेपोलियनची हीच प्रेयसी पुढे तिच्या उतार वयात आलेली आहे. नेपोलियनने लग्नासाठी नकार दिलेली ही प्रेयसी नेपोलियनच्या राजवाड्यापासून दूर, राजधानीच्या शिवेवर एक लहानसे घर बांधून राहते आहे. ती उतारवयातली आहे आणि नेपोलियनही उतार वयातलाच. तरी त्याचा पीळ कायम आहे. राजधानीला शत्रूचा वेढा पडलेला आहे. लढून वेढा उठविणे अशक्य आहे. तितकी सैन्यात ताकदच उरलेली नाही. म्हणून शरण जाण्याचा तोडगा निघाला. पण शरण जाण्याच्या कल्पनेने नेपोलियन उसळला. ओरडला, "नाही: हे कदापिही शक्य नाही. मला शरण जायला जो सांगेल, त्याचे मुंडके उडवीन." आणि तो राजवाड्याच्या वरच्या मजल्यावर नंगी तलवार हातात घेऊन पिसाटासारखा येरझारा मारीत राहिल्या. प्रधानापुढे मोठा पेचप्रसंग उभा राहिला. शरणागती पत्करली नाही, तर शत्रूचे सैन्य शहरात घुसेल अन् शहर बेचिराख करून टाकेल. राज्यकर्त्या मंडळींपैकी एकतर सारे कैद होतील किंवा मारले जातील. प्रधानाने खूप विचार केला. शेवटी त्याच्या डोक्यात एक कल्पना आली. त्याने एक प्रयोग करून पाहण्याचे ठरविले. नेपोलियनची प्रेयसी जेथे रहात होती, तेथे तो गेला. त्याला नेपोलियनचे प्रेमप्रकरण माहीत होते. त्याचाच उपयोग करून घेण्याचे त्याने ठरविले होते. त्याने नेपोलियनच्या प्रेयसीला सारी परिस्थिती समजावून सांगितली. नेपोलियनने तलवार खाली ठेवून शरण जाणे कसे आवश्यक आहे, ते सांगितले. ती समजून गेली प्रधानाबरोबर निघाली. राजवाड्यात आली. दुसऱ्या मजल्यावर गेली. तेथे नेपोलियन पिसाटासारखा येरझारा मारीत होता. नंगी तलवार त्याच्या हातात होतीच. ती एकदम त्याच्यासमोर जाऊन उभी राहिली. मधल्या कितीतरी मोठ्या कालखंडानंतर होत असलेली ही पहिलीच भेट. नेपोलियन दचकला. तिचं असं हे आकस्मिक येणं त्याच्या समजण्याच्या पलिकडचं होतं. ती जिवंत आहे की नाही, हेच मुळी त्याला इतक्या दिवसात माहीत नव्हतं. त्याने तिला मुळी आपल्या डोक्यातून काढूनच टाकले होते. पण आता तिला पाहिल्यानंतर त्याच्या मनात प्रचंड उलथापालथ झाली. जी परिस्थिती निर्माण झाली होती, तीत त्याला विलक्षण एकाकी वाटत होतं आता ती आल्यामुळे त्याचा एकाकीपणा एकदम नाहीसा झाला. आपल्या भावनेला आधार मिळाला आहे, असं त्याला वाटलं, तो रडवेला झाला, "ती तलवार माझ्या हातात दे, "एवढेच फक्त ती बोलली. तिने त्याच्यासमोर आपले दोन्हीही हात पसरले. त्याने निमूटपणे तलवार तिच्या पसरलेल्या हातांवर ठेवली. पेचप्रसंग सुटला.

वास्तव घटनांच्या इतिहासात कदाचित् या



अनुक्रमणिका

घटनेला स्थान नसेल—कदाचित् आधारही नसेल. पण प्रेमाच्या इतिहासात या घटनेचे स्थान फार उंच आहे आणि मोल आगळे आहे.

नेपोलियन तुरुंगातून सुटल्यानंतरची गोष्ट सांगतात. शरीरानं अन् मनानं खूप क्षीण झाला होता. सारं आयुष्य पराक्रमात घालवलेला, पराक्रमाच्या बळावर आपण जगातली कोणतीही अघटित घटना घडवून दाखवू असा अभिमान मनात बाळगणारा, 'अशक्य' हा शब्द माझ्या शब्दकोशातच नाही, असं ठासून सांगणारा नेपोलियन शरीराच्या अन् मनाच्या क्षीण अवस्थेत हळूहळू दैववादी बनत चालला होता. तुरुंगातून सुटल्यानंतर जहाजातून प्रवास चालला होता. रात्रीची वेळ. सभोवती पाणीच पाणी अन् वर तारकांनी खचून भरलेलं आकाश. मंदसा वारा सुटलेला. नेपोलियन डेकवर उभा राहून तारकामंडित आकाशाकडे बराच वेळ पहात राहिला. मग उत्स्फूर्तपणे बाजूच्या इसमाला म्हणाला, "Say anything you like, but it is certain that there is somebody who is controlling all this." (तू काहीही म्हण. एक गोष्ट तर निश्चित आहे की, या साऱ्यावर नियंत्रण ठेवणारी कोणती तरी एक शक्ती आहे.")

कठोर वास्तवाला शब्दबद्ध करणाऱ्या तटस्थ आणि त्रयस्थ इतिहासाला समांतर जाणारी जी एक आख्यायिकांची अन् कल्पितांची प्रतिसृष्टी आहे, तिच्यात हे असे मानवी भावनेत गुंतून पडणारे आणि गुंतवून टाकणारे प्रसंग आहेत. येथे माणसाच्या मनाच्या ऱ्यांचा ठायीठायी शोध लागतो. आणि मुख्य म्हणजे इतिहासातल्या वास्तव पुरुषांशी पूर्णपणे सुसंगत असेच हे प्रतिसृष्टीतले पुरुष असतात.

□ □


# नास्तिक

अजित उत्तमसिंग चाहल

रात्रीचे प्रहर एकामागून एक पळत होते. काळोखाची गर्दता आटत चालली होती. चंद्र थकून क्षितिजकडेवर कलला होता. चांदण्यांच्या टिकल्या दूरवर पानावरल्या दवांसारख्या चमकत होत्या.

सावित्रीने कूस बदलली.

खोलीतला काजळी काळोख काळ्यामांजरा-सारखा गुरगुरत होता. वस्तूंच्या सावल्या मटकावून चघळत बसला होता.



सावित्रीने दीर्घ श्वास टाकला. वक्षाच्या उंच-वट्यावर वाफेचा भपकारा जाणवला. बराच वेळ जळजळ झाली. सावित्री निर्विकारपणे कढांना आतल्या आत दावून टाकीत होती. कढ चढत होते. उतरत होते.

विस्तव धुमसून पेटला होता.

□ □ □

पलिकडच्या खोलीतून घोरण्याचे वेडेवाकडे आवाज घरभर उठले होते.

पुरुषोत्तम अस्ताव्यस्त निजला होता.

फुगलेलं दोंद पुढे आलं होतं. नाकाच्या पसरट पुड्या आणखी पसरून फेंदारल्या होत्या.

लठ्ठ निबरलेल्या देहाला निद्रेनं पुरतं वेढलं होतं.

सावित्रीने पुरुषोत्तम निजला होता त्या खोली-कडे जळत्या डोळ्यांनी पाहिलं. घोरण्याच्या अभद्र सुरांनी तिच्या अंगावर काटे फुलारून आले होते. सावित्रीचे डोळे उग्र झाले. पुरुषोत्तमच्या काळ्या थंड देहाला आपले हे तेजाळ सूर्याची शक्ती असलेले डोळे अजूनही तापवू शकले नाही, याची सावित्रीला खंत वाटली.

तिला तिरस्कार वाटला, पुरुषोत्तमाच्या थंड-पणाचा. त्याच्या तंदुल देहाची काळोखातही घृणा दाटून आली.

घोरण्याचा आवाज आता वादळासारखा उठून घरातील निःशब्द वातावरणाच्या भिंतींना मुळा-सकट हलवत होता. शांत निद्रिस्त वास्तूची एका-ग्रता वांगडीसारखी टिचकली होती.

सावित्री उठून बसली.

पुरुषोत्तमच्या सतत घोरण्यामुळे मनावर ताण आला होता. डोळ्यांची आग जाणवत होती. अंगातून वाफ निघत होती.

सावित्रीने काळोखाचा अंदाज घेतला.

□ □ □

रात्र थोडी उरली होती.

सावित्रीने थकून अंग टाकलं. दाराशी परिचित पावलांचा दमदार आवाज उठला. सावित्रीचे कान टवकारले. दार किंचित उघडलं गेलं.

चांदणउजेडाची फिकट पांढुरकी तिरीप थेट सावित्रीच्या शेजेपर्यंत आली. हलकेच सावित्रीवर पसरून गेली.

एक क्षण आपण चांदण्यात न्हाऊन निवत आहोत, आपला संपूर्ण देहच चांदण्यांचा झाला आहे, असं सावित्रीला वाटलं.

अंगणात दाटून असलेला श्रावणजुईचा गंध सावित्रीच्या रोमरोमात भिनला. खोलीतला काळोख सुगंधित होऊन चांदणउजेडात हरवून गेला.

डॉ. पावडेंनी आत येऊन दार लावून घेतलं. काळोखाचा प्रवाह पुन्हा कोरडा झाला.

डॉ. पावडे सावित्रीजवळ येऊन बसले.

तांबुलाच्या हलक्या गंधामुळे सावित्रीचा श्वास सुखावला.

सावित्री डॉ. पावडेंच्या आणखी जवळ सरकून बसली. देहाला देह जुळवून.

सावित्रीच्या सैल मोकळ्या केसातून डॉ. पावडे हात फिरवू लागले.

सावित्री हुरळून जात होती.

पलिकडच्या खोलीतून घोरण्याचा आवाज मंदा-वून कमी झाला होता.

पुरुषोत्तमच्या दोंदातून श्वास संपून थांबला आहे असं सावित्रीला वाटलं.

सावित्री थरथरली. विळखा अधिक घट्ट झाला.

"खूप वेळ वाट पाहावी लागली आज" डॉ. पावडे हळू स्वरात पुटपुटले.

"हं" सावित्रीने सुस्कारा टाकला.

डॉ. पावडेंचे श्वास सावित्रीच्या केसात उलट सुलट गुंतले होते. उबदार तांबुलाच्या गंधात माखलेले.

काळोखाने शिणलेली सावित्री चांदणउजेडाने शितलगार झाली होती. उफाळून आलेले इंद्रियांचे कढ शिजून भातासारखे नरम पडले होते. त्यातली उष्णता वाफाळून निघून गेली होती.

सावित्रीला हलकं वाटत होतं. ताप ओघळून गेला होता.

मसजिदीतून उठलेली अजाणाची बाग सर्द ओल्या वातावरणात घुमत गेली. काळोख दुभंगत गेला.

□ □ □

डॉ. पावडे जडपणे उठले. सावित्रीच्या डोळ्यात अजूनही ग्लानी होती. खोलीतील काळोखाच्या बुडाशी उजेडाचे कोंभ फुटून आले होते.

डॉ. पावडेंनी अंग व्यवस्थित झटकलं. केसांना चापून बसवलं. चेहऱ्यावरून आळस देत बोटं फिरवली. सावित्रीने डॉ. पावडेकडे पाहिलं.

देहावरली राख झाडून डॉ. उभे होते. तृप्त ओथंबलेले.

सावित्रीला पुन्हा नव्याने उठावंसं वाटलं, सावित्री सूर्यकमळासारखी उमलून आली होती. पण ती तशीच पडून राहिली. डॉ. पावडे थांबले नाहीत. दार करकरत उघडलं. सुखावलेले डॉ. पावडे संथ पावले टाकीत निघून गेले.

क्षिण मंदावलेल्या चंद्राची पिवळसर कोर उघडया दारातून डोकावून आत आली. चांदण-उजेड दूर दूर गेला होता.

सावित्रीने डोळे मिटून घेतले.

तळाशी कुठंतरी चंद्रकोर. पलिकडच्या खोलीतील श्वासांची घरघर पूर्णपणे थांबली होती.

□ □ □

पुरुषोत्तम कोपऱ्यात पान चवळत बसला होता. सावित्रीने एकदाही ढुंकून त्याच्याकडे पाहिलं नव्हतं. काळया तंबाखूचा बार भरून पुरुषोत्तम पचकन थुंकला.

सावित्रीचं अंग शहारून आलं. "थुंकायला घर नको. रस्ते आहेत की मुन्सिपाल्टीचे" सावित्री चिडून म्हणाली.

पुरुषोत्तम हसला. लाचार किळसवाणा. पिवळे दात एकदम बाहेर आले.

सावित्रीने कपात चहा ओतला. पुरुषोत्तमपुढे ठेवला.

उष्ण वाफाळलेल्या चहाचे घोट घशाखाली ओतताना फुर्र फुर्र आवाज निघत होता.

सावित्रीला रात्रीचे कढ आठवले. तांबुलाचा गंध अजूनही आपल्या अंगातून येतो आहे असं तिला वाटलं.

सावित्रीने स्वतःचाच वास घेतला. चुरगळलेल्या देहातून शिळा पुरुषी वास सरळ मेंदूपर्यंत पोचला.

सावित्रीला बरं वाटलं. डॉक्टरांच्या देहाचा गंध कस्तुरीसारखा आपल्या पोटात जपून आहे असं तिला वाटलं.

"डॉक्टर आले होते रात्री ?" पुरुषोत्तमने कप खाली ठेवत विचारलं.

सावित्री सावध झाली.

पुरुषोत्तम आ वासून बसला होता. दोंद पुढे काढून. पिवळट कुजलेल्या दातांतून घाण दर्प येत होता.

"आले होते" सावित्री शून्यपणे म्हणाली.

"कधी ?" पुरुषोत्तमने पुन्हा विचारलं.

"कधीतरी. पण खूप उशीरा." सावित्रीने पुरुषोत्तमचा कप पाण्याने विसळला.

"मला उठवलं का नाहीस." पुरुषोत्तमने तोंडात चोथा झालेला तंबाखू बोटावर काढला. ओठातून चिकट लाळ बाहेर टपकली. आपल्या पोटातील अन्न उलथून बाहेर येतय् असं सावित्रीला वाटलं. सावित्रीचा जीव गलबलला आपल्या देहातील कस्तुरीचा वास हरवून जातोय असं सावित्रीला वाटलं.

"दूर व्हा" सावित्री चवताळून म्हणाली. एक क्षण पुरुषोत्तम गडबडला.

"का ?" पुरुषोत्तमचा चेहरा बावळटासारखा झाला. "वास येतोय्" सावित्री नाकावर पदर धरत म्हणाली.

पुरुषोत्तम ओशाळला. उठून बाहेर गेला.

सावित्रीला पुरुषोत्तमची कीव आली.

हा षंढ आपल्या प्रत्येक शब्दाचा गुलाम होऊन जगतोय् असं सावित्रीला वाटलं. आपला उफाळलेला देह त्याला पेलवला नाही. आपल्या अभंग देहाला परक्याच्या स्वाधीन करून पुरुषोत्तम निमूटपणे दूर झाला. ओझं फेकून दिल्यासारखा हलका झाला. निश्चिंत होऊन रात्री घोरू लागला.

□ □ □

अधूनमधून त्या षंढाच्या वासना दुखासारख्या उफाळून येतात. घनदाट काळोखात आपल्या मैथुनाचा एक एक पदर पुरुषोत्तम उघडया डोळयांनी उकलत असतो.

हे सावित्रीला कळत जाणवत होतं. आपल्या नग्न देहावरून पुरुषोत्तमला हात फिरवावा वाटतो. मुक्त इंद्रियांना कुरवाळावंसं वाटतं त्याला.

पण काळोखात अस्ताव्यस्त पसरलेला पुरुषोत्तम उठला नाही कधी.

पुढयात देहाचा गाभारा असूनही त्याने कधी

पूजा बांधली नव्हती. नास्तिकासारखा दूर राहिला देहाच्या. विटाळ असल्यासारखा. आपल्या देहाला भक्त मिळाला तो गावातील एक डॉक्टर. एका पतिव्रतेचा पती आपणही त्याची पूजा स्वीकारली. त्याला प्रसन्न झालो. पतिव्रतेच्या उजळ पुण्याला आपला डाग लागला आहे, असं सावित्रीला वाटलं. पण भरती आलेल्या देहाचा समर्थ किनाराच मुळात उद्ध्वस्त निघाला होता.

सावित्रीने लांब श्वास टाकला.

खिडकीतून दूर उन्हात पुरुषोत्तम सावल्या वेचताना दिसत होता.

सावित्रीने स्वच्छ आंघोळ केली. मोकळ्या केसांना सैल पाठीवर टाकलं.

"येतो" पुरुषोत्तमने आतल्या खोलीतून आवाज दिला. सावित्री काही बोलली नाही.

"डॉक्टरला यायला सांगू आज ?" पुरुषोत्तमने विचारलं. संथ आवाजात. बाजारातून वस्तू आणताना विचारावं इतक्या सहजतेनं.

"नको" सावित्री म्हणाली.


पुरुषोत्तम निघून गेला. दार उघडं टाकून. बाहेरचं ऊन्ह चांदण्या गिळून बखबखत होतं. ☐

## 'युगवाणी' मिळत नाही ?

युगवाणीचा अंक पोस्टाने पाठविल्यानंतर तो मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येतात. तसेच अपुऱ्या पत्त्यामुळे/पत्ता बदलल्यामुळेही बरेच अंक परत येत असतात. परिणामी बराच डाकव्यय वाया जाऊन संस्थेला भुर्दंड सोसावा लागतो. सर्व सभासदांना / वर्गणीदारांना युगवाणीचा द्वैमासिक अंक नियमित पाठविला जात आहे, याची विशेष काळजी आम्ही आमच्याकडून घेत आहोच. तुमच्याकडून कृपया पुढील सहकार्य मिळावे.

- ज्या दोन महिन्याचा अंक असतो त्याच्या पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत तो आपल्याला मिळावा ही अपेक्षा असते. तरीही अनेकदा पोस्टाच्या दिरंगाईमुळे तो आपल्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ लागतो. तेव्हा त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत थांबूनही आपल्याला अंक न मिळाल्यास, **प्रथम** तुमच्या गावच्या / विभागाच्या पोस्टात चौकशी करा–लेखी तक्रार द्या व तिची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी आम्हाला पाठवा.
- **अंक शिल्लक असल्यास आपल्याला तो आवर्जून पाठविण्यात येईल.**
- आपण आपला पत्ता पूर्ण व अचूक नोंदला आहे काय ? पत्त्यात झालेला बदल, कार्यालयाला त्वरित कळविण्याची आपण कृपया खबरदारी घ्यावी. शक्यतोवर घरचाच पत्ता द्यावा. संस्थेचा / कार्यालयाचा देऊ नये.
- तुमची वर्गणी संपलेली नाही ना ? तुमचे नाव नियमित सभासदांच्या / वर्गणीदारांच्या नोंदीत आहे याची खात्री करून घ्यावी.

**मनोहर म्हैसाळकर**
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ.



## ओरछा

नीलिमा भावे

नात्यातल्या एका लग्नासाठी ग्वाल्हेरला जायचे चालले होते. आमच्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणे एका ठिकाणी जायचे ठरल्यानंतर त्याच्या जवळपास आणखी कोणती प्रेक्षणीय स्थळे आहेत, त्याचा विचार आमच्या घरात सुरू झाला. घरधन्यांना रजा फार नव्हती. कॅज्युअल लिव्हमधेच सगळा कार्यक्रम आटपायचा होता. त्यामुळे प्रवासात



अनुक्रमणिका

फार वेळ घालवता येणार नव्हता. ग्वाल्हेरजवळची चटकन आठवणारी ठिकाणे म्हणजे एकीकडे आग्रा आणि दुसरीकडे झाशी. पैकी आग्रा पूर्वी दिल्ली-बरोबर पाहिलेले होते. दुसऱ्यांदाही पाहायला तशी हरकत नव्हती. पण त्याऐवजी एखादे नवे ठिकाण पाहता आले तर बरे, असे सगळ्यांचे म्हणणे पडले. झाशी ग्वाल्हेरच्या अगदी वाटेतच असल्या-मुळे तिथे उतरायचे होतेच. झांशीहून एका दिवसात कुठे जाऊन येता येईल, त्याचा विचार चालला होता. जवळ खजुराहो होते. पण टीनएजर मुलींबरोबर तिथे जाणे कितपत बरे दिसेल, अशी शंका आमच्या दोघांच्याही मनात उद्भवली आणि खजुराहो कटाप झाले. पुन्हा आम्ही इकडे तिकडे पहायला लागलो. त्याच सुमारास इंडिया टुडे मधली एक जाहिरात आमच्या पहाण्यात आली. मध्यप्रदेशाच्या शासनाने देश विदेशच्या प्रवाशांना आपल्या प्रदेशात ओढून आणण्याचा चंग बांधलेला दिसत होता आणि त्या धोरणास अनुसरून शासनाच्या पर्यटन खात्याने धडाकेबंद जाहिरातबाजी सुरू केली होती. मध्यप्रदेशातल्या निरनिराळ्या कमी-अधिक प्रसिद्ध अशा प्रेक्षणीय स्थळांची काव्य-मय भाषेत केलेली वर्णने, आणि खास दृष्टीतून घेतलेले रंगीत फोटो मासिकाच्या गुळगुळीत कागदावर नजर खिळवून टेवीत होते. तर त्या-मधीलच एक चित्तवेधक जाहिरात आमच्या पहा-ण्यात आली. तिचे परवली शब्द होते, अद्भुत नगरी ओरछा–कालनदीच्या प्रवाहातच एक स्थिरावलेला बिंदू. (हे, आणि पुढचेही अर्थात्, मुळातल्या इंग्रजीचे अस्मादिकांनी केलेले स्वैर मराठीकरण) चारशे वर्षापूर्वीचे वास्तुशिल्प त्या-वेळच्या वातावरणासकट आपल्या मुठीत जपून ठेवणारे ओरछा आपल्याला खुणावीत आहे. वर्त-मानातून भूतकालात जाण्याचा अद्भुत अनुभव एकदा घेऊनच पहा.

ओरछा. झांशीपासून फक्त चौदा किलो-मीटर दूर.

आमच्या दृष्टीने या जाहिरातीतले सगळ्यात महत्त्वाचे शब्द हे होते—'ओरछा, झांशीपासून फक्त चौदा किलोमीटरदूर.'

ठरल्याप्रमाणे झांशीला उतरलो. सामान क्लोकरूममधे ठेवून, प्लॅटफॉर्मवरच्या रेल्वे रेस्टॉंमधे न्याहारी करून स्टेशनाच्या बाहेर आलो. ओरछाला जाण्यासाठी बस वगैरे काही आहे का, त्याची चौकशी सुरू केली. ओरछाबद्दल आम्हाला माहिती अशी काहीच नव्हती. तिथे जुने राजवाडे, देवळे वगैरे आहेत असे त्या जाहिरातीत वाचले होते, एवढेच काय ते. पण तिथले राजे कोण होते, वगैरे काहीच माहीत नव्हते. मागे एकदा ग्रँड ट्रंक एक्सप्रेसने दिल्लीहून नागपूरला जाताना वाटेत दतियाजवळ उंचवटयावर एका राजमहालाच्या नक्षीदार किल्लेवजा भिंती दिसल्या होत्या, संध्या-काळच्या गुलाबी धूसरतेवर रेखलेले ते काळया-करडया उंच भिंतींवरचे नक्षीकाम महालाच्या गूढपणाला एका रोमॅंटिक आकर्षणाची झालर लावीत होते. ओरछाचे वास्तुशिल्प दतियाच्याच धर्तीचे असावे, असे त्या आधी पाहिलेल्या जाहिराती-तल्या फोटोंवरून वाटत होते. ज्याच्याबद्दल फारशी, फारशी तरी का, काहीच माहिती नाही, असे नुसतेच आपले एक प्रेक्षणीय म्हणून वाचलेले ठिकाण बघ-ण्यासाठी आम्ही ओरछाला निघालो होतो. माहिती सांगणारे तिथे कोणीतरी भेटतीलच आणि नसली तरी असे काय मोठेसे बिघडणार आहे असे विचार मनात घोळत होते. ताजमहाल हा शहाजहानने आपली पत्नी मुमताजमहल हिच्या स्मरणार्थ बांधला, हे माहीत नसले तरी तो कमी सुंदर दिसतो, असे थोडेच आहे! पण त्यांच्याशी संबं-धित घटनांचे, त्याच्या बांधकामातल्या, सजा-वटीतल्या लहान–मोठ्या वैशिष्ट्यांचे, त्याच्याशी निगडित असलेल्या व्यक्तींच्या आयुष्याचे काही बारकावे माहीत असतील, तर ते वास्तुशिल्प आप-ल्याच अधिक जवळचे वाटायला लागते, अधिक "समजते", हे खरे. त्या दृष्टीने ओरछाला जाताना आमची पाटी कोरी होती. उत्साह आणि उत्सुकता या हौशी प्रवाश्यांमध्ये आवश्यक अस-लेल्या दोन गोष्टी मात्र आमच्याजवळ पुरेशा प्रमाणात होत्या!

तर ओरछाला कसे जायचे त्याची चौकशी करताना कळले, की झाशीहून तिकडे जाणारी सकाळची बस निघून गेली होती, आणि दुसऱ्या बसला बराच अवकाश होता. आमच्याजवळ वेळ

वताचा असल्यामुळे खाजगी वाहन करून जायला हवे होते. टॅक्सी कुठे दिसत नव्हती. एक टांगेवाला यायला तयार होता. पण रस्ता जंगलातून, आणि बरोबर 'जनाना' असल्यामुळे टांग्यासारख्या सावकाश चालणाऱ्या वाहनातून न गेलेले बरे, असा सल्ला, आम्ही नवखे पाहून आमच्या जवळपास घोटाळणाऱ्या काही हितचिंतकांनी माझ्या नवऱ्याला दिला. मध्यप्रदेशातल्या कायदा आणि सुव्यवस्थेची झलक सकाळी विदिशा ते झांशी दरम्यानच्या रेल्वे प्रवासात पहायला मिळालीच होती. त्यामुळे आम्ही आमचा मोर्चा ऑटोरिक्षाकडे वळवला. एक रिक्षावाला, त्याच्या तिघांसाठी असलेल्या रिक्षात आम्हा चौघांनाही बसवून घ्यायला तयार झाला. ओरछामध्ये हिंडवून संध्याकाळ व्हायच्या आत झांशीला परत घेऊन येण्यासाठी त्याने सांगितलेले भाडे आम्ही घासाघीस न करता मान्य केले.

झांशीहून ओरछाला जाताना वाटेत प्रांताची हद्द ओलांडली जाते. इथे एकाच पाटीवर एकीकडे उत्तरप्रदेश, आणि दुसरीकडे मध्यप्रदेश असे लिहिलेले होते. हा कायदेशीर फरक सोडला, तर भौगोलिक दृष्टीतून हा सारा एकच एक विंध्यप्रदेश होता. प्रागैतिहासिक काळापासून भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने महत्वाचा असलेला विंध्यपर्वत आपल्या लहान मोठ्या रांगा पूर्व पश्चिम पसरून या प्रदेशात आडवा आल्यासारखा उभा होता. विंध्य पर्वताने भारताचे उत्तर भारत आणि दक्षिण भारत असे दोन सांस्कृतिक विभाग पाडले आहेत, असे आम्ही लहानपणी भूगोलात शिकलो होतो उत्तर भारतातल्या नद्यांच्या खोऱ्यात आर्यावर्तील वस्ती वाढल्यानंतर आणखी मुलूख पादाक्रांत करायला आर्यांच्या टोळ्या विंध्यपर्वत ओलांडून दक्षिणेकडे आल्या आणि त्यांनी नेहमीकरिता या अनार्य प्रदेशावर आपले सांस्कृतिक वर्चस्व स्थापन केले (ते अगदी द्र. मु. क. च्या उदयापर्यंत) ते देखील वाचीत आलो होतो. झांशीचा परिसर सत्तावनच्या सेनानींच्या रक्ताने पावन झालेला. शिवाय राजा छत्रसाल आणि त्याचा बुंदेलखंड सगळ्या मराठी भाषिकांना परिचयाचाच. तेव्हा या प्रदेशाच्या माहितीची अशी तुटपुंजी शिदोरी आमच्याजवळ होती. इंग्रजी माध्यमातून शिकलेल्या आजच्या मुलींना ती आम्ही पुरवून पुरवून वाटीत होतो ओरछा मात्र कुठले, कुणाचे काहीच माहीत नव्हते.

रिक्षा चालली असताना वाटेत एका ठिकाणी एका विहिरीवर रहाट गाडगे फिरताना दिसले. "ते पहा, ते पहा जलयंत्रचक्र" म्हणून दहावीच्या हिंदी–संस्कृत कॉंपोझिट कोर्सची कन्यका एकदम उद्गारली! आमच्या शालेय अभ्यासक्रमासारखाच तिच्याही शालेय अभ्यासक्रमाचा धागा या ना त्या प्रकाराने इथे जुळून आला होता!

नंतर वाटेत एक छानशी नदी लागली. पण तिचे नाव मात्र अगदी काहीतरीच, म्हणजे "सामार" असे निघाले. नदीच्या काठावर असलेल्या जंगलात क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद काही काळ अज्ञातवासात लपले होते, आणि त्यांचे तिथे जंगलात स्मारकही बांधलेले आहे, अशी माहिती रिक्षावाल्याने पुरवली. अमर चित्रकथांच्या मालिकेतली चंद्रशेखर आझादांवरची पुस्तिका वाचलेली आठवून मुलींनीही त्याला दुजोरा दिला. आमच्याजवळ वेळ थोडा होता, त्यामुळे आम्ही त्या स्मारकाचे दर्शन घेऊ शकलो नाही. मात्र आपल्या देशातला कोणताही भाग तसा आपल्याला अनोळखी नसतो, (थँक्स् टू अमर चित्रकथा!) याची जाणीव झाली आणि जरा बरे वाटले.

ओरछा जवळ यायला लागले, तसतशा दुरून तिथल्या ऐतिहासिक इमारती दिसायला लागल्या. रिक्षा गावात शिरली तेव्हा रस्त्याच्या दोन्ही बाजूंना नक्षीदार बांधकाम केलेल्या, अजूनही चांगल्या स्थितीत असणाऱ्या इमारती उभ्या दिसल्या. रस्ता तसा अरुंदच होता, पण स्वच्छ होता. गाव सुरू झाले तेव्हा तिथेच खाली उतरून पायी हिंडायला सुरुवात करावी असा आमचा विचार झाला. पण रिक्षावाल्याने सुचवले, की आधी गावाच्या दुसऱ्या टोकाला जाऊ आणि परत येताना निरनिराळी ठिकाणे पाहत परतीच्या रस्त्याला लागू. ते सोयीचे वाटून आम्ही या बेताला तयार झालो.

रिक्षा गावात जायला लागली, तेव्हा वस्ती अशी फारशी दिसली नाही. पण गाव राहते होते, त्याच्या खुणा सगळीकडे दिसत होत्या. इमारतींच्या

उंच दगडी भिंतींवर हवाबाण हरडयाच्या आणि निरोधच्या जाहिराती चितारलेल्या होत्या. त्या जाहिरातींनी ओरछाला त्याच्या सरकारने प्रदान केलेल्या रोमँटिक भूतकाळामधून वास्तववादी वर्तमानात आणून ठेवले होते. मोगल वास्तु-शिल्पाशी नाते सांगणाऱ्या एका महालाच्या कडेच्या कोपऱ्यात शासनाच्या कुटुंबनियोजन केंद्राची पाटी लागली होती. अशाच दुसऱ्या एका जुन्या भव्य इमारतीत भरलेल्या शाळेतल्या मुलांचा चिवचिवाट, त्याची आवश्यकताही पटवून देत होता. आणि या सर्वांमुळे, ओरछा हे ठिकाण फतेपूर सिक्री, किंवा निदान मांडवगडसारखे असावे बहुतेक, या आमच्या अपेक्षेला लहान मोठे तडे जात होते. गाव देखील तसे टीचभरच होते आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूंवर वसलेले होते. थोडयाच वेळात आमची रिक्षा गावाच्या दुसऱ्या टोकास जाऊन थांबली. आम्ही खाली उतरून आजूबाजूला नजर टाकली आणि अगदी हरखून गेलो !

मोठयामोठया काळया करडया खडकांमधून नदीचे हिरवे पाणी फेसाळत वाहत होते. नदीत एक रुंदसा बांध घालून त्यावरून गाडी जाऊ शकेल असा रस्ता केला होता. नदी गावाची नैसर्गिक सीमा होती आणि रस्ता तिच्या पली-कडच्या काठावरच्या दाट रानात जात होता. आम्ही उभे होतो त्या अलिकडल्या काठावर रस्त्याच्या डाव्या बाजूस एका भव्य महालाच्या तटबंदीवजा भिंती नदीच्या पात्रातच पाय रोवून उभ्या होत्या. नदीचे पाणी त्या भिंतींना रेशमी गुदगुल्या करीत अल्लडपणाने तियल्या खडकांमधून मागेपुढे वळसे घेत धावत होते. दुपारी बाराच्या झळाळत्या. उन्हात त्या ठिकाणचे करडे, हिरवे, निळे, पांढरे रंग आणि तिथल्या पाण्याचा खळ-खळाट यांची एक लय सांधली गेली होती. हे जंगल आणि ही नदी अशीच ह्याच तंद्रीत इथे युगानुयुगांपासून अस्तित्वात असेल. या तंद्रीचा आसरा घेऊनच इकडल्या काठावरल्या इमारती इथल्या राजांनी बांधल्या होत्या. त्या बांधत असताना, आणि नंतर त्यातून माणसांचा वावर होत असताना तिथे घडलेल्या घटनांनी या तंद्रीचा भंगही कधी कधी झालाच असेल. मनात आले, आम्ही दुपारी बाराच्या ऐवजी रात्री बारा वाजता इथे उभे असतो तर ? तर मग रात्रीच्या अंधुक प्रकाशामध्ये ते समोरचे जंगल, मधली खडकाळ पात्राची नदी, आणि या काठावरचा, आपल्या दगडी छातीच्या आड न जाणे कोणकोणती रहस्ये दडवून ठेवणारा हा महाल यांनी डोळयांना सुख मिळायच्या ऐवजी जिवाचा थरकाप उडवला असता ! महल, मधुमती किंवा कोहरा अशा चित्रपटांच्या चित्रीकरणासाठीच ठीक आहेत अशी ठिकाणं ! या साऱ्या वातावरणाशी तासा–दोन तासांचा प्रेक्षक यापलिकडे आपला संबंध नाही, याचे हायसे वाटले !

गावातून येताना वाटेत एका दुकानाशी थांबून आम्ही ओरछाबद्दलची माहिती–पुस्तिका विकत घेतली होती. नदीकाठावर उभे राहून आम्ही ती उघडली, आणि तिथल्या इमारतींचे धागेदोरे शोधू लागलो. वाचता वाचता कळले की आम्ही जिच्या काठावर उभे होतो ती नदी बेतवा होती. भुगोलासाठी 'बेतवा, आणि संस्कृतमधली वेत्रिका किंवा वेत्रवती आणि तिच्या पलिकडच्या काठा-वरच्या जंगलचे नाव तुंगारण्य होते. म्हणजे ही प्राचीन काळातल्या तुंग मुनीची तपोभूमी–कर्म-भूमी होती. गंमत काय पहा ! ओरछाला येताना आम्ही चालू काळाच्या साडेचारशे वर्षे मागे चालले आहोत, असे आम्हाला माहीत होते, पण प्रत्यक्ष आलो होतो ते साडेचार हजार वर्षे मागे ! आर्यांनी विंध्य पर्वत ओलांडला, त्याला इतकी वर्षं झालीच असतील. देशाच्या सांस्कृतिक वार-शाचा आम्हीही थाज साक्षीरूपाने एक हिस्सा झालो होतो, आणि तेदेखील अगदी अनपेक्षित पणे !

नदीशी आल्यानंतर तिच्या पाण्यात पावले भिजवणे ओघातच आले. पात्रातले खडक चांगले प्रशस्त होते. त्यावर पाच–दहा मिनिटे बसून घ्यावे, या विचाराने बांधावर पायातल्या चपला, बूट, सँडल्स् वगैरे काढून ठेवले. साडी, सलवार, पँट, जीन्स इत्यादी किंचित् वर उचलून धरीत, किंवा दुमडून घेत मोठया उल्हासाने आणि औत्सु-क्याने आम्ही पाण्यात उतरायला लागलो आणि एक–दोन पावले टाकली असतील, नसतील तर लगबगीने उलट पावली काठावर परत आलो. कारण

ओरछाच्या नदीकिनाऱ्याचा तिथल्या रहिवाशांच्या दृष्टीने एकच उपयोग दिसत होता! माझ्या नवऱ्याचे बरेचसे 'रम्य' बालपण नदीकाठच्या, जंगलाकडेच्या लहान लहान खेडेगावांमधून गेलेले आहे. त्यामुळे या प्रकारावर त्याने आपले एक्स्पर्ट कॉमेंट दिला की नैसर्गिक विधी हे निसर्गाच्या सहवासात पार पाडणे, हीच खरी आपली प्राचीन भारतीय परंपरा आहे. पायखाने वगैरे कृत्रिम बंदिस्त प्रकार हे परक्या मुसलमानी संस्कृतीने आपल्याकडे आणले. ऊन, वारा, पाणी, माती यांच्याइतके स्वच्छतेचे संरक्षक दुसरे कोण मिळणार? पण मुद्दा पटण्यासारखा असला तरी प्रश्न सुटत नव्हता. तेव्हा आम्ही पुन्हा पादत्राणे अडकवून पुढच्या कार्यक्रमासाठी सज्ज झालो.

रस्त्याच्या डाव्या बाजूला राजमहाल होता तर उजव्या बाजूला जरा पलिकडे, आणि काठापासून थोडे आत पाच-सहा एकासारख्या एक दिसणाऱ्या नक्षीदार कमानदार बांधणीच्या इमारती होत्या. त्यांना पुस्तिकेते मकबरे असे म्हटले होते. मकबऱ्यांकडे जाताना वाटेत एक घाट लागला, त्याचे नाव राणी घाट किंवा कंचना घाट. राणी वंशातल्या स्त्रियांच्या, चमचमत्या सळसळत्या वस्त्रांमधून डोकावणाऱ्या, आळता आणि पैंजण यांनी सजलेल्या नाजुक पावलेच्या न्यायासाठी योग्य असा हा सुबक, सुंदर घाट होता. काठावरच्या एकूणच सगळ्या वास्तूंमधे आजूबाजूच्या आसमंताशी संवाद साधत असतानाच स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व जपण्याची, इतकेच नाही तर आपल्या अस्तित्वाने सारा परिसर अधिक सुंदर करण्याची मुसलमानी कला साकार झाली होती.

आम्ही मकबऱ्यांपाशी आलो तेव्हा कळले, की ह्या काही कबरी नाहीत. त्या नुसत्या घुमटाखाली मोकळी जागा सोडून बांधलेल्या स्मारकवजा वास्तू होत्या. त्या मोकळ्या जागांमधे दुपारी गुरे सावलीला बसत असल्याच्या खुणा दिसत होत्या. घुमटांच्या आतल्या बाजूस वटवाघळे लोंबत होती. बाहेर घुमटांच्या पायथ्याशी, भिंतींच्या कडेला चांगली पोसलेली गिधाडे डोळे मिटून स्वस्थ बसली होती. आम्ही आवारात शिरल्यावर तिथल्याच एका कडुलिंबाच्या झाडावर गारब्याल! बसलेले दोन-तीन पोपट कर्कश चीत्कार करीत उडाले. त्या आवाजाने चाळवलेल्या गिधाडांनी पंख ताणून छानपैकी आळस दिला. त्या ठिकाणी आमची अशी दखल घेतली गेल्यामुळे आम्हांस जरा बरे वाटले.

तिथली ती एका सारखी एक दिसणारी स्मारके निरनिराळ्या राजांच्या नावाने बांधलेली होती. ओरछाच्या राजांचे तसे इतिहासात फारसे महत्त्व नाही. खरे तर हे बुंदेलखंडातले एक मोठे राज्य. त्याच्या हळूहळू वाटण्या होऊन जवळपास इतरत्र वेगवेगळ्या शाखा राज्य करायला लागल्या. दतिया, झाशी ही संस्थाने मुळात ओरछाच्या मोठ्या राज्यातूनच फुटून निघालेली. आपला ओळखीचा छत्रसालही त्यातल्याच एका शाखेचा. इतिहासाची एक महत्त्वाची घटना ओरछाच्या खात्यात नमूद आहे, तिचा पुरावा इथल्या एका महालाच्या रूपाने पहायला मिळतो, त्याचे नाव जहांगीर-महल. ही ओरछामधली सगळ्यात उंच इमारत आहे. जहांगीर हा राजपुत्र सलीम असताना एकदा अकबराशी भांडून राज्याबाहेर पडला होता. तेव्हा ओरछाच्या तत्कालीन ठाकुराने मैत्रीचा हात त्याच्यापुढे केला, आणि त्याला काही काळ आपल्या राज्यात आश्रय दिला. त्याच्या तिथल्या वास्तव्याची आठवण असावी, म्हणून त्याने मोगल साम्राज्याच्या वारसदाराची शान राखली जाईल असा एक महाल त्याच्यासाठी बांधला.

मध्ये मोठा थोरला चौक, चौकामध्ये कारंजी, फुलबागांची व्यवस्था, चारी बाजूंना मोकळ्या दालनांचे मजल्यांवर मजले चढवलेले, त्यांचे नक्षीदार कठडे, कोपऱ्याकोपऱ्यांवर बुरूज, आणि त्या बुरुजांवर घुमट बसवलेले. कठडे आणि घुमट यांच्यावर निळ्या चिनीमातीचे तुकडे चिकटवून रंगकाम केलेले. असा मनःपूर्वक बांधलेला आणि सजवलेला हा महाल डोळ्यांना सुखवतो, तसाच दिपवतो देखील. राजाचे वैभव आणि सुखविलास पाहण्यात प्रजेने आनंद मानावा असा जमाना या महालाच्या रूपाने साकार झाला होता.

या महालातच तळमजल्यावरच्या एका कोप-

त्यातल्या लहानशा खोलीत मध्यप्रदेश शासनाच्या पर्यटनखात्याची कचेरी आहे. तिथल्या एका सेवकाने आमच्या सांगण्यावरून आम्हाला जवळच्या राणी महालाच्या दालनाची कुलुपे उघडून दिली. हा महाल असा बंदोबस्तात असण्याचे कारण तिथल्या भिंतीवर काढलेली चित्रं "बघ्यांनी" खराब करू नयेत हे असावे. गडद रंग आणि ठसठशीत रेषा यांनी काढलेली ही "बुंदेलखंडी" चित्रे अजूनही चांगल्या स्थितीत आहेत. मनावरचे ताणतणाव दूर करण्यासाठी ज्या ठिकाणी जायचे तिथे झाडे, फुले, वहाते पाणी हा निसर्ग, आणि तशाच काव्य, चित्र, संगीत अशा कला यांचा चवीचवीने आस्वाद घ्यावा, हा वारसा देखील मोगलांनीच आपल्यास दिलेला.

ओरछामधल्या सगळ्या इमारती काही एकावेळी बांधलेल्या नाहीत. एकूण चारशे साडेचारशे वर्षाच्या कालावधीत एकामागून एक गादीवर आलेल्या राजांनी आपापल्या आवडीप्रमाणे आणि गरजेप्रमाणेत्या बांधलेल्या आहेत. मुसलमानी राजवटीतही त्यांची मोडतोड झाली नाही, अगदी चतुर्भुज रामाचे उंच भव्य मंदिरही शाबूत राहिले, त्याचे श्रेय ओरछाच्या ठाकुरांनी मोगलांशी ठेवलेल्या मैत्रीला जाते.

राणी महालाचा एका झरोक्यातून चतुर्भुज मूर्तीचे थेट दर्शन होते. ही पद्धतही शेजारच्याच माळव्यातल्या मांडवगडमधल्या काही वास्तुशिल्यांची आठवण करून देते.

ओरछात पाहण्याजोगी म्हणून आणखीही कांही ठिकाणे दाखवितात. त्या ठिकाणी कांही दंतकथा गुंतलेल्या आहेत. दोन भावांना आळीपाळीने मोठेपणा देणारे 'सावन भादो' हे दोन मनोरे आळीपाळीने एकमेकाहून लहान मोठे दिसतात. हरदौल महालात ओरछाच्या एका राजाच्या धाकट्या भावाची समाधी आहे. आपल्या भावजईवरच्या प्रेमाची शुद्धता भावाला पटवून देण्यासाठी हरदौलने विषप्राशन केले होते. आणि त्याचवेळी दुसऱ्या गावी आपल्या भाचीच्या लग्नास आत्मिक रूपाने हजर राहून त्याने मामाचे कर्तव्य देखील पार पाडले होते. असा हा हरदौल बुंदेलखंडी लोकगीतांमधून अजूनही जिवंत आहे. सख्खा मामा नसलेल्या बुंदेलखंडी मुली आपल्या लग्नाच्या आधी या हरदौलाच्या समाधीचे आशीर्वाद घेऊन जातात.

हरदौल महालाजवळची फुलबाग हा विलासासाठी मुसलमानी "जाणिवे"तून आखलेल्या आणि बांधलेल्या बगीच्याचा एक छोटेखानी नमुना आहे.

ओरछामधील महत्त्वाची अशी बहुतेक ठिकाणे आता पाहून झाली होती. परत जायच्याआधी ओरछाचा निरोप घेण्यासाठी म्हणून आम्ही पुन्हा एकदा मागे वळून पाहिले. शरदऋतूच्या निळ्याभोर आकाशावर जहांगीर महालचे निळे घुमट आणि मेहेरपदार नक्षीचे निळे कठडे यांनी मोरपिसांचा मुकुट जडवला आहे, वरती एक लहानसा पांढरा ढग त्यास चंदनाचा टिळा लावतो. आकाश निळे तो हरि ! मात्र वेळ दुपारची असल्यामुळे जवळपास कुठे बावरीसुद्धा चांदणी नाही. ती बहुतेक संध्याकाळ होण्याची वाट पाहत क्षितिजाआड लपून बसली आहे.

ओरछाचे आमच्या लक्षात रहाणार आहे, ते हे दृश्य आणि ती पलीकडची, एका काठावर तुंगारण्य आणि दुसऱ्या काठावर राजमहाल, कंचनाघाट, मकबरे यांना घेऊन जाणारी हिरवी, खळाळती वेत्रिका. एकादे रम्य दृश्य पाहल्यानंतर सुखात असलेल्या माणसाच्या मनात देखील हुरहूर जागी होते, असे महाकवीने म्हटले आहे. निसर्गाच्या रमणीयतेमधली हुरहूर कमी करायची, त्यातून जाग्या होणाऱ्या "परलक्षी" संवेदनांना इथे भूतलावर आणायचे आणि त्या रमणीयतेचा रसिकतेने आस्वाद घ्यायचा. या अनुभव-विश्वामध्ये ओरछाचे या ठिकाणचे वास्तुशिल्प आपल्यास आणून सोडते. मोठमोठ्या ऐतिहासिक महत्त्वांच्या वास्तुशिल्पांमध्ये त्याची गणना नाही. तिथले राजे किंवा त्यांचे कर्तृत्वदेखील तसे मोठे नव्हते.

पण ग्वाल्हेर-झांशीकडे गेलो, आणि जास्तीचा एखादा दिवस जवळ असला तर तो आनंदात घालवण्यासाठी जरूर बघावे, असे हे ओरछा !

□□

## पगाराचा दिवस

ए. डी. दिवेकर

"ए पोरी, ऊठ व, भोंगा वाजलाय" कौसीनं आपल्या मुलीला (वत्सीला) झोपेतून उठविलं.

कौसीनं माठातून एक तांब्याभर पाणी घेतलं, गुळणा केला, तोंडावरून पाण्याचा हात फिरवला.

"ये वत्से, घमीलं कुठ ठुईलं वं" कौसी आपल्या हातातील खराटयाची मूठ व्यवस्थित करीत म्हणाली.



अनुक्रमणिका

वत्सीनं काही न बोलता कौसीला घमीलं आणून दिलं. कौसी खराटा व घमीलं घेऊन कामावर जाण्यास निघाली. जाता जाता वत्सीला म्हणाली, "वत्से ते दार लावून घे आन थोडया येळानं माठ, रांजन भरून ठुई."

वत्सी काही एक न बोलता आपल्या आईच्या पाठमोऱ्या आकृतीकडे दिव्याच्या अंधुक प्रकाशात पहात होती. अचानक वत्सीला आठवलं, ती आईला म्हणाली, "ये मां, चहा पत्ती, साखरेला पैसे देना."

कौसी आपल्या विस्कटलेल्या केसात बोटं घालून खराखरा खाजवात म्हणाली, "म्हाया जवळ कुठं पैसे हाय, तु सकाळी त्या शौकतआपाच्या दुकानात जाय, तिला म्हणावं, म्हाया माईनं छटाक साखर, एक चहाची पुडी व चार बटर सांगितले. मी संध्याकाळी आल्यावर पैसे देऊन टाकीन."

कौसी लगबग आपल्या झोनकडे निघाली, रस्त्यात तिला कडुबाई भेटली. दोघी आपल्या झोनला पोहचल्या, मुकादमानं हजेरी घेतली. प्रत्येकीला काही सूचना दिल्या. मुकादम कौसीला बोलावून म्हणाला, "कौसाबाई तुम्ही काल त्या नालीतील काढलेली घाण उचलली नाही."

कौसी मुकादमावर खेकसली "ये गणपतभाऊ त्या नखऱ्यावाल्या बाया हायना त्यांना रोडवरचं आधार काम देतोस, आन गटाराचा गाळ डोक्यावर मला वाह्याला लावतो."

मुकादम काही न बोलता पुढे निघून गेला. कौसाचं झाडणं व बडबडणं दोन्ही चालू होतं.

सकाळी ८ वाजता कौसी जोडीदारणीला बरोबर घेऊन मुसासेठच्या हॉटेलवर गेली. बाहेरूनच मुसा सेठला दोन चहा आणि दोन डबल रोट्यांची ऑर्डर दिली. हॉटेलमधील पोऱ्यानं दोन चहा आणि दोन डबलरोटचा नेऊन दिल्या. मग कौसी व जोडीदारणीनं चहा, डबलरोटी संपविली. त्या दोघी जायला निघाल्या, तेवढ्यात मुसासेठनं आवाज दिला, "ये, कौसाबाय आज एक तारीक है, मैं झोन ऑफीस को दूपेरको आ रहा हूँ।"

कौसी काही न ऐकल्यागत तेथून चालती झाली.

दुपारचा एक वाजला. पोटात काव-काव व्हायचा लागली. परंतु कौसी तसीच झोन ऑफीसजवळ बसून शून्यात पाहत होती. आज एक तारीख असल्यामुळे बाया-माणसे ऑफीसजवळ आपली कामे उरकून जमू लागली.

दोन वाजले. झोन ऑफीसच्या परिसरात स्कूटरवाले, मोटरवाले सारेच दिसू लागले. कौसी खिन्न नजरेनं सारं काही पाहात होती. अचानक तिची नजर समोरून येणाऱ्या प्रकाशसेठकडे गेली. कौसीच्या काळजात एकदम घसकाच बसला. परंतु स्वत:ला सावरीत तिने सेठला नमस्कार केला.

प्रकाशसेठनं कौसीला जवळ बोलवलं. म्हणाला, "कौसाबाई तू मागच्या महिन्यात तोंडच दाखवलं नाही."

कौसी म्हणाली, "सेठ मागल्या महिन्यात पोरीला साडी व पोराला कपडे घेतले म्हणून पैसे द्यायला जमलं नाही."

सेठ सिगारेटचा धूर बाहेर फेकत म्हणाला, "हे पहा कौसाबाई मी तुला तेव्हांच बजावलं होतं की, मला मुद्दल एखाद्या महिन्यात नाही दिलं तरी चालेल परंतु व्याज न चुकता आलं पाहिजे."

प्रकाशसेटनं सिगारेटचं थोटुक खाली फेकलं. ते पायानं विझवत म्हणाला, "कौसाबाई आज तू मला दोन महिन्याचं व्याज आन् मुद्दल मिळून साडेचारशे रुपये दे."

कौसी एकदम रडकुंडीस येऊन म्हणाली, "सेठ सारेच पैसे तुम्हाला देऊ, आन महिनाभर लेकराबाळाला काय खाऊ घालू."

प्रकाशसेट दानशूराचा आव आणत म्हणाला, "कौसाबाई उद्याच तुला दोन-चारशे जे काय पाहिजे ते घेऊन जा, परंतु आज मागचा हिसाब साफ झाला पाहिजे."

कौसी सुकलेलं तोंड घेऊन ऑफीसमध्ये गेली, आपला अंगठा टेकून पगार घेतला. काट-छाट होऊन कौसीला ४०० रुपये मिळाले.

कौसीचं डोकं काम करत नव्हतं, तिच्यासमोर फार मोठं कोडं होतं. प्रकाशशेटला पूर्ण पैसे दिले तर इतरांना काय द्यायचे आणि घरी काय न्यायचे ?

कौसी पैसे हातात घेऊन लिंबाच्या झाडाला टेकून बसली. तिच्यात काहीच त्राण उरलं नव्हतं. प्रकाशसेठ इतर वसुली करून कौसीकडं आला, म्हणाला "दे मला लवकर जायचं आहे." कौसी आपले सुकलेले ओठ पदरानं साफ करीत म्हणाली, "शेट तुमी अडीचशे घ्या व बाकीचे मोहरल्या महिन्यात देईन." प्रकाशसेठनं काही आढे वेढे न घेता पैसे घेतले, कारण त्याला माहित होतं की, या लोकांना आपल्याशिवाय कोण व्याजानं पैसे देतो.

प्रकाशसेठ जात नाही तोच मुसाभाई होटलवाला कौसीकडं येत म्हणाला, "कौसाबाई कबसे धूंड रहा हूँ तुमको."

मुसाशेठ आपली डायरी उघडून त्यात पाहत म्हणाला "कौसाबाई दो महिने का बिल ८० रुपये ४० पैसे हुआ है ।"

कौसाबाई म्हणाली, "मुसाभाऊ पुढल्या महिन्यात घेनारे, त्या मेल्या प्रकाशशेटनं सारा पगार नेला."

मुसासेठ थोडया रागनंच म्हणाला "देखो कौसाबाई मैंने पहेलेच बोला था की, मुझे पैसे हर एक तारीख को मिलने चाहिए ।"

कौसानं झटक्यानंच शंभराची नोट त्याच्यासमोर धरली. मुसासेठनं ती पटकन घेतली, २० रुपयाची नोट कौसीला वापस देऊन न बोलताच तो निघून गेला.

पोटात काही नसल्यामुळं तिला आता चकरा येऊ लागल्या होत्या. एव्हाना संध्याकाळचे ५ वाजले होते. बरोबरची सर्व बाया-माणसे आपआपला पगार घेऊन घराकडे गेले होते.

कौसी ऑफीसच्या कंपाऊंडच्या फाटकातून बाहेर आली. तेवढयात मागाहून कोणीतरी आवाज दिला, "ऐ कौसाबाई" कौसानं मागं वळून पाहिलं तो कपडावाला हिरालालसेठ.

हिरालालसेठनं पन्नास रुपये मागितले. कौसीनं त्याला पुढच्या महिन्यात देईन म्हणून सांगून पाहिलं, परंतु सेठ ऐकत नाही, म्हणून कौसीनं त्याला पन्नास रुपये देऊन टाकले.

आता कौसाकडं फक्त वीस रूपये उरले होते. तिच्यात चालण्याचे त्राण उरले नव्हते. अंधार पडण्याच्या सुमारास कौसी घरी आली. वत्सी व तिचा पाच वर्षाचा मुलगा तिची वाट पाहातच बसले होते. कौसानं घरात आल्या आल्या एक तांब्याभर पाणी झटक्यात घेतलं व ढसा-ढसा प्याली. थोडं शांत वाटल्यावर तिनं वीस रुपयाची नोट काढली व वत्सीजवळ देत म्हणाली, "वत्से दोन-तीन किलो पीठ आण, काडया घेऊन ये."

वत्सीनं सांगितलेलं सामान आणलं व उरलेले पैसे कौसीजवळ दिले. कौसीनं आपल्या पोराला जवळ बोलावून त्याच्या हातात दोन रुपयाची नोट दिली. "दिल्या त्या ठियावर जाय एवढयाची झान-झुन घेऊन ये." कौसीचा मुलगा दिलीप खूपच आज्ञाधारक निघाला. पळत जाऊन घेऊन आला.

दिलीपनं झान-झुनचा तांब्या कौसीच्या समोर ठेवला. कौसीनं कमरेची पिशवी काढली, त्यातून १ रुपयाची नोट दिलीपच्या हातात देत म्हणाली, "दिल्या एक छटाक फुटाने आन. बाकीचे पैसे तुला खाऊला घे."

दिलीप पळत-पळत दुकानात गेला व आपल्या आईला छटाकभर फुटाणे आणून दिले. लगेच खेळायला बाहेर निघून गेला.

कौसीनं जर्मनच्या ग्लासात झान-झून ओतली व घटा-घटा पिऊन टाकली. नंतर थोडे फुटाणे खाल्ले. थोडया वेळाने उरलेली सर्व झान-झुन ग्लासात घेऊन घटा-घटा घशाखाली ओतली.

वत्सीनं दुकानातून पीठ, काडया व दाळ आणली होती. तिनं चूल पेटवून स्वयंपाकाला सुरुवात केली.


झान-झुननं कौसीच्या मेंदूचा तावा घेतला होता. कौसी मोठमोठ्यानं बडबडत होती. प्रकाशसेठला शिव्या देत होती, महागाई वाढवणाऱ्या सरकारला शिव्या देत होती, आपल्या नशिबाला दोष देत होती.

कौसी आपल्या मेलेल्या नवऱ्यालाही जमेल तेवढया शिव्या देऊन घेत होती...

□□



अनुक्रमणिका



## चंद्राची चादर

यशवंत पाठक

ब्रह्मगिरीत गोरक्षनाथांची गुंफा आहे. तिला गुहा म्हणावेसे वाटत नाही. गुहा म्हटली की हिंस्र पशूंच्या घोरण्याचा गोंडाच आठवतो. गुंफेत तसे होत नाही. गुंफा म्हटली की काहीतरी वीण येते वीण आली की त्यात कळांच्या कळ्या असतात. त्या इतक्या अलगदपणे उलगडल्या पाहिजेत की अनुभवाचे फूलच जन्मास यायला हवे. गुंफेत अशा

खूप कळयांचा सडा पडलेला असतो. तो आपल्याला दिसेलच असे नाही. यासाठी दृष्टीचे कडे टोकदार असावे लागतात. कडयांना टोक असते नि टाकही असतो. टोकदारपणाचे टोक गाठायला अनुभवच निवृत्तीच्या तळयातून बाहेर येऊन तो ब्रह्मगिरीच्या कुशीत विसावावा लागतो. ब्रह्मगिरी समजणे तितके सहज नाही. त्यातली गुंफा आणखी आत. गुंफेची गुंफा तर अधिकच आत. आतल्या आतचा प्रवास सदैव आताच वाकी उरवतो. तो अधिक काही देतच नाही. देतही नाही नि घेतही नाही. या गुंफेच्या काही अंतरावरच गोदावरीचा उगम आहे. उगमातल्या पाण्यातल्या प्रत्येक अंशातच समुद्र असतो. हा उगम या गुंफेशेजारच्या आवारात पंधरा दिवसाच्या मुलासारखा वाढलेला दिसतो.

उगमाचे नि गुंफेचे तोंड लहानच असते. म्हणजे ते बाल असते. निसर्गभावाशी एकरूप असते. गुंफेत वाकूनच जावे लागते. जाता जाता पाठीला वाक आलेला असतो. गुंफा आपल्या वासनेच्या कडा मोडतात. भावना जपायला शिकवतात. या भावना जपायच्या असतील तर लहान मुलाचा तांबूसर हात लागतो. या हातात कोणतीही वस्तू नितळ दिसते. कारण त्या वस्तूचा लाभ काय आहे हे त्याला माहीत नसते. तो त्याच्या आनंदात हसऱ्या पृथ्वीवर वावरतो. आपल्याला उगाच वाटते की आपण त्याच्या हातात दिलेल्या वस्तूवर तो खूप होऊन हसतो आहे. यासाठीच मृगजळांचे खण सोडून दिलेले बरे, ते घराइतके लोभसवाणे वाटतात. पण त्यांच्या चटक्यांना शब्दच नसतात. गुंफांचे लहानपण यात साठलेले आहे. गुंफांच्या भाषा आहेत. गुंफांना पंचप्राण आहेत. गोरक्षनाथांना आपल्यातले हसरे, तांबूस मूल जपायचे. होते, म्हणून त्यांनी ही गुंफा जपली. गुंफांना चिरंजीवपदाची कायमची शेज असते.

वरोवर या गुंफेच्या पायथ्याशी निवृत्तीनाथांची समाधी आहे. जवळच्या गंगासागरात निवृत्तीनाथांनी वुडी मारली. छोटेसे अनुभवाचे तळे स्व-भावातून मांडता मांडता सागर बनले. अनुभवांचा अनुभव बनले. या समाधीने ब्रह्मगिरीच्या कुशीत कायमचे वास्तव्य केले. या मंदिराच्या पाठीमागे काही पायवाटा आहेत. त्या अनवट आहेत. कुणाला नेणिवेच्या डोळयातून त्या सापडतात. जाणिवेतून अशा वाटांच्या ओळखी फारशा टिकत नाहीत. या मंदिराजवळच्या पटांगणाशेजारच्या एका धर्मशाळेच्या कोपऱ्यात देवराम बुवा राहतात. फार वर्षांपासून ते राहतात. धर्मशाळेचे मॅनेजर बदलले. पण देवराम बुवांची जागा चिरंजीवपदासारखी राहिली.

थोडयाशा संधिप्रकाशावस्थेतच देवरामबुवांची खोली आहे. तसे तिला खोली म्हणता येत नाही. कारण तिला दरवाजा नाही. दरवाजा आला की मुखवटयांचे करारमदार आलेच. संकोचाच्या नव्या व्यवस्था आल्या. आपल्याच अहमचे नवे करार आले. यात काही जुने करारही मिसळून जातात. शेवटी आयुष्य कराराच्या तिरडीवर बांधून रडण्याच्या चितांसकट सुशोभित केले जाते. त्यात दरवाजांच्या कडया आणि खिटया आणखी बंदिस्त करतात. बांधाच्या पाण्याला वास येतो; वाहत्या पाण्याचा गंध आईच्या स्तनातल्या दुधासारखा.

देवरामबुवा म्हणजे नर्मदेतल्या महाविष्णुसारखा काळा, घोटीव. त्याला डोळे नव्हते. पण तो अतिशय डोळस होता. डोळियांचा डोळा त्याच्याजवळ होता. जन्मापासूनच पांडुरंगाने त्याचे डोळे मिटून ते आपल्यासारखे काळेदार केले. त्याला संसाराचा आणि अंधत्वाचा अभिमान होता. तो आपल्या सृष्टीचा विश्वामित्र होता. त्याच्या डोळयातल्या काळोखमायेच्या आवर्तनांच्या तो खूप खूप गोष्टी सांगे. कधी दोन्ही हात विठ्ठ खांद्यावर ठेवून तो ज्ञानेश्वर माऊलीशी बोली, कधी जमिनीवर हात ठेवून नामदेवासारखा पांडुरंगाशी लडिवाळ गोष्टी करी. परातीत बाजरीचे पीठ घेऊन ते मळतांना तो म्हणे, "जनीकडे जातो स्वयंपाकाला. माझ्याकडं यायला त्याला काय धाड झालीय होय." तेवढयात पांडुरंग किंवा रुक्मिणी येऊन त्याची भाकरी करून द्यायची. ते गेल्यावर तो म्हणायचा, "देवाऽऽ त्रास दिला बरंऽऽपण...हा त्रास तुम्हीच करून घेतलाय. मला काय त्याचं."

देवरामबुवा बुटके होते. स्थूल होते. गळयात तुळशीची माळ. कपाळी गंध-बुक्का. टक्कल. पांढरे धोतर, कोपरी, सदरा. जवळच कायम



अनुक्रमणिका

कंठाळी असायची. त्यात टाळ-वीणा असे. जवळच घोंगडी. एक शाल. एक ताटवाटी-तांब्या पितळेचा, वस्त्र. एवढाच देवरामबुवांचा संसार. सगळ्या वस्तू त्या त्या जागी असत. त्या घेतांना ते कुणालाही सांगत नसत. मात्र दुसऱ्या कुणी जर ती वस्तू दुसऱ्या जागी ठेवली तर बुवांची शिव्यांची आतिषबाजी चालायची. बुवांना सहानुभूतीचे गुलाब नसलेले गुलाबपाणी शिंपडणे आयुष्यात कधीही जमले नाही. छोट्याशा दोन तीन बाटल्यात तिखट-मीठ-मिरची-तेल असे. तीन दगडांची चूल. शेजारी काटक्या. त्या काटक्याही ते गोळा करीत त्या काडचापेटीच्या शेजारी रचून ठेवीत.

धर्मशाळेजवळच्या टाकीत चोवीस तास पाणी असे. त्यामुळे बुवाजवळ पाणी भरायला कळशीही नव्हती. रात्री झोपण्यापूर्वी ते आपल्या उशाशी तांब्या भरून ठेवीत. सहसा त्यांना तहान लागत नसे. त्यांच्या शेजारी झोपलेल्या साधूंना व वारकऱ्यांना ते पाणी देत. देवरामबुवा बोलायला अतिशय मधाळ. ज्ञानेश्वरी नि तुकोबांचा गाथा नुसता जिभेवर नाचे. कोणाही माणसाने रस्त्याने जाता जाता जरी "ज्ञानदेव तुकाऽऽराम" असा साधा जयघोष केला तरी बुवा त्या आवाजाच्या दिशेने वळून त्याला नमस्कार करायचे. माऊलीच्या गजरात लहानमोठ्यांची क्षणजीव नाती तटातटा तुटून पडत. नामस्मरणाच्या दरबारात सगळे सारखे. इथे नमस्कार ही शिवाशिवाची भेटच. दोन गंधभारल्या मनांनी मारलेली मिठी. अशा नमस्कारात आशीर्वादांची औपचारिक तोरणे बांधली जात नाहीत. श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या शिक्क्यांच्या पलीकडची ही खरी देवनाती असतात. बुवा नमस्कारून एखादी ओवी किंवा एखादा अभंगाचा चरण त्याच्या मुखात प्रसाद म्हणून घालणार. जाता जाता त्यांच्या खिशात कुणी पैसे घातले की "पुंडलीक वरदा हरी विठ्ठल" असा गजर करणारच. कुणी आवाज दिला की डोळस माणसापेक्षाही त्याचा हात हातात घेऊन कुटुंबासकट विचारपूस केल्याशिवाय बुवा त्याला एक पाऊलही पुढे टाकू देणार नाहीत. एखाद्या लहानग्या मुलाने बुवांचा सदरा ओढला कीं त्याच्या पाठोपाठ बुवा दुडुदुडु धावत आणि तिथेच गोकुळ होई.

भल्या पहाटे पाचच्या आतच देवरामबुवा घड्याळाचा गजर न ऐकता उठत. ते स्वतःच गजर होते. "पांडुरंग हरीऽऽ वासुदेऽऽव हरीऽऽ" अशी मोठ्याने हाळी देत छान आळोखा देत. आसपासच्या परिसरात बुवांची ही हाळी घुमे. ब्रह्मगिरीतल्या पहाटेला बुवांच्या जयजयकाराने जाग येई. बुवांच्या पायाखालचे रस्ते झाल्याने ते कुशावर्तावर येत. स्नान करीत. धोतराचा पिळा खांद्यावर घालीत. गोदावरीचे दर्शन घेत. थेट निवृत्तीनाथाच्या मंदिराचा रस्ता धरता धरताच ज्ञानदेवांच्या हरिपाठाला गोड आवाजात आरंभ होई. बुवांचा आवाज गोड. "हरिमुखे म्हणा हरि मुखे म्हणाऽऽ पुण्याची गणना कोण करी." ही ओळ पुनःपुन्हा म्हणतांना ते नाचत. आपल्या हातातल्या टाळेचा ताल देत देत ते रस्त्याने जात. ते रस्त्याने जायला निघाले की महामहोपाध्याय शुक्लशास्त्रींच्या सोवळ्या सपातांचा फतक् फतक् आवाज बुवांच्या कानावर येई. बुवा रस्त्याच्या मधोमध असत. सपातांच्या आवाजाने ते बाजूला होत. टाळ बारीक आवाजात करीत, सपातांचा आवाज जसजसा बुवांच्या जवळ आला की बुवा लवून टाळेसकट पाया पडत.

"पुंडलिका वरदे हाऽऽरीऽऽ विठ्ठल. श्री ज्ञानदेव तुकाराम." या जयजयकारात शास्त्रीबुवाही आपला आवाज मिसळत.

"काय बुवाऽऽ आज लवकर निघालात."

"आज एकादशी. आज निवृत्तीनाथमहाराजांना ज्ञानेश्वरीतला अकरावा अध्याय ऐकवायचाय. आज दर्शनाचीही गर्दी होणार. मग महाराजांना तो काही नीट ऐकता येत नाही. म्हणून लवकर जातो. आता एवढी गर्दी नसते. म्हंजे काकडारती झाली की मंदिरात फक्त महाराज नि मीच. म्हंजे मग आम्हाला निवांत बोलता येतं."

"व्वा ! बुवाऽऽ व्वा ! जे आम्हाला आयुष्यभर वेदांत घोकून समजलं नाही ते तुम्ही किती सहजपणानं सांगताय. व्वा ! व्वा !"

"च्...च्...म...महाराज...चुकलो असेल तर क्षमा करा. आपण वेदांती. महापंडित. आपल्यापुढं या काजव्यानं काय बोलावं."

"बुवाऽऽ तुम्ही जसं निवृत्तीनाथांशी बोलता ना तसं आम्हास नाही बोलता येत. खरोखर तसं आम्हास नाही बोलता येत."

"बहुतासुकृताची जोडी। म्हणुनी विठ्ठल आवडी." असं आपल्या कृपेनं जपलंय. आपण साक्षात् देव. आम्ही बुवाऽऽ बुऽऽ वाऽऽ" देवरामबुवांच्या या वाक्यावर दोघेही पहाटवाऱ्यासारखे शिरशिरून हसले.

पुन्हा देवरामबुवा टाळ घेऊन नाचत हरिपाठ म्हणू लागले. बुवा तल्लीन झाले, त्यात त्यांना काहींनी दुरून नमस्कारिले. काहींनी जवळ जाऊन रामराम केले. बुवांनी त्यांना मान डोलावली. बुवा गात होते, "ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड। गगनाहुनी वाड नाम आहे." बुवा आपल्या गगनात गुंगले. ते त्यांच्या आकाशाचे स्वामी होते. त्यांच्या पाठोपाठ माऊलीही म्हणते आहे की काय असे त्यांना वाटल्याने ते सारखे मागेपुढे करीत होते. मागे आई नि पुढे पिता असतो. पाठीशी करुणा नि पुढ्यात कर्तृत्व असते. यातूनच प्रकृती घडते. तीच घडवते नि बिघडवतेही. ती 'ती'ही उरत नाही. बुवा आपल्या आकाशात मस्त होते. तोच हातभर बांगड्यांनी भरलेला सौभाग्यनमस्काराचा आवाज बुवांच्या कानी आला.

"आईऽऽ आईऽऽ—ज्ञानेश्वर माऊली कीऽऽ जय."

"बुवाऽऽ आज वारं खूप सुटलंय. अंगात काही तरी घाला ना."

"आईऽऽ आत्ताच तर चंद्राची चादर काढलीय. बघा. बघा."

"किती फाटलीय तीऽऽ–अंगात सदरा तरी घालायचा."

"माऊली सांभाळतेय की. त्यामुळं वारा काय आपल्याला करणार. आईऽऽ वारं अंगात भिनल्याशिवाय निवृत्तीनाथ दिसत नाही ना. मग काय."

"बुवाऽऽ तुम्ही काय बोलू देणार आहात थोडंच."

"आईऽऽ आईनं अबोला धरला तर लेकरानं जायचं कुठं. सांगा ना."

"आज फराळाचं ताट घरी येईल. लक्षात ठेवा हं."

देवरामबुवांनी नमस्कार केला. पुन्हा "हरिमुखे म्हणाऽऽ"ची धून सुरू झाली. निवृत्तीनाथांच्या मंदिराच्या दरवाजात बुवा उभे राहिले "कोणाचे हे घर, हा देह कोणाचा। आत्माराम त्याचा तोचि जाणे" हा शेवटचा अभंग बुवांनी ऐकविला. महाराजांना साष्टांग दंडवत घातला. समाधीवरून मायेने हात फिरविला. समाधीवरचा बुक्का कपाळी लावला. एक तुळशीचे पान मस्तकावर ठेवले. आपल्या गळ्यातल्या तुळशीच्या माळेतला मेरुमणि समाधीवर ठेवून तो आपल्या ललाटी लावला. ओठातल्या ओठात काही पुटपुटले. समाधीपाशी थोडा वेळ बसले. सभामंडपात आले. अत्यंत स्पष्ट व गोड आवाजात बुवांनी विश्वरूपदर्शन महाराजांना दाखविले.

देवरामबुवा आपणहून कधी मागत नसत. कुणाच्या तरी मनातला नारायण जागा होऊन तो आपल्याला सहाय्य करतो अशी त्यांची श्रद्धा होती. कधी काळी आपल्या पंच ज्ञानेंद्रियांच्या ठिकाणी असणारा पांडुरंग साक्षात प्रेरणेतून आपल्यावर छाया धरतो असं त्यांना वाटे. पण त्यांची जिद्द जबरदस्त होती. त्यांना सबंध ज्ञानेश्वरी मुखोद्गत होती. गाथा तर त्यांनी भजनांमधून नि कीर्तनांमधून तोंडपाठ केली. ज्ञानेश्वरी कशी काय त्यांच्या अंगात भिनली याचा अचंबा वाटे. अर्थात् आश्चर्याच्या जागाच मर्यादा सिद्ध करतात. शक्याशक्यतेची कुंपणे अनुभव तोडून टाकतो, म्हणूनच तो ब्रह्मगिरीवर आरूढ होऊ शकतो. बुवांचा हा अनुभव अशा प्रकारचा होता.

"बुवाऽऽ–तुम्ही ज्ञानेश्वरी कशी काय पाठ केलीत ?"

"अरे वेड्याऽऽ, ज्ञानेश्वरी हे पुस्तक नाही–तो अनुभव आहे. नि अनुभव वाचता येत नाहीत. वाचवून घेता येत नाही. नि एकदा आपणच अनुभवरूप झालो की त्यातून वाचता येत नाही. अनुभवाचा गर्भ अनुभव असतो. तो अनुभवाच्याच शरीरातून बाहेर पडतो. जो कुणी आपल्या अशा अनुभवाचं विश्लेषण करतो ना त्याला अनुभवानंच खाल्लेलं असतं. खरा अनुभवी योगीच असतो. तोच माऊली होऊ शकतो."

"........" बुवा काय काय बोलले. ते अनुभवच झाले.

"अरे, आमच्या गुरुवर्य सोनुमामांची अठरा चातुर्मास ज्ञानेश्वरी ऐकली. साखरे महाराजांबरोबर ज्ञानेश्वरीच्या पालखीचाच मी भोई होतो. जो जो पालखीचा भोई झाला ना, तोच अनुभवाची ओवी झाला."

बुवांनी खिशातून खडीसाखरेचे दोन खडे तोंडात टाकले. म्हणाले, "सोनुमामा म्हंजे माऊलीचाच अवतार. ज्ञानेश्वरी अशी सुंदर लावायचे की ओवी पाठ झालीच पाह्यजे. त्यांचा अर्थ त्या ओवीच्या पाठोपाठ धावत धावत मनात उतरलाच पाह्यजे. ज्ञानेश्वरी वाचायची नसते, लावायची असते. लावण्यातच रचनाकौशल्य असते. माऊली काय मजा करते ते इथे समजते. सोनुमामा देहभान हरपून बोलत. ते जीव लावून ऐकू. मग ते अंगात भिनता भिनता अंगच होई. अशी ज्ञानेश्वरी आली," देवरामबुवा बोलत होते ब्रह्मगिरीच्या कडयावरून सुटणाऱ्या गोदावरीसारखे बोलता बोलता ते मोहरत. सर्वांगावर रोमांच उभे राहात. तेव्हा ते क्षितिज होत. अनेक प्रश्नांचे पर्वत ते उभे करीत.

पौष वद्य एकादशीला निवृत्तीनाथांची वारी, अवघा वैष्णव त्र्यंबकेश्वराच्या रस्त्याला लागे. दिंड्यांच्या रांगा मुंग्यांच्या पावलाने चालत. त्र्यंबकेश्वर पंढरपूर होऊन जाई. बैलगाड्यांच्या ताफ्यात नि तुळशी वृंदावनाच्या थाटात दिंड्या निघत. नाशिकच्या काळ्यारामाचे दर्शन घेऊन दिंड्या त्र्यंबकेश्वरी जात. महाराष्ट्राचा सांस्कृतिक बुक्का संस्कृतीच्या अभ्यासकांनी खरा इथे लावावा. अस्सल मराठी वळणाची सांस्कृतिक ओवी; देशी शब्दांच्या घरट्यांमधून उडालेली तुकारामांची अभंगपांखरे; विशाल वटवृक्षासारख्या विसावलेल्या एकनाथी भागवतातील सूरपारंब्या; मिळेल त्या सूर्यास्ताच्या काठाशी रात्रीपुरता गाव वसवून तीन दगडांच्या चूलकंदिलात स्वयंपाक करता करता भाकरीसारखी जीवन देणारी ज्ञानोबाची ओवी; जेवणानंतर पाय नाचवणारा ज्ञानदेवांचा हरिपाठ या सगळ्या जाणिवांच्या आभाळगाभाऱ्यातून दिसलेले निर्मळ जीवन बघायचे असल्यास दिंडी बघावी. दिंडी चालत नसते. ती घडवत असते. आपल्याला जीवन कसे जगावे हे सांगत असते. दिंड्यांच्या वनातच जीवनरसाची सरोवरे तुडुंब भरलेली असतात.

देवरामबुवांना निवृत्तीनाथांच्या एकादशीस अतिशय आनंद वाटे. सगळ्या माहेरवाशीणी एकत्र आल्या की घराला जसे कुइरीचे सौभाग्यरूप येते तसे, देवरामबुवांना होई. संतांची मांदियाळी ह्नीऽऽएकत्र येई. ज्ञानदेव माऊलीचे गुरू. परात्पर गुरु. पुनर्जन्माचा वारसा ज्ञानाच्या माध्यमातून एकत्र देणारे गुरू. नव्या ज्ञानाच्या वाटा जीवनावर वसविणारे गुरू. त्यामुळे या वारीचे महत्त्व काही और असे. सोनोपंत दांडेकर, धुंडामहाराज देगलूरकर, श्रीकृष्णदास लोहिया महाराज, शंकर महाराज खंदारकर, रामचंद्र महाराज नागपूरकर अशी वारकरी संप्रदायातली आचार्य मंडळी एकत्र यायची. त्यांचे ज्ञानसंमेलनच असे. भक्तीने ज्ञानावर सावली धरल्यानेच अहंकारांचे काळेकुट्ट कालकूट कधीही अंगावर येत नाहीत. यासाठी वारी करायची. दुःखे निवारण्यासाठी वारी करायची.

या सगळ्यांचे अध्वर्यु सोनोपंत दांडेकर होते. ते त्र्यंबकेश्वरला आले की प्रथम देवरामबुवांची चौकशी करीत. एकदा बुवांची आणि सोनोपंतांची भेट झाली नाही, सोनोपंत अस्वस्थ झाले. त्यांनी बोधलेशेठजींची गाडी घेतली. बोधलेशेठजी व सोनोपंत देवरामबुवांच्या धर्मशाळेत आले. सोनोपंत आले म्हणताच धर्मशाळेतल्या वारकऱ्यांनी नाचायला सुरुवात केली. त्यांच्या पाया पडायला सुरुवात केली. शेवटी कशीबशी वाट काढीत ते देवरामबुवांच्या ओवरीपाशी आले. तो ओवरीत बुवा नव्हते. सोनोपंतांनी आसपास चौकशी केली. पण लोकांच्या नमस्कारांनी त्यांना थांबणे अशक्य केले. शेजारी निरोप ठेवला. ते पुन्हा वाट काढीत निघाले. गर्दीतून देवरामबुवा 'हरिमुखे म्हणा' ओरडत वाट काढीत येत होते. बुवांच्या कानात कुणीतरी कुजबुजले, "सोनोपंत तुमच्याकडे आले." एवढे वाक्य ऐकताच बुवा वाऱ्यासारखे सुटले. येईल त्याला बाजूला करीत "मामाऽऽ मामाऽऽ" ओरडत निघाले. सोनोपंतांनी त्यांचा हात हातात

घेतला. तोच बुवांनी त्याच्या पायावर डोके ठेवून पाय चेपले. सोनोपंतांना गाढ आलिंगन दिले. बुवांना शब्दच मिळेना. कारण पलीकडच्या अनुभवाला शब्दांची शरीरे तोकडी पडतात.

"बुवाऽऽ...चलाऽ चलाऽऽ..." सोनोपंतांनी बुवांचा हात धरला. बोधलेशेठजींनी वाट काढली. ते पुन्हा बुवांच्या ओवरीपाशी आले.

"बसा. बसा. पांडुरंगाऽऽ. काय त्रास घेतलाऽऽ" बुवा म्हणाले.

"आल्या आल्या तुम्ही भेटला नाहीत बुवा. मी चौकशी केली. पण तुमचा सुगावा लागेना. कीर्तनात पांडुरंग नाचला नाही; गायला नाही; तर मग काय मजा येणार. बुवा कीर्तनात गायला नाही तर मजा काय येणार. बुवा म्हणजे आमचं कीर्तन आहे कीर्तन." सोनोपंत देवरामबुवांच्या पाठीवर हात फिरवीत म्हणाले.

"आपली कृपा आहे. नाहीतर 'काय म्यां पामरें। बोलावी उत्तरें। परि त्या... चुकलो. तुम्हाला मी ऐकवणं म्हंजे पुंडलिकाला पांडुरंगाबद्दल सागण्यासारखं आहे." देवरामबुवा हात जोडून हसत हसत म्हणाले.

"व्वा! बुवाऽऽ" सोनोपंतांनी बुवांना टाळी दिली.

"मी आहेच कीर्तनात. जोपर्यंत प्राण आहेत तोपर्यंत मी तुमच्या कीर्तनात टाळकरी आहेच. तुम्ही एवढ्यासाठी आलात. मग कुणाबरोबर निरोप धाडायचा. तुम्ही येण्याचे कष्ट घेतले मला ते कसंसं..."


"पण तुम्हाला भेटायचं असलं तर?" सोनोपंतांनी विचारले. "अहोभाग्यमहो भाग्यं. याच्यासारखा साक्षात्कारी वार नाही." बुवा म्हणाले.

संध्याकाळी निवृत्तीनाथांच्या पटांगणात लाखोंनी समुदाय गोळा झाला. देवरामबुवांनी टाळ घेतली. ते सोनोपंतांच्या पाठीशी उभे राहिले. दोन हजार टाळकऱ्यांचे अर्धवर्तुळ ब्रह्मगिरीला दुसरे क्षितिज करून गेले. मधोमध वीणा घालून सोनोपंत उभे राहिले. त्यांनी निवृत्तीनाथांना, वीणेला, समोरच्या श्रोत्यांना आणि मुख्य टाळकरी देवरामबुवांना नमस्कार केला. बुवांनी डोळे नसून त्यांच्या नमस्कारास डोळे असणाऱ्यापेक्षाही प्रतिनमस्कार बरोब्बर केला. सोनोपंत म्हणू लागले, "हेचि थोर भक्ती आवडते देवा। संकल्पाची माया संसाराची." हा तुकारामांचा अभंग सोनोपंतांच्या पाठोपाठ बुवा तन्मय होऊन गाऊ लागले. बुवांच्या आवाजाला सोनोपंतांची दाद मिळू लागली. बुवा आळवणीतून भक्तीची थोरवी गात होते. सोनोपंत निरुपणातून भक्तीचा महिमा सांगत होते. बुवा नाचून नाचून गात होते. अधूनमधून निरूपणातील अवतरणांच्या जागा बुवा सोनोपंतांच्या मागून लगेचच उचलून गात होते. कीर्तनात रंग भरला, रंग पांडुरंग झाला. लाखोंच्या टाळयात देवरामबुवा नाचून गात होते. सोनोपंतांच्या निरूपणाने बुवांना डोळे फुटत होते. डोळे डबडबून येत होते. ब्रह्मगिरीच्या सणसणीत वाऱ्यातही बुवांचा आवाज उत्तम लागला. कारण बुवा गळयातून न गाता मनापासून गात होते. निरूपणाचा आनंद लुटत होते.

निरूपण संपले. सोनोपंतांनी बुवांना आपल्याजवळ बोलावले. आरत्या म्हणायला सांगितले. बुवा सगळयाना घेऊन आरत्या म्हणत होते. शेवटी "विठ्ठल" म्हणत बुवा नाचले. सोनोपंताना आलिंगन दिले.

सोनोपंत गाडीतून निघून गेले. बुवा ब्रह्मगिरीच्या ओवरीत घोंगडयावर पडले. त्यांनी चंद्राची चादर ओढली. क्षणात बुवा घोरू लागले. आपल्या आयुष्याच्या कृतार्थतेची समज त्यांना चंद्राने दिली. ब्रह्मगिरीने त्यांना सांभाळले. निवृत्तीनाथांनी पालनपोषण केले. त्यामुळे त्यांच्या गावाचा ठिकाणा हाच होता, हीच त्यांची कुळवाडी होती. जीवनावर उदंड प्रेम करणारे हे भक्त चांद्रायणवासीच असतात. अशांना ग्रहणवासीयांनी दैहिक प्रश्न न विचारलेले बरे. कारण त्यांच्या चादरी चंद्राच्या असतात नि प्रकाशाच्या कुळाचे ते उपाध्याय असतात.

□□



# आवर्त

कमलाकर दे. हनवंते

पाच वर्षात अनेकान्त भेटला नाही असं कधीच झालं नाही. परंतु आज तो ठरलेल्या ठिकाणी मला भेटला नाही. शेवटी- त्याची भेट घेण्यासाठी घर शोधत त्याच्या घरी गेलो. दुरूनच त्याचं घर बघून मला धक्का बसला.

कल्पनेने त्याचं मी साधंसुधं घर रेखाटलं होतं.

त्याच्या आचार–विचारावरून ! वास्तवात बघायला मिळाला भव्य नेत्रदिपक बंगला !

आनंद झाला. अनेकान्त गर्भश्रीमंत आहे.

भौतिक सुखाची गंगा त्याच्या पायाजवळून वाहते.

ढोंग नाही की प्रतिष्ठेचा वडेजावपणा नाही.

कधी त्याने बोलण्यातून, वागण्यातून श्रीमंतीची जाणीव होऊ दिली नाही. चार–चौघासारखी साधी राहणी. अशा त्याच्या साधेपणामुळं माझा तर्क चुकला.

अत्याधुनिक झगमगाटात मला बसवेनासं झालं. आलोच आहो तर काहीतरी बोललं पाहिजे, नाहीतर अनेकान्तला वाईट वाटेल. म्हणून काही मिनिटं तरी तो बोलतो काय, याची प्रतीक्षा करीत बसून राहिलो.

आता बोलेल नंतर बोलेल करता करता घड्याळाचा काटा पुढे सरकू लागला, तशी माझी अस्वस्थता वाढली. ती वाढतच गेली तरीपण त्याची बोलायची इच्छा होईना. आता इथे थांबण्यात अर्थ नाही. शेवटी निश्चयाने सोफ्यावरून उठलो, तसा त्याने माझा हात धरला आणि जबरदस्तीने मला सोफ्यावर बसवलं. म्हणाला, 'सर, तुम्ही माझ्या घरी यायला नको होतं !" मला अनपेक्षित धक्का बसला. डोळे गरगर फिरले. मन पेटून उठलं.

पाच वर्षात कितीदा तो आपल्याला भेटला. परंतु चुकून त्याने घराचा उल्लेख केला नव्हता, आणि आज तर आपण त्याला न सांगता अनाहुतासारखं वागलो, हेच आपलं वागणं आणि येणं त्याला आवडलं नसेल. ही चूक आपण केली, आता त्याला दोष देण्यात अर्थ नाही. मनाला आवर घातला. वळे–बळे चेहऱ्यावर हास्य आणले.

"सर, वाईट वाटलं ना तुम्हाला ! मला माफ करा ! कृपा करून माझ्याबद्दल गैरसमज करू नका !" अशी त्याची केविलवाणी अवस्था आणि भेदरलेले डोळे कधीच बघितले नव्हते, ज्या डोळ्यात मला तेज दिसायचं. "सर, माणूस केवळ 'प्रेमळ' शब्दांची पखरण करू लागला तर, माणसाचं जीवन सुखी बनेल; शब्दांत सरगम आहे. असं समजून बोलू लागला तर कोरड्या जीवनात ओलावा निर्माण होईल. परंतु असं होत नाही. नाही तिथे मनुष्य शब्दांत कंजुषपणा करतो. आणि नाही तिथे...म्हणजे स्वतःची तुंबडी भरण्यासाठी शब्दांचा अवमान करायला भीत नाही. जाणून–बुजून शब्दांत लाळ निर्माण करतो. पण ती लाळ फसवी असते. इथेच माणूस फसतो. अशी फसवा–फसवी बंद झाली की, माणूस सुधारल्याशिवाय राहणार नाही; असं मला वाटतं !"

याचपायी मी अनेकान्तमध्ये हरवलो होतो. तेच डोळे आज दयेची याचना करीत होते. त्यामागे मला भीती जाणवली. मी त्याची केविलवाणी अवस्था बघू शकलो नाही. मी त्याच्याजवळ गेलो. खांद्यावर हात ठेवला. त्याला भडभडून आलं. डोळे ओले झाले. ओठ हलू लागले. माझं मन गहिवरलं. मी त्याचे अश्रू पुसले, तसा तो हमसून रडू लागला. मला काहीच सुचेना ! आपण त्याच्या जखमेवर मीठ तर चोळलं नाही ना ?

"सर, कुणाजवळ तरी मन मोकळं करावं, असं मला वाटायचं. तुम्ही भेटले. माझं दुःख ऐकून घेणारे. जिव्हाळ्याचे. एकटे. एक दिवस तुम्हाला मी घरी बोलावणार होतो. सारं काही सांगणार होतो. अचानक आज तुम्ही आलात, याचा आनंद... परंतु काका घरी असते तर..."

काकाची त्याला एवढी भीती वाटावी ? त्याचं मन याच भितीपायी दुखावल्या गेलं असेल, यात शंका नाही. काकाचा आणि अनेकान्तचा संबंध काय ? इतकी भीती का म्हणून ?

वाटलं होतं, आपल्याला बघून त्याला खूप आनंद होईल. आपल्याला बोलायला संधीसुद्धा देणार नाही. परंतु आपण जे ठरवलं होतं, त्याच्या अगदी उलट घडलं. आपण हसलो, तो हसला नाही की बोलला नाही. 'या बसा' म्हणायचा औपचारिकपणासुद्धा त्याने दाखविला नाही. आपण मान–अपमानाचा विचार करून, गैरसमज केला असता तर पाच वर्षांचे घनिष्ट संबंध क्षणात तुटले असते. आणि शेवटी पश्चात्ताप करण्याची वेळ आली असती.

अनेकान्तच्या वागण्याचं कारण कळल्यामुळे मनावरचं ओझं कमी झालं खरं...परंतु त्याला काकाची इतकी भीती का वाटावी ? राहून–राहून माझ्या मनात प्रश्न निर्माण होत होता. परंतु काही केल्या उलगडा मात्र होईना...

"सर, तुम्हाला आठवते...?"

त्याच्या प्रश्नामुळे माझी उत्सुकता वाढली. परंतु अर्थबोध झाला नाही.

"नाही आठवणार, बरेच दिवस होऊन गेले ना... ठीक आहे सर, मीच सांगतो."

आता तो काय सांगणार आहे ते ऐकून घ्यावं, असं ठरवलं.

तो खुर्चीतून उठला. स्वतःला सावरलं. हॉलभर नजर फिरवली. आतल्या दारात जाऊन आला. आत कुणी आहे का त्याचा शोध घेतला. असं त्याचं वागणं मला वेड्यासारखं वाटलं. संस्कृती-बद्दल सडेतोड बोलणाऱ्या अनेकान्तला स्वतःच्या घरात मोकळं बोलायची भीती वाटावी. इतकी की दोन-चार वेळा आत-बाहेर यावं. माझ्याकडे बघून हसावं, हातानेच खुणेनं सांगावं. थांबा. सांगतो...कुणी नसल्याची सर्व खात्री पटल्यानंतरच त्याचा अवघडलेला चेहरा सैल बनला. पूर्वीसारखे भाव आले. परत एकदा त्याने खात्री करून घेतल्यानंतर आलमारी उघडली. आत काहीतरी शोधू लागला. तेवढ्यात फोनची घंटा खणखणली.

'काकाचा फोन...' थरथरत एका दमात त्याने आलमारी बंद केली आणि धावतच फोन उचलला...सारं क्षणात घडलं. परंतु तेवढ्या वेळात अनेकान्त घामाघूम झाला. भीतीने बोबडी वळली. त्याचा एक डोळा माझ्याकडे तर दुसरा डोळा फोनकडे ! इतकी भीती ? तीही काकाची ? मला स्वतःला त्याचा भावव्याकुळ-भीतीदग्ध चेहरा बघवला गेला नाही. वाटलं, चूक केली, आपण अनेकान्तची भेट घ्यायची. उद्या भेटला असता. परंतु आजपर्यंत कधीं घडलं नव्हतं ना... धड् त्याला उभं सुद्धा राहता येत नाही, इतकं त्याचं अंग थरथरायला लागलं, तेही फोनवर. समोर काय स्थिती होत असेल ?

थरथरत त्याने फोन कानाला लावला...

'हं...हं...ठी...ठीक आ...आहे. रात्री एक वाजता...येणार तुम्ही. नाही. मी कुठेच जात नाही." त्यानं फोन खाली ठेवला. तोंडावरून, डोक्यावरून हात फिरवीत दोन्ही हातांनी क्षणभर डोकं गच्च दाबून धरलं. थकल्यागत एक एक पाऊल टाकीत त्यानं माझ्यासमोरच्या खुर्चीत स्वतःला झोकून दिलं. किती ताण, दबाव...असाच मानसिक आघात होत राहिला तर...

तो नुसता बसून होता. मी बोलायचा प्रयत्न केला नाही. त्याची भीती आणि गूढ वातावरणात माझ्यावरच गुदमरून जायची वेळ आली.

अनेकान्त, पंचविशीचा, उंच, सुडौल बांधा, गौरवर्णी, टपोऱ्या डोळ्यांचा. पदवीधर. व्यासपीठ गाजवणारा. निर्भय. सदा हसतमुख, हट्टा-कट्टा, पण मनाने इतका कमजोर, भित्रा कसा ? बाहेर तर सात्विकतेचं तेज त्याच्या चेहऱ्यावर ओसंडतं. त्यावरून त्याच्या मनाच्या भित्रेपणाची कल्पना येऊ शकत नाही...

अनेकान्तने स्वतःला सावरले. तोंड भरून हसला. चेहऱ्यावर क्षणापूर्वीचं एकही लक्षण शिल्लक नव्हतं. परत मला आश्चर्य वाटलं. पक्का नाटकी... अभिनयकुशल. क्षणात भीती तर क्षणात...

'सर, माझं हे रूप बघून तुम्हाला निश्चित आश्चर्य वाटलं असावं.

नेमकं तो माझ्या मनातील बोलला होता. मनकवडा !

'अनेकान्त, कुणाचा होता रे फोन...?'

'काकांचा...!'

'मग, फोन घेण्यासाठी तुला इतकी भीती...?'

'सर, माझ्या ठिकाणी तुम्ही असते तरी...'

चक्क त्याने मला त्याच्यात ओढले. ओढू द्या ! दुर्लक्ष केले.

'तू मला काही तरी सांगणार होतास ना...'

'अरे हां...विसरलोस की...आता रात्रीचे बारा वाजले तरी हरकत नाही. सर, काकांचा फोन समजून जेव्हा उचलला तेव्हा भीतीने गारठल्या-सारखं वाटलं. तुम्ही यायचे आणि काकाचा कुणी-तरी माणूस यायचा-त्यांनी तुम्हाला बघायचं आणि तेच काकांना सांगायचं...'

'काका, माणूस आहे...सांगितलं असतं तर काय झालं असतं' रागारागानेच मी त्यास म्हणालो.

'तसं काही नसतं झालं सर पण...' शक्ती संपल्यागत तो माझ्याशी बोलला... काकाच्या भीतीचं भूत अनेकान्तच्या मानगुटीवर बसलं...होतं.

क्षणातच अनेकान्तचा उत्साह पूर्ववत उतू जाऊ लागला.

आलमारी उघडली. त्यातून त्यानं दोन मोठे अलबम बाहेर काढले. एक माझ्या पुढ्यात टाकला आणि म्हणाला,

'याला म्हणतात योगायोग, तुम्ही अचानक यायचं आणि काकांना काम निघायचं. झालं ते चांगलंच झालं. जे उद्या–परवा केव्हा तरी तुम्हाला सांगणार होतो, ते आज सांगणार आहे.'

बोलत असतांना परत त्याने आतमधला कानोसा घेतला...आता तर शुकशुकाट होता. तरीपण तो वारंवार आत डोकावीत होता. मला राहवल्या गेलं नाही...मी त्याला विचारलं,

'अनेकान्त, आत कोण आहे?'

'काकू...'

'काकू ?'

'काकू झोपल्या आहेत. आणि सहसा त्या हॉल-मध्ये येत नाहीत. तरीपण दक्षता घेतलेली बरी!'

त्याही बोलण्यातून भीतीचा वास होताच. आणखी काकूबद्दल विचारावं, असं मला वाटलं... तेवढयात त्याने अलबम माझ्यासमोर धरला. त्यातील छायाचित्र दाखविलं...मला धकाच बसला क्षणभर काय बोलावं ते सुद्धा सुचलं नाही...

'अनेकान्त, हे तुझे कोण ?

'माझे काका...'

'आता माझ्यावर गर्भगळीत व्हायची वेळ आली नव्हे क्षणभर सून्न झालो. आता मला अने-कान्तच्या मनावरील भीतीच्या ओझ्याची कल्पना आली...'

□ □ □

व्यासपीठ. वक्त्यांचं श्रोत्यांशी हितगुज सुरू आहे.

श्रोतृवर्ग तल्लीन झालाय.

अनेकान्त माझ्या बाजूलाच बसलाय. म्हणतो,

'सर, अध्यक्ष बघा कसे ऐटीत बसले आहेत. परंतु त्यांची ऐट उसनी आहे. ऐकायचं..."

'अनेकान्त वडीलधाऱ्या मंडळींना असं म्हणायचं नसतं.'

"म्हणायला नको तशी लायकी हवी! या माणसाने तर इस्टेटीखातीर भावाचा गळा दाबला. हे कुणाला तरी खरं वाटेल?"

अनेकान्तचं काय चुकलं होतं...जे झालं ते होऊन गेलं. आता त्याला भीती का वाटावी?

कारण शोधत होतो. परंतु नीट विचार काही जुळत नव्हते. काय बोलावं, कशी समजूत घालावी...भीती कशी घालवता येईल...नुसते प्रश्न.

"सर, तीन–चार वर्षांचा असताना बाबा असे गेले ते आता आता कळलं. तेही काकांकडूनच... त्यांच्या आधाराने मी एवढा मोठा झालो..."

बोलत असताना दुसरा फोटो त्याने मला दाखवला. त्याच्या डोळ्यातून अश्रू टपटपू लागले. मी फोटो बघूनच समजून चुकलो होतो...फोटो त्याच्या वडिलांचा होता. अनेकान्त वडला-सारखा. चेहऱ्यावर भाव तेच. माझं मन गहिवरलं.

"सर, बाबांनी फक्त काकांना राहण्यासाठी जागा मागितली होती. तेवढं जागेचं दान तर काकाने दिलं नाही. परंतु या जगातून त्यांची कायमची सुटका करण्यात तीळभर कसूर केली नाही. अन् आई..."पुढलं बोलता–बोलता तो थांबला.

केवळ जागेसाठी जीव घेणाऱ्या माणसाच्या सहवासात अनेकान्त राहतो आहे...आईचं तो तर सांगूच शकला नाही. भीतीपायी एका सुस्वभावी तरुणाचे पतन उघडया डोळ्यांनी बघत होतो. ऐकायला मिळालं ते नवलाईचं. अनपेक्षित.

"सर, काकाने बाबांचा आईसमोर गळा दाबला. आई ते दृश्य बघून बेशुद्ध झाली. भ्रमिष्ट बनली. त्याचसाठी काकांनी आईसमोर... काका दुष्ट काव्यात यशस्वी झाले, अन् मी. आई-वडिलाच्या प्रेमाला पारखा झालो. अनाथ झालो..."

तो हमसून रडू लागला.

माझ्यासमोर त्याचं कसं सांत्वन करावं हा प्रश्न. तो रडत होता...तोच आतून काहीतरी खडखड् ऐकायला आली. तसे अनेकान्तने झटपट डोळे पुसले आणि धावतच आत गेला.

अनेकान्त भीतीमुळे पोखरायला लागलाय. धड् त्याला आपल्या वेदना सुद्धा सांगता येत नाहीत. क्षणभर विचारात गुरफटलो अनेकान्तच्या प्रतीक्षेत.

"सर, हा माझ्या आईचा फोटो. पागल. वेडी. वेदनेसह जगली. जगाने तिला वेडी ठरवलं. पागल म्हटलं. आणि वेडाच्या भरात तिनं जाळून घेतलं. वेडीच ती. या पलिकडे तिला अर्थ उरला नाही. सर, ही माझ्या आईची कहाणी!"

मी सुद्धा स्वतःला आवरू शकलो नाही.

अनेकान्तसारखे टपोरे डोळे. कपाळावर कुंकू. नजरेत निरागसता. सोज्वळ, शालीन गृहिणी.



अनुक्रमणिका

आणि हिला वेडी म्हणावं ? आघातावर आघात यावरही कळस म्हणजे तिचा जाळून मृत्यू.

"सर, बाबा गेले त्याच्या मागोमाग आईने जाळून घेतलं...तेही पोटातील अर्भकासह ! बाबांचा जीव घेतला हे आई कुणाला तरी सांगेल, या भीतीपोटी काका आईला घराबाहेर पडू देत नव्हते. काकू खायला पुरेसं देत नव्हती. आई मोलकरीण बनली. क्षणभर तिला कामातून उसंत मिळत नव्हती. त्यात ती दोन जीवाची. बस-उठ करीत कामं करायची. वरून काकूचा तोंडपट्टा सुरू असायचा. माझ्या अंगाला हात लावायची तिला मनाई. मला जवळ घेण्यासाठी तिने काकूचे पायसुद्धा धरले. शेवटी आईला राहावल्या गेलं नाही. आईने मला पदराखाली घेतलं. पटापट पापे घेतले. गोंजारलं...तिचा तो अंतिम क्षण ठरला...तेवढेच मला आईचे प्रेम मिळाले. विसरून न विसरणारे...तेच काकूला सहन झालं नाही. आईच्या अंगावर रॉकेल ओतलं...मला फरफटत बाजूला ओढलं. आणि स्वतः काकूने आगपेटी..."

"बस-बस अनेकान्त...मी त्याचं तोंड दाबलं. गूढ वातावरण...मीच त्या वातावरणाचा भेद करीत अनेकान्तला म्हणालो, 'एवढं सारं घडलं असतांना तू त्यांच्यात राहतो...?"

"मला अपेक्षित होतं सर, तुम्ही हे विचाराल म्हणून...

लहानपणीच माझे पंख तोडल्या गेले. समजायला लागलं तेव्हा दूर कुठेतरी निघून जावं, असं सारखं वाटायचं. दोन-चारदा प्रयत्न केला. पण..."

'पण काय अनेकान्त ?'

'ताईमुळे माझे प्रयत्न यशस्वी झाले नाहीं...!

'कोण ही ताई ?'

त्याने अलबमचं एक पान उलटून दाखविला. 'सर ही माझी ताई. काकाची एकुलती एक मुलगी. याच ताईमुळे माझी जगायची इच्छा कायम राहिली. मला घासातला घास द्यायची. जिथे ती जायची तिथे मला न्यायची. मला सोडत नव्हती. क्षणभर मला विसरत नव्हती. तिचे लाड ते माझे लाड. तिचं मन कुणी दुखावत नव्हतं. ती माझं मन दुखावत नव्हती. त्यामुळे तिच्यासारखेच माझे लाड झाले.

शाळेत, कॉलेजमध्ये सोबतच शिकलो. अशा ताईमुळं मला जगावं लागलं. तिचं मन मला नाराज करायचं नव्हतं. मागच्या वर्षी तिचं लग्न झालं...त्याच्या दुसऱ्या दिवशीच मी पोरका झालो...आवर्तात गुरफटलो. यातून मी बाहेर पडू शकणार नाहीं. सर, दुःखाचं ओझं कमी व्हावं, म्हणून मी तुमच्याशी बोलत होतो. हसत होतो. माझं दुःख कुणाच्या वाटचाला येऊ नये,...त्यासाठी बोलत होतो...."

मला अर्थबोध झाला नाही बुचकळ्यात पडलो...

"सर, तो क्षण आजही माझ्या डोळ्यासमोर आहे. नेहमीसारखा, न विसरणारा...कधी-कधी तर आईची आठवण होते. एखादा चक्क मृत्यू दिवस वाटतो. कधी-कधी तर असं वाटतं की सारे पाश झुगारून सारखं पळत सुटावं. पळता-पळता मृत्यू कसा आला ते सुद्धा कळू नये ! असं वाटतं, तेव्हा नेमकी ताईची मूर्ती डोळ्यासमोर उभी राहते."


"अनेकान्त आई बाबांना सांभाळ. माझी आठवण त्यांना व्हायला नको. एक क्षणभर त्यांना दूर लोटू नकोस ! अनेकान्त मला वचन दे ! मला विश्वास आहे अनेकान्त, तू आई-बाबांना माझी आठवण होऊ देणार नाहीस !" ताईला मी वचन दिलं...ज्या ताईनं मला जीवदान दिलं. त्या ताईचा मी विश्वासघात करू ? तिने तर चक्क पदर पसरून काका-काकूच्या जीवनाची मला भीक मागितली ! आणि काकांना वाटतं, मी त्यांचं खरं रूप लोकांना सांगितलं तर...सर, अशी माझी कैचीत सापडल्यासारखी परिस्थिती झाली आहे...आता तरी मला माफ कराल ना सर ! या आवर्तातून क्षणभर विरंगुळा मिळतो तो तुमच्यामुळे...तो माझ्याकडून हिरावून नका घेऊ सर !"

रात्रीचा एक वाजत आला होता. काका यायची वेळ झाली होती. मी बाहेरच्या दारात गेलो...क्षणभर त्याने ओल्या डोळ्याने माझ्याकडे बघून आतून दार लावून घेतलं. अन् मी अनेक प्रश्न सोबतीला घेऊन घरी परतलो...आता अनेकान्तला दररोज भेटीन. ठरलेल्या ठिकाणी, ठरलेल्या वेळी. आवर्त भेदून त्याची भीती दूर करीन...!

❑ ❑



अनुक्रमणिका



# इग्नॅशिओ सँचेज मेजियाससाठी विलाप

फेदेरिको गार्सिए लोर्का

अनुवाद : मनोहर चिंतामणि वझे

**१. भिरकावणे आणि मरण**

पाच वाजता दुपारी
ठीक पाचला दुपारी
एका मुलाने पांढरी चादर आणली
पाच वाजता दुपारी
उरले होते मरण आणि निव्वळ मरण
पाच वाजता दुपारी
वाऱ्याने कापूस उडविला
पाच वाजता दुपारी
आता कबूतर आणि चित्ता लढतात
पाच वाजता दुपारी
वॉर्डन आवाज आरंभ झालेले
पाच वाजता दुपारी

बचनागाच्या घंटिका आणि धूर
पाच वाजता दुपारी
प्रत्येक कोपऱ्यावर स्तब्ध घोळके
पाच वाजता दुपारी
एकटा सांड विजयानंदात
पाच वाजता दुपारी
जेव्हा वर्फाचा घाम दिसू लागला
पाच वाजता दुपारी
जेव्हा सांडरिंगण आयोडीनने आच्छादिण्यात आले
पांच वाजता दुपारी
मरणाने आपली अंडी जखमेत मांडली
पाच वाजता दुपारी
ठीक पाच वाजता दुपारी
चाकावरील शवपेटिका त्याचे अंथरूण आहे
पाच वाजता दुपारी
अस्थी आणि पावे त्याच्या कानात वाजतात
पाच वाजता दुपारी
आता सांड त्याच्या कपाळावर डुकरतो
पाच वाजता दुपारी
खोली वेदनेने सप्तरंगी झाली.
दूर असलेला गँग्रीन जवळ येत आहे
पाच वाजता दुपारी
लिलीची तुतारी त्याच्या हिरव्या ओटीपोटात
पाच वाजता दुपारी
जखमा सूर्यासारख्या जळत्या
पाच वाजता दुपारी
आणि जमाव खिडक्या फोडत होता
पाच वाजता दुपारी
पाच वाजता दुपारी. हाय ! त्या भयंकर पाच वाजता दुपारी !
सर्व घड्याळांप्रमाणे पाच वाजता दुपारी
ती होती सावली पाच वाजता दुपारची !

२ सांडलेले रक्त

मी ते पाहू इच्छित नाही !
चंद्राला येण्यासाठी सांगा
कारण वाळूवरील इग्नॅशिओचे रक्त
मी पाहू इच्छित नाही
मी ते पाहू इच्छित नाही
चंद्र सताड उघडा आणि स्थिर घनांचे घोडे
आणि वाळुंजीची झुडपे कुंपणात असलेले
स्वप्नांचे करडे सांडरिंगण
मी ते पाहू इच्छित नाही
कारण माझी सय जळते
इवल्याशा शुभ्रतेच्या जुईला इशारा द्या !
मी ते पाहू इच्छित नाही
वाळूवर सांडलेल्या रक्ताने
भिजलेल्या नाकाडावरून
जुनाड जगाच्या गाईने
आपली उदास जीभ फिरविली
अंशतः मरण आणि अंशतः पाषाण असलेले
पृथ्वीवर पाउले टाकून थकलेल्या दोन
शतकांप्रमाणे
गुइसँडोचे सांड डुरकतात
नाही मी ते पाहू इच्छित नाही
आपले सर्व मरण खांद्यावर घेऊन
इग्नॅशिओ वर मजले चढतो
तो दिवस उजाडण्याच्या शोधात होता
आणि दिवस उजाडलाच नाही
तो आपला विश्वासयुक्त अर्धा चेहरा शोधतो
आणि स्वप्न त्याला अंधुक करते
तो आपले सुंदर शरीर शोधत होता
आणि उघडलेल्या रक्ताचा सामना पडला
ते पाहण्यासाठी मला पुन्हा सांगू नका !
कोण मी समोर येण्यासाठी ओरडत आहे !
ते मला पाहण्यासाठी सांगू नका !
त्याने जेव्हा शिंगे जवळ पाहिली
तेव्हा त्याने डोळे मिटले नाहीत.
(पण भयंकर मातांनी आपली डोकी उचलली
आणि गुप्त आवाजाची झुळूक उठली.
की फिक्या धुक्याच्या रँचरने
स्वर्गीय सांडांना आरोळी दिली ! )
त्याच्याशी तुलना करावी असा राजपुत्र
त्याच्या खड्गाशी तुलना करावी असे खड्ग
किंवा त्याच्याइतके सच्चे हृदय
सेव्हिलमध्ये त्याच्याशिवाय कधीच कोणाचेही नव्हते
त्याची स्तंभित करणारी शक्ती
सिंहांच्या नद्यांसारखी होती
आणि संगमरवरी शरीरासारखा

त्याचा मुख्य विवेक
अँडलुशिअन रोमची हवा
वावरत होती त्याच्या डोळ्याभोवती
चेहऱ्यावरील त्याच्या स्मित म्हणजे कल्पकता
आणि बुद्धीची ग्रंथील
काय रिंगणातील महान योद्धा !
काय नागरिक दंतूर पर्वतांच्या रंगेत !
कणसावरोबर किती हळुवार !
टाचेमुळे किती कठोर
दवावरोवर किती कोमल !
जत्रेत किती चमकदार !
शेवटचा अंधाराच्या वँडेरिलात किती विराट !
पण तो आता नेहमीसाठी निजलेला आहे
आता खात्रीच्या वोटांनी शेवाळ आणि गवत
त्याची कवटी उलगडेल. आता त्याचे रक्त
गात येत आहे. दलदल आलि कुरणे ह्यातून
गात अधीर शिंगांवरून खाली घसरत
धुक्यात आत्माहिन धडपडत हजारो खुरांवरून
ठेचाळत लांब गडद उदास जिभेप्रमाणे
तारांकित गुडलक्विव्हर नदीजवळ
वेदनेचे एक लहान तळे आकारण्यासाठी
अहा स्पेनच्या शुभ्र भिंती !
अहा दुःखाचा काळा सांड !
अहा इग्नॅशिओचे कठीण रक्त !
अहा त्याच्या नसांची बुलबुल !
नाही, मी ते पाहू इच्छित नाही
रक्ताला गोळा करण्यासाठी चषक नाही
ते पिण्यासाठी पाकोळी नाही
ते थंड करण्यासाठी उजेडाचे गोठलेले दव नाही
त्याला पारा लावण्यासाठी काच नाही
नाही मी ते पाहणार नाही...

### ३. मांडलेले शरीर

जिथे वळसेदार पाणी आणि गोठलेले
सायप्रस वृक्ष
ह्यापासून ताटातूट झालेली स्वप्ने कण्हतात
तो दगडाचा चौथरा तुझे कपाळ आहे
झाडे आणि फिती आणि ग्रह ह्यासह काळ
वाहून नेण्यासाठी दगड हा खांदा आहे
कारण दगडबिया मेघ चंडोलाचे सापळे
आणि संधीप्रकाशाचे लांडगे
दगड गोळा करतात
पण काळआवाज स्फटिक
आणि अग्नी देत नाही
तर तो देतो सांर्डरिगण,
सांडरिगण आणि अधिक सांर्डरिगण
आता खानदानी इग्नॅशिओ
दगडावर आडवा आहे
सर्व काही संपले आहे. काय घडत आहे ?
त्याच्या आकृतीकडे पाहा : मरणाने
तिच्यावर शुभ्र गंधक पसरविले आहे
आणि तिच्या डोक्यावर एका गडद मिनॅटॉरचे
डोके ठेवलेले आहे. सर्व काही संपलेले आहे
त्याच्या तोंडात पाऊस शिरतो.
उन्मादवायूत असलेली हवा
त्याच्या खचलेल्या छातीचा त्याग करते
आणि वर्फाच्या अश्रूत भिजलेले प्रेम
कळपांवर स्वतःला तापविते
ते काय म्हणत आहेत ?
दुर्गंधयुक्त शांतता खाली बसत आहे
जी विलय पावत आहे अशी त्याची
खानदानी आकृती आहे
(जिच्यात बुलबुल होते)
अशा मांडलेल्या शरीरासोबत आपण
इथे आहोत
आणि आरपार छिद्रांनी ते शरीर
भरल्या जात आहे
हे आपण पाहत आहोत
कोण प्रेतवस्त्रावर वळचा पाडत आहे ?
तो जे म्हणतो ते खरे नाही !
कोणीही इथे गायचे नाही
कोपऱ्यात रडायचे नाही
किंवा काटे टोचायचे नाहीत
किंवा सर्पाला भिववायचे नाही :
विश्रांतीची शक्यता नसलेले
हे शरीर पाहण्यासाठी.
मला इथे फक्त गोल डोळे पाहिजेत...
इथे मला सशक्त आवाज असलेली
माणसे हवीत :
जी घोड्यांना जेरीस आणतात
व नद्या वळवितात

अशी माणसे ज्यांचे सापळे खडखडत असतात
आणि जी सूर्य आणि गारगोटचा
तोंडात भरून गातात
इथे मला ती पाहायला हवीत.
ह्या दगडासमोर लगाम तुटलेल्या शरीरासमोर
मरणाने बांधलेल्या ह्या अमलदाराला
बाहेर जाण्यासाठी
कोठून वाट आहे हे दाखविण्यासाठी
ही माणसे मला पाहिजेत.
मधुर धुके आणि कलत्या
किनाऱ्यांच्या नदीसारखे
विलापगीत त्यांनी मला दाखवावे
इग्नॅशिओचे शरीर वाहून नेण्यासाठी
आणि सांडांचा द्विदल हुंकारा न ऐकता
माशांची गीते नसलेल्या गाण्यात
आणि गोठलेल्या धुराच्या पांढऱ्या झुडुपात
त्याला अदृष्य होऊ द्या
त्याचा रुमालाने झाकलेला चेहरा मला नको
त्याला तो वाहत असलेल्या
मरणाची सवय व्हावी
असे मला पाहिजे
जा इग्नॅशिओ, गरम हुंकार विसरून जा
झोप घे, वर उड, आराम कर :
समुद्र सुद्धा मरतो !

### ४. अनुपस्थित आत्मा

तुला अंजिराच्या झाडाला, घोड्याला, घराला
तुझ्या घरातील मुंग्यांना सांड ओळखत नाही
तुला दुपारला मूल ओळखत नाही
कारण तू नेहमीसाठी मेलेला आहेस
दगडी चौथऱ्याची पाठ
तुला ओळखत नाही
ज्या काळ्या सॅटिनमध्ये तू ढासळत आहेस
ते तुला ओळखत नाही
तुझी निमूट आठवण तुला ओळखत नाही
कारण तू नेहमीसाठी मेलेला आहेस,
शंखशिंपले धुक्याची द्राक्षे आणि गुच्छांच्या
टेकड्या घेऊन शरद येईल,
पण कोणालाच तुझ्या डोळ्यात पाहण्याची
गरज वाटत नाही
कारण तू नेहमीसाठी मेलेला आहेस...
कारण पृथ्वीच्या सर्व मृतांप्रमाणे
तू नेहमीसाठी मेलेला आहेस
दूर्बोध कुत्र्यांच्या ढिगाऱ्याप्रमाणे
इतर सर्व मृतांप्रमाणे विसरला गेलेला आहेस
कोणीच तुला ओळखत नाही
पण मी तुझ्यासाठी गातो
तुझ्या अर्धचेहऱ्याच्या भविष्यासाठी
आणि तुझ्या शोभेसाठी मी गातो
तुझ्या समजुतीच्या कुलीन पक्वतेसाठी गातो
तुझी मरणाविषयीची भूक
आणि तिच्या चवीविषयी मी गातो
धैर्यवान आनंदात सामावून असलेल्या
औदासिन्याविषयी मी गातो.
पुढे येणाऱ्या काळात
बराच वेळ जन्माला येणार नाही
असा खानदानी साहससंपन्न अँजलुशिअन
विलाप करणाऱ्या शब्दात मी
त्याच्या विषयी गातो
आणि ऑलिव्ह वृक्षात असलेल्या
उदास वाऱ्याची आठवण करतो.

□□

## कवी कथाकारांसाठी

० युगवाणी नव्या-जुन्या प्रतिभावंत साहित्यिकांचे व्यासपीठ आहे. युगवाणी प्रत्येक दर्जेदार कथा कवितेची आवर्जून दखल घेते. तुमच्या नव्या समर्थ कथा-कवितांना युगवाणीत स्थान आहेच !



## दोन चेहऱ्यांचा माणूस

इंदुमती शेवडे

**ना**नूने जन्मभर घरातल्या माणसांचे शिव्याशाप अंगांवर घेतले.

“ केलेल्या कर्मांची याच जन्मी फळं भोगेल मेला!” “ अंगात किडे पडतील दुष्टाच्या ”, “ देव कधी बरं कणार नाही या राक्षसाचं!”

त्याच्या सहवासातल्या प्रत्येकाने ईश्वरी न्याया-

वैर विसंवून त्याच्या मरणासंबंधी अंदाज बांधले होते. इच्छा व्यक्त केल्या होत्या. तळतळून शाप दिले होते. पण देवापर्यंत कुणाचेच शिव्याशाप पोहचले नसावेत. कारण त्या सगळ्यांचे अंदाज पालथे पाडून, शिव्याशाप फुसके ठरवून, नानू सुखाने मेला होता. देवमाणसाला यावं असं म्हणतो, तसं मरण त्याला आलं होतं. तो आजारी पडला नाही. झिजला नाही. कुजत पडला नाही. त्याने कुणाची सेवा घेतली नाही...मेला तेव्हा एकटाच होता. मुलाने केव्हाच घर सोडलं होतं. बायकोही मुलीकडे निघून गेली होती. इतर नातेवाईक वा मित्र जवळ नव्हते. फक्त त्याचा पाळीव कुत्रा टॉमी होता... यमदेवाने कुणालाच आपली चाहूल लागू दिली नाही... नि त्याला अलगद उचलून नेलं होतं.

सकाळी छापखान्याचा माणूस किल्ल्या मागायला आला, तेव्हा देवासमोर पालथा पडलेला मालकाचा देह त्याने पाहिला नि बोंबाबोंब सुरू केली. धावतच मला सांगायला आला. मी तसाच उठलो नि तांबे डॉक्टरला घेऊन त्याच्या घरी पोचलो...आम्ही दोघेच काय ते त्याचे मित्र.

घराच्या पायरीवर टॉमी भुंकत बसला होता... ते भुंकणं तेवढंच काय ते रडणं, नानूच्या शवाला लाभलं. आंत गेलो. स्वयंपाक घरात चुलीवर खिचडीचा गंज तसाच पडलेला होता. लाकडं विझून गेली होती. दुसऱ्या कोपऱ्यात चौरंगावर देव होते. भिंतीवर दुर्गेचा फोटो होता. देवात—श्रीचक्र होतं...पूजा झालेली दिसत होती. अन् जरीची लाल शाल पांघरून पाटावर बसल्याबसल्या नमस्कार केल्यासारखा चौरंगावर डोकं टेकून तो पालथा पडला होता. ती लाल शाल त्याच्या वडिलांची होती.

तांबे डॉक्टरने पुढे होऊन त्याला तपासलं. म्हणाले, "सगळं संपलंय...तास-दीड तास झाला असावा."

मनात आलं, आयुष्यात ज्या एकमेव व्यक्तीबद्दल त्याच्या मनात प्रेम होतं...त्या वडिलांच्या शालीच्या पांघरुणात, अशा प्रभात समयी देवासमोर या दुष्ट माणसाला मरण आलं! वारे देवा!

नानूला पाटावरून उचलून आम्ही बाहेरच्या खोलीत आणून खाटेवर ठेवलं. अन अंगावर चादर पांघरली. तसा शेपटी हलवीत टॉमी धावत आला नि खाटेपाशी येऊन बसला. नानूच्या झाकलेल्या देहाकडे पाहत अधून मधून ओरडत राहिला—रडल्यासारखा.

किती किती विचार मनात भरून आले होते! डॉक्टर जडपणे म्हणाले,

"आता काय?"

"आता काय? मुलाला कळवण्यात अर्थ नाही. बापाचं तोंड न पाहण्याची त्याची शपथ. बापूला तार केली तरी तो वेळेवर येऊन पोहचणं अशक्य...गोपाळ भैया गावात आहेत...ते येतील की नाही शंकाच...तेव्हा पुढचं आपणच करायचं."

मग दारात भेदरून उभ्या असलेल्या छापखान्याच्या माणसाला बोलावलं अन् शास्त्रीबुवा नि गोपाळभैयाकडे निरोप देऊन पाठवलं व येताना सर्व सामान घेऊन ये म्हणून सांगितलं...

तो गेला अन् आम्ही हातावर हात ठेवून तिथेच बसून राहिलो.

दोघांच्या मनात सारखेच विचार घोळत होते. नानूसाठी टिपं गाळणारं एकही माणूस जगात नव्हतं. आम्ही दोघे अन शास्त्रीबुवा असे तिघे सोडले, तर खांदा द्यायला आपली चार माणसं तरी जमतील की नाही याची खात्री नव्हती... शास्त्रीबुवा अतिशय थकले होते. त्यांच्या खांद्याचा उपयोग होण्यासारखा नव्हता. उरले गोपाळभैया. जावई गेला म्हणून एखादेवेळी लोकलाजेस्तव येतील...पण? खांदा देतील?

नानू वीस वर्षे गावात राहिला. पण कुणाशीच त्याचा ऋणानुबंध जुळला नाही. वाड्यात इतकी माणसं होती...पण एकाशीही तो कधी बोलला नाही...घराचं बेट करून तो जगला. पण त्या घरातली सुद्धा एकेक करून सगळी माणसं त्याने तोडून टाकली होती... आता शेवटी छापखान्यातली चार माणसंच तिरडी उचलायला बोलवावी लागणार होती...नशीब, नाहीतर म्युनिसीपालटीकडेच...

"छट्..." चादरीखाली झाकलेल्या देहाकडे पाहत डॉक्टर तांबे म्हणाले, "एकंदर मोठा अजब माणूस!... मेलेल्या माणसाबद्दल वाईट बोलू



अनुक्रमणिका

नये खरं...पण घरातल्या माणसाशी नानू अगदी पशूसारखा वागला..."

"अन् तेही किती ?...त्याला काही सीमा ?" मी म्हणालो...चिमूमावशी, वासू-छोटू, विठी, वहिनी, मुलगा...साऱ्यांचे शिव्याशाप देणारे, पोळलेले चेहरे माझ्यासमोर उभे राहिले.

□ □ □

नवरा वारल्यावर चिमूमावशी दमोहहून आपल्या चार पोरांना घेऊन आमच्याकडे आली. यावेळी काकांनी तिला वाड्यातल्या विहिरी-पलीकडल्या दोन अडगळीच्या खोल्या रिकाम्या करून दिल्या. शेतावरच्या धान्याची एकदोन पोतीही ते वर्षाकाठी काही दिवस तिच्याकडे नेऊन टाकत. चिमूमावशी आमच्या काकूची धाकटी बहीण म्हणून ती काकूच्या आसऱ्याने तिथे आली. आली तेव्हा नानू चौदा-पंधराचा होता. विठी पाचची अन मधले छोटू नि वासू. त्या वयातही नानूची घरच्या माणसांवर जरब होती. कुणी त्याच्या वाऱ्याला उभं रहात नसे... बोलणं तर दूरच...अशी दहशत !

नानूची ओळखं झाल्या दिवसापासून तो मला दोन चेहऱ्यांचा, दुहेरी व्यक्तित्वाचा माणूस वाटायचा. त्याचे लांबट काळेभोर डोळे कसलीतरी ओढ लागलेले वाटायचे. एकंदर चर्या तरतरीत. बोलणं फटकळ पण हुशारीचं. पण त्याचं गरुडाचं नाक, आजूबाजू दोन खोल रेषा, रुंद जिवणी अन खालचा जाड ओठ हे क्रूर माणसाचं वाटायचं... त्याच्यातली अस्वस्थता पाहून पिंजऱ्यात बंद करून ठेवलेला क्रूर पशू त्याच्या शरीरात अस्वस्थपणे फेऱ्या घालतोयसं वाटे...

तसं तर, ते सगळंच कुटुंब अजब होतं. चिमूमावशी बऱ्या, खात्यापित्या घराण्यातली. पण तिला बुद्धी नव्हती. अन रूपही नव्हतं. तिचं गरुडाचं नाक, काळा रंग अन् दोन बोटांचं अरुंद कपाळ साऱ्या मुलांत जोरदार हट्टाने अवतरलं होतं. नानूने एकट्याने वडिलांचे विचारी डोळे घेतले होते. वडील संस्कृतचे गाढे पंडित...दमोहची संस्कृत पाठशाळा चालवीत. दोनेक सन्मानही मिळालेले...पुस्तकंही लिहिलेली...पण एकाही मुलाने वडिलांची बुद्धी नि रूप घेतलं नाही. वासू अगदी घुम्या. घरात पाय नसायचा. फक्त दोन वेळा जेवायला घरी यायचा... जेवायला बसला की ढीगभर भात खायचा नि पोळ्यांची जुडी. बाकीचा वेळ आखाड्यात नाहीतर झोपेत. छोटूचंही शिक्षणात लक्ष नव्हतं. कुरळ्या केसांचा मधला भांग पाडून तो पानाचे ठेले, सिनेमा थिएटर. नाहीतर तीनपत्त्यांचे अड्डे, इथे कुठेतरी असायचा. विठी-मला आठवते तेव्हांची-म्हणजे केसांना चुपचुपीत तेल लावून, कानावर फुगे काढणारी, आजीबाईसारखं पोक्त बोलणारी नि वाडाभर लावालावी करीत हिंडणारी-चहाडखोर... त्यात नानूच्याच चहाडचा सर्वात अधिक...

तर चिमू मावशीच्या सगळ्याच सवयी दरिद्री. तिचं बिऱ्हाड अन् विहीर यांच्या दरम्यान खूप मोठं आवार होतं...वाड्याची तियली बाजू ढासळली होती. तिथे गुरंढोरं येऊन बसायची. एवढ्या चांगल्या घराण्यातली मुलगी. पण सकाळी उठताच काटक्या नि शेण गोळा करायला निघायची. गौऱ्या थापायची. संध्याकाळी देवळातून येताना कुणाकडून भोपळ्याची फाक, तर कुणाकडून अळूची पानं, काकडी-लिंबं, कधी आमचूलं, नाहीतर आवळकाठी असं काहीतरी मागून आणलेलं...नानूला ते दिसलं की त्याच्या डोक्यात तिडीक उठे. त्याच्या स्वाभिमानावर ओरखडे पडत...

"ही कुणाकडची भीक ?" "सासर गरीब असेलं, पण निदान तुमच्या माहेरच्यांची लाज ? अन् सासर गरीब असलं तरी भीक लागली नाही अजून आपल्याला !"

असं काहीतरी टोचून बोलायचा.

काकूलाही बहिणीचं हे वागणं पसंत नव्हतं... तिचं वागणं थोरामोठ्यांना साजेसं...आपल्या परीने ती बहिणीला पुष्कळ देई. पण चिमूमावशीची संवय काही गेली नाही. मग नानूला नकळत चोरून वस्तू येऊ लागल्या...नानूला त्याबद्दल आईचा तिरस्कार वाटायचा...पुष्कळदा भांडणं होत...आम्ही कुणी त्याबद्दल म्हटलं तर तिचं उत्तर असे "अरे, या पोरांसाठीच ना हे करते मी ?"

□ □ □

मी नानूच्याच वयाचा, म्हणून आम्ही जवळ



अनुक्रमणिका

आलो...माझ्याच बरोबर तो शाळेत जाई...पण खरं तर त्याचा स्वभाव मला कधी कळलाच नाही. त्याचा क्रूर चेहरा, अन् स्वप्नाळू, विचारी डोळे यांचा कधी मेळ घालता आला नाही. तसंच आमच्याशी वागणारा नानू अन घरच्यांशी वाईट वागणारा नानू ही दोन अगदी वेगळी माणसं वाटायची...

सकाळी मी विहिरीवर आंघोळीला गेलो की आंघोळ–पूजा आटपून बाहेरच्या ओसरीत संस्कृत श्लोक म्हणत नानू फेऱ्या घालताना दिसायचा... वडिलांची ती लाल शाल पांघरलेला...एखाद्या वेळी आत पूजा चाललेली असे...अन् आतून खणखणीत आवाजात ऐकू यायचे :

देवि प्रपन्नार्ति हरे प्रसीद ।
प्रसीद मातर्जयतोखिलस्य ॥

त्याच्या सुरेख आवाजातलं हे त्याचं आवडतं देवी–स्तोत्र ऐकू यायचं...बरेचदा आम्ही गावाबाहेरच्या झाडीत फिरायला जात असू. नानू तसा कमी बोलणारा. बोललाच तर कडू, फटकळ असं काहीतरी. वडिलांबद्दल मात्र त्याचा स्वर वेगळा होई...त्यांच्या विद्वत्तेबद्दल गोष्टी सांगे... एका सन्मानात ती लाल शाल मिळाल्याचं त्याने सांगितलं होतं...एकदा म्हणाला : "रघुवंशावर भाष्य लिहिताना माझा जन्म झाला म्हणून त्यांनी माझं नाव रघू ठेवलं होतं."

"मग त्याचं नानू कसं झालं."

"त्यांचं ते लाडाचं रोजचं नाव."

अन मग एकदम कडवटपणे हसून म्हणाला : "आमच्या घरात वडिलांच्या संस्कृत काव्यप्रेमाची आईच्या रस्त्यावरचं शेण उचलून आणण्याच्या वृत्तीशी गाठ पडली अन् आम्ही सारे हे असे झालो !"

असा काही विषय निघाला की क्षणार्धात त्याच्या डोळ्यातली भावुक छटा लोपून चेहरा क्रूर दिसू लागायचा, अन् वाटेतल्या बेवारशी कुत्र्यांवर तो हातातला वेत हाणायचा. झाडाझुडपांना तडाखे मारू लागायचा. पण लगेच, फिरणं संपल्यावर तो शास्त्रीबुवाकडे जाऊन बघायचा. अन् वडिलांकडून शिकलेले श्लोक म्हणायचा. काव्यशास्त्र विनोद सुरू व्हायचा...अन् नानूचा चेहरा फुलायचा.

मॅट्रिक पास झाला तर कुठे तरी कारकुनी मिळून जाईल म्हणून काकांच्या आग्रहावरून नानूने सुरुवातीलाच आमच्या शाळेत त्याचं नाव घातलं. पण दहावीतच तो दोनदा नापास झाला... संस्कृतमधे ९५ टक्के मार्क, पण गणितात नापास... दोनदा गणिताने सूड घेतल्यावर नानू म्हणाला : "अरे, गणिताला डोकं लागतं, ते माझ्याजवळ नाही."

अन् त्याने शाळा सोडली नि काहीतरी दुकान काढायचं ठरवलं. काकांना कळल्यावर ते म्हणाले : "आणखी एकदा बसून पहा, नानू ! हवं तर फीचे पैसे मी देतो."

त्यावर शांतपणे म्हणाला : "काय फायदा ? तुमचे पैसे फुकट जातील !"

"अरे, प्रयत्न करून पाहायला काय हरकत आहे ?" रघू एकदम कडवटपणे हसून म्हणाला : आमच्या चेहऱ्याकडे पहा एकदा, काका ! म्हणजे आम्ही कुणीच शिक्षणात कधी पुढे जाणार नाही हे कळेल तुम्हाला. कां ते सांगू ? आम्हाला घडवण्यात आईचाच हिस्सा अधिक, वडिलांचा उगाच नावाला आहे."

काका त्याच्याकडे नुसतेच पाहत राहिले. असं फटकळ बोलणं...मग नानूने वडिलांची पाठशाळा विकल्याचे जे पैसे शिल्लक होते, ते घालून शेजारच्या किसनलालशी भागीदारी करून आटयाची चक्की काढली. पुस्तकाचं दुकान चालणार नाही. म्हणून ही चक्कीच.

मी ती पाहायला गेलो, तेव्हा नानू एका लाकडी बाकावर बसला होता. त्याच्या चेहऱ्यावर आटयाचे कण उडून तो पांढुरका दिसत होता... स्वतःत बुडून गेल्यासारखा तो दिसला. मी जाताच तो उठला.

"कशी काय चाललीय चक्की ?'

"छान ! पुस्तकाचं दुकान एवढं चाललं नसतं..."

"म्हणज मजेत आहेस तर !"

"मजेत ? हुँऽऽ ? एका संस्कृत पंडिताचा मुलगा अन चक्कीवाला ? मजेत राहील कधी ? वडील हसत असतील मला !"

त्याचे डोळे पाहता पाहता एकदम लाल झाले,

ते, रागाने नाही... त्यांच्यात रक्त दाटलं होतं... मी तसाच मुकाट्याने बाहेर पडलो.

" चक्की काही दिवस नीट चालली. घरात बरा पैसा येऊ लागला...पण नानू दिवसेंदिवस अबोल नि तुसडा होत गेला...त्याच दिवसात त्याने एक मांजर मारून टाकलं...त्या दिवशी त्याच्या वडिलांचं श्राद्ध होतं. खिरीसाठी दूध आणलं होतं, त्यात मांजराने तोंड घातलं. रघू उठला नि मांजरावर इतक्या जोराने वेत हाणले की ते आडवंच पडलं...नाकातून रक्ताची धार लागली. थोड्यावेळाने ते उठलं. परसातल्या जासवंदीपर्यंत भेलकांडत गेलं नि तिथेंच मेलं. नानूची आई धावरून गेली. सारखी म्हणत राहिली, "हे बरं झालं नाही, नानू ! आता सोन्याचं मांजर करून काशीयात्रेला जायला हवं...नाहीतर..."

"नाहीतर काय होईल ? आहे त्यापेक्षा आणखी वाईट काय होणारयू ? नुसत्या भाकड-कथा !"

नानूने तो विषय तिथेच बंद केला. पण चिमूमावशीला सतत खंत वाटत राहिली. त्यावेळी मी कॉलेजात शिकत होतो. तसा माझाही त्यावर विश्वास नव्हता. पण योगायोग म्हणा हवं तर, कारण त्यानंतर सगळ्या कुटुंबावर काळी सावली पडल्यासारखं झालं. रघूची गिरणी जेमतम महिनाभर आणखी चालली. एकदिवस किसनलाल शिल्लक रक्कम घेऊन पळून गेला. चक्कीसाठी त्याने ज्या शेठाचं कर्ज घेतलं होतं, त्याने जप्ती-हुकूम आणला नि गिरणीला टाळ लागलं.

मग काही महिने रघू रिकामाच बसून होता. या दिवसात तो पुष्कळदा आढ्याकडे पाहत विरक्तपणे नुसताच बसून रहायचा. जणू हे घर, त्यातली माणसं त्याला नकोशी वाटायची...कल्ले वाढवून, पानाने रंगलेलं थोबाड घेऊन कटरा बाजारात हिंडणारा छोटू, सांडासारखा वाढत चाललेला वासू, चोरीचहाडी करीत वाडाभर नाक खुपसणारी विठी, शेण गोळा करणारी आई-साऱ्यांचा तिरस्कार वाटायचा. यांच्याशी आपण रक्ताने बांधले गेलो आहोत हे आठवून तो पेटून उठायचा. फेऱ्या घालू लागायचा. एक दिवस मी म्हणालो : "असा काय बसून आहेस ?..."

"मग काय करू ! एकेकाला एकेक शाप असतो. मला आमच्या या माणसांचा आहे. त्यांचं काय करायचं समजत नाही."

यावर काय उत्तर देणार ? नुसता गप्प बसलो...एकदा विठीने वाड्यातल्या भाडेकऱ्या-कडचे पेरू चोरून आणले. नानूने संतापानं तिचं बखोट धरून तिला आंगणात भिरकवलं...त्यात तिचा हात मोडला.

छोटूची लक्षणं बरी नाहीत म्हणून काकांनी त्याची शिफारस करून घेलाशेठच्या बस-सर्व्हिस मध्ये त्याला कंडक्टरची चाकरी लावून दिली... तिथे त्याने पैसे खाल्ले...नानूला कळलं तेव्हा त्याने छोटूचं मुस्काड फोडून काढलं. चार दिवस थोबाड सुजून होतं.

□ □ □

पण पुढे नानू काहीसा शांत झाला. काकाकडून दोन हजार उसने घेतले, अन् छापखाना टाकला. थोडे फार पैसे घरात येऊ लागले...रघूने आधी कर्ज फेडलं...मग गोपाळ भैय्याची मुलगी सांगून आली नि नानूचं लग्न झालं.

बायको नक्षत्रासारखी सुंदर होती पण नानू संसारात रमला नाही. दोन मुलंही झाली...पण नानूने त्यांना कधी बोट लावलं नाही. सारी त्याला भिऊन सावलीसारखी राहत...बायकोशी कधी बोलणं नाही की विचारपूस नाही...सुरुवातीचे वर्षभरातले सण-समारंभ आटोपल्यावर विचारीला पुन्हा माहेर दिसलं नाही. पहिल्या बाळंतपणाच्यावेळी गोपाळभैय्या मुलीला माहेरी न्यायला आले. "पहिलटकरीण आहे...पोरीला पाठवा"- म्हणून काकळूत केली. पण नानूने त्यांना धुडकावून लावलं.

"राक्षस आहे ! नवरा कसला ?" म्हणून पाचअक्षरी शिवी देऊन गोपाळ भैय्या उठले नि मुलीकडे जाणं टाकलं.

दरम्यान काकांनी छोटूला दुसरी नोकरी देववली ... मुन्नालालच्या गोडाऊनमधली ...तिथे येणारी-जाणारी पोती मोजत त्यांची आकडेवारी मांडत छोटू दिवसभर उभा राह्यचा...इथे पैसेही

वरे होते. त्यादिवशी छापखान्यातून येताना नानूने छोटूला छबेलीच्या पानठेल्यावर तिच्याशी लाडेलाडे बोलत तिचा हात दाबतांना पाहिलं. बस्स !

रात्री छोटू घरी आला, शब्द न बोलता नानूने वेत उचलला नि त्याला फोडून काढलं...आरडा-ओरडा ऐकून मी नि काका धावत गेलो. छोटूच्या नाकाला रक्ताची धार लागली होती. त्यादिवशीचं रक्ताने माखलेलं मांजर मला आठवलं. चिमूमावशी मध्ये पडली होती...पण नानू तिला आवरत नव्हता. शेवटी काका आडवे आले नि छोटूला सोडवलं.

तशाच माखलेल्या चेहऱ्याने छोटू लडखडत उठला नि म्हणाला,

"बघ, नान्या ! मी वयात आलोय्. स्वत:चं कमावतोय...तेव्हा मला वाटेल ते करीन...तू मला मारणारा कोण ?"

विजेचा चटका बसावा तसं नानूला झालं. डोक्यात अंगार पेटला. वाटलं हातातला वेत हा पुन्हा उगारणार. पण स्वत:ला शर्थीने आवरून नानू म्हणाला,

"ठीकाय ! हवं ते कर ! पण इथून आताच्या आता निघ...अन पुन्हा पाऊल टाकू नकोस ! तू मला मेलास !"

त्या रात्री छोटू आमच्याकडे निजला अन् दुसरे दिवसी गोपाळगंजाच्या भिकार वस्तीत दीड-खोलीचं घर घेतलं. चिमूमावशी त्याचा संसार लावायला गेली...काही दिवसांनी मंडल्याची एक भिक्षुकाची मुलगी पाहून तिने त्याचं लग्न लावून दिलं...नानू लग्नाला गेला नाही. देवदेवक वासूने बसवलं. पण छोटूची बायको पहिल्याच मंगळा-गौरीला दागिन्यांसकट माहेरी गेली ती पुन्हा परत आलीच नाही...तिच्या बापाने कळवून टाकलं, "जावयांची लक्षणं ठीक नाहीत, म्हणून मुलीला पाठवत नाही."

□ □ □

छोटूचा हा प्रकार, तर विठीचा दुसरा. दर-वर्षी पास होतहोत विठी १० वी पर्यंत पोचली. भावांपेक्षा आपण जास्त शिकलो म्हणून विठीला मोठीमोठी स्वप्नं पडत होती. पाय जमिनीवर ठरत नव्हता. नटून थटून, कानावर फुगे काढून ती मिरवायची. शाळेला जाताना माना वेळावीत, जिवणी फेंदारून चालायची...नि रस्त्यावरचे टोळ तिला डोळा मारायचे, आचकट बोलायचे अन् विठी हसत राह्यची...

रघूला ते कळल्यावर तो नागपूरला गेला नि विठीचं लग्न ठरवून आला. घरात सांगितलं, "मुलगा डॉक्टर आहे. त्याचा दवाखाना आहे."

यावर मायलेकी भलत्याच खूष. लग्न लागल्या-वर विठी सासरी गेली, तेव्हा कळलं, नवरा डॉक्टर नाही. एका दवाखान्यात साधा कम्पाऊंडर आहे...विठीने डोकं बडवून घेतलं. अन् असं फसवल्याबद्दल नानूवर खूप तोंडसुख घेतलं. एका गलिच्छ वस्तीत, अडाणी नवऱ्याबरोबर चाळी-तल्या दोन खोल्यांतला चार मुलांसह संसार कर-णारी विठी आपल्या स्वप्नांचा चक्काचूर करणाऱ्या भावाला जन्मभर शिव्याशाप देत राहिली.

नानूच्या तावडीतून वासू मात्र न खरचटता सुटला. एका सुटीत माझे लहान काका आले. रेल्वेत इंजिनियर होते...त्यांनी वासूला नेलं नि ट्रेन–फिटर म्हणून रेल्वेत चिकटवून दिलं. काही मुली सांगून आल्या. पण वासू जन्मभर भुंडाच राहिला.

पुढे छोटूने गोडऊनमधेही अफराशफर केली नि मुन्नालालने त्याला नोकरीवरून काढलं. तो बेकार बसून होता...चिमूमावशी मग नानूकडे परत राह्यला आली. छोटू वणवण भटकत राहिला.

६ महिन्यानंतर दाढीचे खुंट वाढलेला, अंगाने अर्धा झालेला छोटू घरात येऊन उभा राहिला. वहिनीने त्याला जेवायला घातलं...छोटूने ढीगभर अन्न खाल्लं...कोणजाणे किती दिवसांचा उपाशी होता ! चिमूमावशीने ठेवणीतले तीन रुपये काढून दिले...त्यानंतर छोटूच्या वारंवार खेपा होऊ लागल्या. नानू घरी नसताना तो यायचा...नानूला ते शेवटी कळलंच. त्याने दोघींना दमदाटी दिली.

या घरात राह्यचं असेल तर छोटूला दिडकी द्यायची नाही...अन घरात पाय ठेवू द्यायचा नाही. माझा त्याचा संबंध तुटला ! तो माझ्या लेखी मेलाय्."

काही दिवस छोटू बेपत्ता होता. एक दिवस जर्जर स्थितीत घरी आला. हातपाय लटपटत



अनुक्रमणिका

होते. पण नानूने दार उघडलं नाही. छोटूचं केविलवाणं दार ठोठावणं त्याने मुकाट ऐकून घेतलं...

त्यावर काही दिवसांनीच छोटू आपल्या खोलीत मेलेला सापडल्याची बातमी आली. दार फोडून पोलीस आत गेले. सरकारी डॉक्टर आले. पंचनामा झाला. "मृत्यूचं कारण अज्ञात" म्हणून सांगण्यात आलं...पण तांबे डॉक्टरने मला खरं कारण सांगितलं. म्हणाला, "छोटू उपासमारीने मेला!"

छोटूच्या मरणानंतर चिमूमावशीने हाय खाल्ली. जेवायला बसली की आतडं तुटायचं. म्हणायची. "नानूने भावाला उपाशी मारलं...देवाघरी त्याचा जाब द्यावा लागेल त्याला! भाऊ कसला? राक्षस जन्माला घातला मी!"

□ □ □

नानूची मुलं आता मोठी झाली होती. तरी बापाच्या धाकात वावरायची. मुलगा आता कॉलेजात जाऊ लागला होता. पण नानूने कधी प्रेमाने विचारपूस केली नव्हती. आताशा मुलाच्या मनातही हळूहळू बापासारखं कणखर, कठोर असं काहीतरी वाटत होतं...मुलीबद्दल मात्र नानूच्या मनात कुठेतरी मऊ कोपरा असावा. अधून अधून एखादा शब्द तो तिच्याशी बोले. छापखान्यालाही त्याने 'प्रतिभा प्रेस' हे मुलीचंच नाव दिलं होतं. ती मॅट्रिक झाल्यावर नागपूरचा एक छानसा मुलगा पाहून तिचं लग्न करून दिलं होतं...थोडाबहुत पैसाठी खर्च केला. पण बस, तेवढंच.

मुलाच्या बाबतीत मात्र प्रकार उलटाच झाला. कॉलेजातल्या कुणा एका शांता अग्रवालशी त्याचं प्रेम जुळलं...ते कळताच रघूने मुलाला ताबडतोब धमकी दिली.

"आजकालचे हे प्रेमाचे थेर या घरात चालणार नाहीत...नाहीतर कॉलेज बंद करीन...यापुढे मुलीला भेटणं बंद!"

कधी नव्हे, ते मुलाने बापाला फाड्कन उत्तर दिलं.

"ठीक आहे! प्रेम म्हणजे काय तुम्हाला काय कळणार? प्रेमाचा एक शब्द सुद्धा कुणासाठी तुमच्या तोंडातून निघाला नाही, तुम्ही मला दुसरं काय सांगणार?"

मुलाने बापावर जोराचा वार केला होता. नानू क्षणभर अवाक् झाला. मग तीव्रपणे म्हणाला,

"मग चालता हो! मला उत्तरं देतोस?" म्हणून मुलाच्या तोंडात फाडफाड मारायला सुरुवात केली. पण मुलगाही जळजळीत नजरेनं बापाकडे पाहत राहिला.

सकाळी पाहतात तो मुलगा घरात नाही. काय झालं, कुठे गेला, पत्ता लागेना. वहिनीच्या डोळ्यांना धारा लागल्या, ते कळताच शांता अग्रवालने आत्महत्या करून घेतली.

महिनाभरानंतर मुलाचं आईला पत्र आलं. "मला जबलपूरला नोकरी मिळालीय. इतःपर बाबाचं तोंड मला पाह्यचं नाही...नि लग्नही करायचं नाही. कशाला करायचं? बाबांसारख्या दगडाचं काळीज असलेल्या क्रूर माणसाचा वंश वाढवण्यासाठीच ना? त्यांचं बीज माझ्यानंतर नष्ट झालेलं बरं!"

मुलगा सुखरूप आहे एवढ्यानेच वहिनीला हायसं वाटलं...पण नवरा त्याच्या भेटीला कधी जाऊ देणार नाही हे तिला ठाऊक होतं. बिचारी छातीवर दगड ठेवून जगली. मला कळलं तेव्हा मी संतापलो. वहिनीने ते पत्र मला दाखवलं. मनात आलं. नानू का वागतो असा? भावाबहिणीचं एक ठीक. त्यांचे लागेबांधे वेगळे. पण प्रत्यक्ष मुलगा? अन् बायको? तिचं माहेर तोडलं... अन् आता हा मुलगा? पण मी गप्प बसलो... काही बोललो असतो, तर त्याने मलाही तोडून टाकलं असतं...आम्ही अजून फिरायला जात होतो. बोलत बसत होतो. पण माझं मन विटत चाललं होतं.

पण एक मात्र खरं. मुलगा गेल्यापासून नानू आणखीच अबोल झाला. त्याचे डोळे उदास दिसू लागले पण मुलाविषयी त्याने कधी ब्र काढला नाही. एक दिवस त्याने एक कुलुंगं कुत्रं वाटेतून उचलून आणलं. मला म्हणाला: "मोटारीखाली चेंगरत होतं बिचारं" तोच हा टॉमी त्याचा एकमेव सोबती. मी पहात राहिलो...हा नानू निर्दयी? की दयाळू म्हणायचा?"

मुलाच्या बाबतीत हा प्रकार...तर आईच्या बाबतीत याहीपेक्षा भलताच.

चिमूमावशी आजारी पडली. तिला चमत्कारिक दुखणं झालं. तिची हातापायाची बोटं आधीच

वरे होते. त्यादिवशी छापखान्यातून येताना नानूने छोटूला छबेलीच्या पानठेल्यावर तिच्याशी लाडेलाडे बोलत तिचा हात दाबतांना पाहिलं. बस्स !

रात्री छोटू घरी आला, शब्द न बोलता नानूने वेत उचलला नि त्याला फोडून काढलं...आरडा-ओरडा ऐकून मी नि काका धावत गेलो. छोटूच्या नाकाला रक्ताची धार लागली होती. त्यादिवशीचं रक्ताने माखलेलं मांजर मला आठवलं. चिमूमावशी मध्ये पडली होती...पण नानू तिला आवरत नव्हता. शेवटी काका आडवे आले नि छोटूला सोडवलं.

तशाच माखलेल्या चेहऱ्याने छोटू लडखडत उठला नि म्हणाला,

"बस, नान्या ! मी वयात आलोय्. स्वतःचं कमावतोय...तेव्हा मला वाटेल ते करीन...तू मला मारणारा कोण ?"

विजेचा चटका बसावा तसं नानूला झालं. डोक्यात अंगार पेटला. वाटलं हातातला वेत हा पुन्हा उगारणार. पण स्वतःला शर्थीने आवरून नानू म्हणाला,

"ठीकाय ! हवं ते कर ! पण इथून आताच्या आता निघ...अन पुन्हा पाऊल टाकू नकोस ! तू मला मेलास !"

त्या रात्री छोटू आमच्याकडे निजला अन् दुसरे दिवसी गोपाळगंजाच्या भिकार वस्तीत दीड-खोलीचं घर घेतलं. चिमूमावशी त्याचा संसार लावायला गेली...काही दिवसांनी मंडल्याची एक भिक्षुकाची मुलगी पाहून तिने त्याचं लग्न लावून दिलं...नानू लग्नाला गेला नाही. देवदेवक वासूने वसवलं. पण छोटूची बायको पहिल्याच मंगळा-गौरीला दागिन्यांसकट माहेरी गेली ती पुन्हा परत आलीच नाही...तिच्या बापाने कळवून टाकलं, "जावयांची लक्षणं ठीक नाहीत, म्हणून मुलीला पाठवत नाही."

□ □ □

छोटूचा हा प्रकार, तर विठीचा दुसरा. दर-वर्षी पास होतहोत विठी १० वी पर्यंत पोचली. भावांपेक्षा आपण जास्त शिकलो म्हणून विठीला मोठीमोठी स्वप्नं पडत होती. पाय जमिनीवर ठरत नव्हता. नटून थटून, कानावर फुगे काढून ती मिरवायची. शाळेला जाताना माना वेळावीत, जिवणी फेंदारून चालायची...नि रस्त्यावरचे टोळ तिला डोळा मारायचे, आचकट बोलायचे अन् विठी हंसत राह्यची...

रघूला ते कळल्यावर तो नागपूरला गेला नि विठीचं लग्न ठरवून आला. घरात सांगितलं, "मुलगा डॉक्टर आहे. त्याचा दवाखाना आहे."

यावर मायलेकी भलत्याच खूष. लग्न लागल्या-वर विठी सासरी गेली, तेव्हा कळलं, नवरा डॉक्टर नाही. एका दवाखान्यात साधा कम्पाऊंडर आहे...विठीने डोकं बडवून घेतलं. अन् असं फसवल्याबद्दल नानूवर खूप तोंडसुख घेतलं. एका गलिच्छ वस्तीत, अडाणी नवऱ्याबरोबर चाळी-तल्या दोन खोल्यांतला चार मुलांसह संसार कर-णारी विठी आपल्या स्वप्नांचा चक्काचूर करणाऱ्या भावाला जन्मभर शिव्याशाप देत राहिली.

नानूच्या तावडीतून वासू मात्र न खरचटता सुटला. एका सुटीत माझे लहान काका आले. रेल्वेत इंजिनियर होते...त्यांनी वासूला नेलं नि ट्रेन–फिटर म्हणून रेल्वेत चिकटवून दिलं. काही मुली सांगून आल्या. पण वासू जन्मभर भुंडाच राहिला.

पुढे छोटूने गोडऊनमधेही अफराशफर केली नि मुन्नालालने त्याला नोकरीवरून काढलं. तो वेकार बसून होता...चिमूमावशी मग नानूकडे परत राह्यला आली. छोटू वणवण भटकत राहिला.

६ महिन्यानंतर दाढीचे खुंट वाढलेला, अंगाने अर्धा झालेला छोटू घरात येऊन उभा राहिला. वहिनीने त्याला जेवायला घातलं...छोटूने ढीगभर अन्न खाल्लं...कोणजाणे किती दिवसांचा उपाशी होता ! चिमूमावशीने ठेवणीतले तीन रुपये काढून दिले...त्यानंतर छोटूच्या वारंवार खेपा होऊ लागल्या. नानू घरी नसताना तो यायचा...नानूला ते शेवटी कळलंच. त्याने दोघींना दमदाटी दिली.

या घरात राह्यचं असेल तर छोटूला दिडकी द्यायची नाही...अन घरात पाय ठेवू द्यायचा नाही. माझा त्याचा संबंध तुटला ! तो माझ्या लेखी मेलाय्."

काही दिवस छोटू बेपत्ता होता. एक दिवस जर्जर स्थितीत घरी आला. हातपाय लटपटत





अनुक्रमणिका

होते. पण नानूने दार उघडलं नाही. छोटूचं केविलवाणं दार ठोठावणं त्याने मुकाट ऐकून घेतलं...

त्यावर काही दिवसांनीच छोटू आपल्या खोलीत मेलेला सापडल्याची बातमी आली. दार फोडून पोलीस आत गेले.. सरकारी डॉक्टर आले. पंचनामा झाला. "मृत्यूचं कारण अज्ञात" म्हणून सांगण्यात आलं...पण तांबे डॉक्टरने मला खरं कारण सांगितलं. म्हणाला, "छोटू उपासमारीने मेला !"

छोटूच्या मरणानंतर चिमूमावशीने हाय खाल्ली. जेवायला बसली की आतडं तुटायचं. म्हणायची. "नानूने भावाला उपाशी मारलं...देवाघरी त्याचा जाब द्यावा लागेल त्याला ! भाऊ कसला ? राक्षस जन्माला घातला मी !"

□ □ □

नानूची मुलं आता मोठी झाली होती. तरी बापाच्या धाकात वावरायची. मुलगा आता कॉलेजात जाऊ लागला होता. पण नानूने कधी प्रेमाने विचारपूस केली नव्हती. आताशा मुलाच्या मनातही हळूहळू बापासारखं कणखर, कठोर असं काहीतरी वाटत होतं...मुलीबद्दल मात्र नानूच्या मनात कुठेतरी मऊ कोपरा असावा. अधून अधून एखादा शब्द तो तिच्याशी बोले. छापखान्यालाही त्याने 'प्रतिभा प्रेस' हे मुलीचंच नाव दिलं होतं. ती मॅट्रिक झाल्यावर नागपूरचा एक छानसा मुलगा पाहून तिचं लग्न करून दिलं होतं...थोडाबहुत पैसाठी खर्च केला. पण बस, तेवढंच.

मुलाच्या बाबतीत मात्र प्रकार उलटाच झाला. कॉलेजातल्या कुणा एका शांता अग्रवालशी त्याचं प्रेम जुळलं...ते कळताच रघूने मुलाला तावडतोड धमकी दिली.

"आजकालचे हे प्रेमाचे थेर या घरात चालणार नाहीत...नाहीतर कॉलेज बंद करीन...यापुढे मुलीला भेटणं बंद !"

कधी नव्हे, ते मुलाने बापाला फाड्कन उत्तर दिलं.

"ठीक आहे ! प्रेम म्हणजे काय तुम्हाला काय कळणार ? प्रेमाचा एक शब्द सुद्धा कुणासाठी तुमच्या तोंडातून निघाला नाही, तुम्ही मला दुसरं काय सांगणार ?"

मुलाने बापावर जोराचा वार केला होता. नानू क्षणभर अवाक् झाला. मग तीव्रपणे म्हणाला,

"मग चालता हो ! मला उत्तरं देतोस ?" म्हणून मुलाच्या तोंडात फाडफाड मारायला सुरुवात केली. पण मुलगाही जळजळीत नजरेनं बापाकडे पाहत राहिला.

सकाळी पाहतात तो मुलगा घरात नाही. काय झालं, कुठे गेला, पत्ता लागेना. वहिनीच्या डोळ्यांना धारा लागल्या, ते कळताच शांता अग्रवालने आत्महत्या करून घेतली.

महिनाभरानंतर मुलाचं आईला पत्र आलं. "मला जबलपूरला नोकरी मिळालीय. इतःपर बाबाचं तोंड मला पाह्यचं नाही...नि लग्नही करायचं नाही. कशाला करायचं ? बाबांसारख्या दगडाचं काळीज असलेल्या क्रूर माणसाचा वंश वाढवण्यासाठीच ना ? त्यांचं बीज माझ्यानंतर नष्ट झालेलं बरं !"

मुलगा सुखरूप आहे एवढ्यानेच वहिनीला हायसं वाटलं...पण नवरा त्याच्या भेटीला कधी जाऊ देणार नाही हे तिला ठाऊक होतं. बिचारी छातीवर दगड ठेवून जगली. मला कळलं तेव्हा मी संतापलो. वहिनीने ते पत्र मला दाखवलं. मनात आलं. नानू का वागतो असा ? भावाबहिणीचं एक ठीक. त्यांचे लागेबांधे वेगळे. पण प्रत्यक्ष मुलगा ? अन् बायको ? तिचं माहेर तोडलं... अन् आता हा मुलगा ? पण मी गप्प बसलो... काही बोललो असतो, तर त्याने मलाही तोडून टाकलं असतं...आम्ही अजून फिरायला जात होतो. बोलत बसत होतो. पण माझं मन विटत चाललं होतं.

पण एक मात्र खरं. मुलगा गेल्यापासून नानू आणखीच अबोल झाला. त्याचे डोळे उदास दिसू लागले पण मुलाविषयी त्याने कधी ब्र काढला नाही. एक दिवस त्याने एक कुलुंगं कुत्रं वाटेतून उचलून आणलं. मला म्हणाला: "मोटारीखाली चेंगरत होतं बिचारं" तोच हा टॉमी त्याचा एकमेव सोबती. मी पहात राहिलो...हा नानू निर्दयी ? की दयाळू म्हणायचा ?"

मुलाच्या बाबतीत हा प्रकार...तर आईच्या बाबतीत याहीपेक्षा भलताच.

चिमूमावशी आजारी पडली. तिला चमत्कारिक दुखणं झालं. तिची हातापायाची बोटं आधीच

वधीर झाली होती. आता ती सुजली. हळूहळू त्यातून रक्त गळू लागलं...ताप येई. नाकाचा शेंडा लाल झाला...तांबे डॉक्टरला दाखवायचं मी म्हणालो. तेवढ्यात मला बाहेर गावी जावं लागलं, महिनाभराने परतलो तो घरात चिमूमावशी नाही. विचारलं तर नानू मोघम म्हणाला, "वासू आला होता. तो घेऊन गेला..."

बरं झालं. मी गप्प बसलो. पण वासूचं दोन महिन्यांनी पत्र आलं, त्याने खुलासा झाला.

"इथे आणल्यावर आईला डॉक्टरकडून तपासून घेतलं, तेव्हा नानूने मला तार करून कां बोलावलं अन् 'तिला ने' म्हणून का आग्रह धरला ते स्पष्ट झालं. तिला रक्तपिती झाली होती...मी घाबरून गेलो. पण सुदैवाने तिला नुकताच हार्ट अटॅक आला. त्यात ती परवा गेली...नि तिचे पुढचे हाल वाचले, हा नरपशू शेवटच्या दिवसात प्रत्यक्ष जन्मदात्रीशीही असं वागला. तो तुझा मित्र असेल पण आम्हा साऱ्यांचा वैरी होता. देव त्याचं कधी बरं करणार नाही : तो कुजून मरेल।"

□ □ □

पण नानू कुजला नाही, झिजला नाही. देवाने आज त्याला सुखाचं मरण दिलं होतं...नानूच्या छापखान्यातली माणसं बाहेर येऊन बसली होती. नि बांबू बांधत होती. थोड्या वेळाने गोपाळभैय्या खांद्यावर पंचा टाकून काठी टेकत आले. मुलीकडे ते त्यानंतर आज प्रथमच येत होते. क्रियाकर्मासाठी त्यांनी दुसरा भटजी आणला होता–त्यांनी नुसतं आमच्याकडे पाहिलं...जावयाच्या शवाकडे पाहिलंही नाही. अन् ते बाहेर जाऊन बसले. आम्ही रघूला नेलं. पण ते आले नाही.

आम्ही नानूला उचलून नेलं. तेव्हा शास्त्रीबुवा आले. टॉमी मागोमाग आला. एकाही शेजाऱ्याने चौकशी केली नाही. शांतपणे तिरंडीकडे टकमक पाहत घरात बसून होते.


स्मशानातून परतलो–तेव्हा उन्हं उतरून गेली होती. नानूच्या खाटेखाली दिवा लावून मी खोलीला कुलूप घातले. टॉमीला न्यायचा प्रयत्न केला. पण तो तिथेच दाराच्या पायरीवर बसून ओरडत राहिला. बाकी कुणी टिपूस गाळलं नाही.

□ □





अनुक्रमणिका



## क्लैब्यं मा स्म गमः...

अरुण शहाणे

नुक्तंच तावडं फुटूं लागलंय. आदल्या रात्रीं रेंगाळलेले ढग, विरविरीत, काळे—आता मात्र तापानं फाफणल्यागत तरंगते ! सूर्य थोडा अजून वर आला, किरण सूर्यफुलांवर पडून मग चराचरांवर पसरले. असीम पोकळीत पंख झेपावले. पक्ष्यांच्या डोळ्यांत एकच चमक उठली. आज तरी पोकळीचं ते टोक गाठायचंच. पण त्या आधी कण दोन कण



अनुक्रमणिका

पोटांत ढकलायला हवेत, म्हणून एकमेकांत अहमहमिकेत किलबिलाट. वाऱ्याची झुळूक कुठूनशी येऊन वृक्षांना बिलगली मुळांना जागं करीत. तिथं उठलेली हलकीशी शिरशिरी फुलांपर्यंत पोचवत. मग जड पावलांनी फळांपर्यंत जात.

तो आपल्या ऐटदार घरांत खिडकीशी उभा. हे बाहेरचं सौंदर्य निष्प्राण डोळयांत स्तब्ध ठेवण्याचा प्रयत्न करीत. तो मग तसाच पुतळयासारखा चालत दरवाज्यात आला. त्याला वाटलं आपण काविळीनं तर आजारी नाही ना ! समोरच बागेतल्या पालवी–फुलांवरले टपटपणारे दवबिंदू–त्याला वाटलं एकेक शुक्राची चांदणी तर नव्हे ! अन् त्याचे डोळे लख्खन् चमकले. छातीशी हातांची घडी ठेवून तो तिथंच व्हरांड्यात येरझाऱ्या घालू लागला. शीळ वाजवत हलक्याच ओठांनी मनाला विरंगुळा वाटावा म्हणून. काही मिनिटांनी ओठ कोरडे पडत चाललेत, घसाही कोरडा चांगलंच जाणवलं त्याला. दवबिंदू टपटपायचे थांबून त्यांतील शुक्राची चांदणी मातीत जिरून गेलीय. त्याला फुलं कोमेजून गेल्यागत दिसू लागली.. पक्ष्यांचा गजबजाट कर्कश वाटला. झाडं वाळून कोळ होऊन आपल्यावरच कोसळू लागलीत. दिसलं. मनात काविळीनं परत डोकावलं. अंग फणफणायला लागलंय. मंद वाराही असह्य करतोय. तो दाराला लावलेला फुलांचा पडदा, खिडक्यांना लावलेले पानापानाचे नाजुक पडदे ! दारातून आंत शिरताना त्यानं आपल्या मनगटाकडे पाहिलं. घड्याळातला मधला नाजुक काटा–त्याच्या सर्वांगावर काटाच उभा राहिला–जणू उत्तर ध्रुवावरून फिरतोय व घडाळयातल्या खोलातल्या प्रत्येक टक्टकीनंतर सर्वत्र बर्फ हलके-हलके भुरभुरतंय. आतां वरं वाटावं एवढया थंडीत म्हणून ऊब कुठून आणावी–मोठी विवंचना समोर ! समोरची आलमारी त्यानं उघडली. मधल्या कप्प्यांतल्या लोकरीच्या वस्तू शाल, स्वेटर, मफलर वगैरे–नुस्तीच नजर फिरवली त्यांच्यावरून व आलमारी बंद केली निरुपयोगी वाटून कुडकुडणं चालूच राहीलं. आठवणी गोळा करायला सुरुवात केली त्यानं मग. त्याला वाटलं असावं त्या ऊब देतील !–क्षणभंगुर का होईना. परत तो व्हरांड्यात आला. अंगणातलं घडवलेलं तुळशी–वृंदावन उध्वस्त झालंय. त्याच्या चारी बाजूंवर रेखाटलेली स्वस्तिक व ॐ दिसेनाशी झालीत. मोठ्या हौसेनं लावलेल्या गोकर्णाच्या वेलीवरील फुलं दररोज एकेक करत सुकत चाललीत, इतर फुलझाडंही रुसून बसल्यागत ! फुलं येईनाशी झालेली. कळया आलेल्या वाळून करपून चाललेल्या.

आत येऊन पहातो तर नोकरानं नुक्ताच चहा आणून ठेवलाय टेबलावर. तो चहा घेता घेता नोकरानं आंघोळीच्या गरम पाण्यानं भरलेली बादली बाथरुमात नेऊन ठेवली. तसंच टॉवेल वगैरेपण ठेवलं. तोंडं बंद आहेत दोघांची. तो बाथरूममधून शुचिर्भूत होऊन आला. मग देवघरांत नेहमीप्रमाणें, तिथं चांदीच्या परडीत फुलं तोडून आणून ठेवलीत–नीट न फुललेली–दोनचार निर्माल्य झालेली गोकर्णाची फुलंही त्यांत. सुबक नक्षीच्या शिसवीच्या देव्हाऱ्यासमोर तो पाटावर बसला. आंत सोन्याचं पुजेतलं एक यंत्र. शक्ति यंत्र, लक्ष्मी यंत्र यांपैकी कुठलं तरी. असं सर्व त्यानं चांदीच्या ताह्मनांत काढलं. त्या यंत्रावरचाच मंत्र ॐ ऱ्हां ऱ्हीं...असा काहीसा–पुटपुटायला सुरुवात केली. गणेश व बाळकृष्ण तसेच. मंत्राशिवाय मात्र पळीतलं स्नानाचं पाणी पंचामृतयुक्त यंत्रावरोबर त्यांच्याही वाट्याला आलं. यंत्रमंत्र पुटपुटणं होतंच. मग त्या सर्वांना पुसून त्यानं देव्हाऱ्यांत ठेवलं. फुलं वाहिली. उदबत्ती, निरांजन ओवाळत पूजा संपवली. घाईघाईत देव्हाऱ्यासमोर त्यानं साष्टांग नमस्कार घातल्याचं सोंग केलं. मग साईबाबांची पोथी वाचण्यासाठी देव्हाऱ्याचा ड्रॉवर पुढं ओढला. तर पोथीवर काळाशार विंचू. भला मोठा. त्यानं सर्रदिशी तोंड वळवून अंगावर चालून जाण्याचा पवित्रा घेतला–नांगी असलेलं वाकडं कांडं काहीसं ताठ करत नांगी नीट आतल्या बाजूला वळवली, पुढच्या दोन टोकी धारदार नांग्या किंचित् वर उचलल्या व तेजानं पुढं चाल केली. घाबरून घामाघुम होत त्यानं ड्रॉवर फटकन् बंद केला. तसाच तो जेवण्यासाठीं डायनिंग टेबलपाशी आला. हातपाय लटपटत ! जेवणाचं ताट वाढून ठेवलेलं. तीसएक

मिनिटांत ऑफिसांत जायला हवंच. वकावका घास कोंवून टाकत जेवण उरकलं. ऑफिसचे कपडे घालण्यासाठी हॉलमध्ये आला. एक भलं मोठं कॅलेंडर समोर. भिंतीवर कुरुक्षेत्र. त्यांत दिव्य तेजःपुंज सारथी. एक अद्वितीय शूर पण गोंधळ-लेला योद्धा. सारथ्याच्या परम भक्तसारखा! आज त्याला ते चित्र वेगळंच वाटलं. मनात विलक्षण कुतुहल जागं करणारं असं दिसलं. ऑफिसच्या रस्त्यानं त्याची स्कूटर वेगात निघाली. मनातनं ते कॅलेंडरवरचं चित्र हलत नाही. त्या भरात त्यानं ऑफिसात प्रवेश केला. अकरा वाजून गेले होते तरी स्टाफनं कामाला सुरुवात केलेली नाही. गप्पा, आपसांत कुजवुजणं यांत वेळ घालवणं चाललंय. तो आलेला पाहून मात्र स्टाफमध्ये पांगापांग झाली. जो तो आपापलं टेबल गाठतोय. ते कॅलेंडर मनातनं पुसट होत जाऊन नंतर विचित्र भास त्याला सतावूं लागले. "हा साला विनबायकोचा राहतो कसा? जगतो कसा? मुलंबाळं नाहीत तर रमतो तरी कशात हा?" "ए अलके, तुझ्यावर जीव आहे बरं का त्यांचा! काय हरकत आहे गं...? सुखात रहाशील अगदी. अजून तरुण आहे म्हटलं!" "अलकाताई, अगदी हेच मला म्हणायचं आहे बघा!" "तुम्हाला का स्वतःचं घर असावं, संसार असावा असं वाटत नाही?" "शिवाय डवल इन्कम" "शिवाय घर, स्कूटर नोकर कामाला!" "कष्ट नाहीत म्हणजे—कुठलेही!" स्टाफ कुजवुजतोय, वोलतोय कामं थांबवून. एकही कागद, टपाल, टाइप्ड पत्रं अद्याप सह्यांसाठी टेवलावर आली नाहीत. महत्त्वाची पत्रं आज पोस्टात पडायला हवीत. म्हणून एकेकाला जोरजोरात ताणायला सुरुवात! डोकं अगदी घणाखाली पिचून निघालं नंतर.

त्याच स्थितीत घरी. वागेला पाणी द्यायचं काम चाललंय नोकराचं. काम सोडून त्यानं चहा दिला त्याला. तोच समोर ते चित्र उभं राहिलं. "क्लैव्यं मा स्म गमः पार्थ नैतत् त्वय्युपपद्यते! क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप!!" तो सारथी, त्याला वाटलं—आपल्याला समजेल असं का नाही वोलत? तो देव्हाऱ्यासमोर आला. तो विचू तेवढ्यांत ड्रॉवरच्या फटीतून बाहेर पडतोय असं वाटलं त्याला. थरथरत्या हातांनीच त्यानं समई लावली. हात जोडले थरथरतच.

आपण आजपासून जास्त धार्मिक बनत चाललोय की काय, मग चांगलंच आहे की! तो पुटपुटला. त्या चित्राखालच्या संस्कृत श्लोकाखाली पुढं त्यानं वाचलं. "म्हणोनि शोकु न करी!

तू पुरता धीरु धरी!  
हे शोच्यता अव्हेरी।  
पंडुकुमरा॥ हृदयाचे ढिलेपण।  
एथ निकयासीनव्हे कारण।  
हे संग्रामी पतन जाण।  
क्षत्रियांसी॥—ज्ञानेश्वरी."

आता जरा नीटसा अर्थ त्याला लागला. जाणवलं—डोक्यातलं भयानक भणभणणं जात चाललंय. हळूं हळूं—चालेल. कवूल, अगदी कवूल...

□□

कागद व मुद्रणाचे दर वाढल्यामुळे 'युगवाणी'ची वार्षिक वर्गणी रु. २५ करण्यात आली आहे.

आता 'युगवाणी'च्या प्रत्येक अंकाचे मूल्य रु. ६ राहील, याची वर्गणीदारांनी आणि वाचकांनी नोंद घ्यावी

संपादक  
युगवाणी


# नियम


विश्वेश्वर सावदेकर

कॅप्टन अभिजितचं ते छोटंसं 'हनिड्यू' अवकाशयान मुख्य यानापासून निघून बराच वेळ झाला होता. यान प्रचंड वेगानं 'यामिनी' ग्रहाकडे निघालं होतं. अभिजित कुशल वैमानिक होता. यानातल्या चाचण्या आटोपून तो आरामात चालकाच्या खुर्चीवर बसला. बाजूच्या पडद्यावर दिसणारं बाहेरचं दृश्य पाहण्यापलिकडे त्याला आता विशेष काम नव्हतं. त्यानं सहज समोरच्या बोर्डवर नजर टाकली. त्या बोर्डवर घड्याळा-सारख्या असंख्य लहान–मोठ्या तबकड्या होत्या. अभिजितचं लक्ष त्यातल्या एका तबकडीकडे गेलं आणि तो चमकला. आपल्याला भास झाला असेल असं वाटून पुन्हा त्यानं बारकाईनं पाहिलं.

तो भास नव्हता. त्या तबकडीवरचा लाल काटा हळूहळू वर सरकत होता. कॅप्टननं खात्री करून घेतली. त्याचा अर्थ स्पष्ट होता. यानात कॅप्टन अभिजितशिवाय आणखी कुणीतरी आगंतुक व्यक्ती शिरली होती. तबकडीवरचा तो काटा कुणाचं तरी अस्तित्व स्पष्ट दाखवीत होता. कॅपटनला पक्कं माहीत होतं, त्याचं यान मुख्य यानापासून वेगळं झालं, त्यावेळी हा काटा शून्यावर होता. आणि आता तो वर चढायला लागला होता. यानात शिरलेल्या त्या अनाहुताच्या शरीरातून निघणाऱ्या उष्णतेमुळे काट्यानं वर सरकून त्याच्या अस्तित्वाची दखल घेतली होती. यानात 'कुणीतरी' होतं आणि त्यानं बेकायदेशीर प्रवेश केला होता.

आता कॅप्टन अभिजितवर विलक्षण जबाबदारी येऊन पडली होती. तो क्षणभर विचारात पडला. यानाचे सर्व नियम त्याला पाठ होते. त्याला आठवलं, नियम क्रमांक चार, पोटनियम तीन (अ)– 'मदतीसाठी निघालेल्या छोट्या यानात वैमा-निकाशिवाय इतर कुणीही आगंतुक व्यक्ती आढळली, तर ती कोणीही असली तरी वैमानिकानं तिला दिसताक्षणीच ठार करून यानाबाहेर ढकलून द्यावं.' अतिशय निष्ठूर आणि कडक असा हा नियम होता. याला अपवाद नव्हता, पर्यायही नव्हता.





हा कायदा केवळ माणसाच्या लहरीखातर केलेला नव्हता. अवकाशप्रवासातली ती एक आवश्यक गरज होती. अवकाश संशोधनात प्रचंड प्रगती होऊन मानवानं आपल्या ग्रहमालेबाहेर सुद्धा अनेक ठिकाणी वसाहती केल्या होत्या. चंद्रावरची माणसाची वसाहत आता 'ऐतिहासिक' झाली होती. अशा वसाहतींचा पृथ्वीशी संपर्क साधण्यासाठी अनेक मोठी यानं ये-जा करीत

असत. ही मोठी प्रवासी यानं सतत चकरा मारू शकत नव्हती. ती मानवांना त्यांच्या वसाहतीवर सोडून यायची आणि ठराविक कालानंतर या वसाहतींना भेट द्यायची. या यानांचं वेळापत्रक अतिशय काटेकोर असायचं, शिवाय प्रत्येक प्रवासाच्या वेळी त्यांचे बरेच टप्पे असायचे.

काही वेळा मोठी प्रवासी यानं येऊन गेल्यावर एखाद्या ग्रहावर अचानक काही अडचण निर्माण व्हायची. अशावेळी पुन्हा मोठं यान पाठवणं शक्य नसल्यामुळे त्या अडचणीतल्या मानवांना मदत करण्यासाठी छोटी 'इमर्जन्सी' यानं पाठवली जायची. ज्या ग्रहाला मदतीची आवश्यकता असेल, त्याच्या जवळपास फिरणाऱ्या मोठ्या यानातून अशी 'इमर्जन्सी' यानं पाठवता येत होती.

या छोट्या मदतयानांमध्ये फक्त एक व्यक्ती बसू शकेल इतकीच जागा असायची. या यानांचा वेगही मुख्य यानापेक्षा जास्त असायचा. शिवाय त्यांना इंधन कमी लागत असे. या छोट्या यानांमध्ये इंधन अतिशय काटेकोरपणे वापरलं जात असे. यानाला इच्छित स्थळी पोहचण्यास किती इंधन लागेल हे ठरवण्यासाठी गणकयंत्रांची व्यवस्था होती. वैमानिकासह यानाचं वजन, पार करायचं अंतर आणि दुसऱ्या ग्रहाचं संभाव्य गुरुत्वाकर्षण याचं गणित करून गणकयंत्र इंधनाचा साठा ठरवीत असे. त्याप्रमाणे आणि तितकंच इंधन यानात असायचं.

त्यामुळे यानात वैमानिकाशिवाय अन्य व्यक्तीला प्रवेश नव्हता. कारण त्यामुळे गणकयंत्राचं गणित चुकून यानाचं इंधन मधेच संपून यानाला अपघात होण्याचा धोका होता. तो टाळण्यासाठी हा नियम होता—नियम क्रमांक चार—पोटनियम तीन (अ) 'यानात कुणी व्यक्ती...' आणि त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होत असे.

□ □ □

आपल्याच आकाशगंगेतल्या 'यामिनी' या आकर्षक छोट्या ग्रहानं माणसाचं लक्ष वेधून घेतल्यावर आणि तिथं पृथ्वीसारखं वातावरण आहे, याची खात्री झाल्यावर लगेच तिथे संशोधनासाठी दोन तुकड्या पाठवण्यात आल्या होत्या. या दोन पथकात प्रत्येकी बारा माणसं होती. 'यामिनी'वर आपल्याला वस्ती करता येईल का ? याचा शोध घेणं हे त्यांचं मुख्य काम होतं. 'स्टारडस्ट' हे प्रवासी यान मंगळाच्या जवळ असताना त्याला अचानक 'यामिनी'कडून तातडीचा संदेश आला होता. 'यामिनी'वर नुकतंच मोठं वादळ झालं होतं—या वादळानं त्या लोकांची खूपच दुर्दशा झाली होती. त्यातल्या काही लोकांना विषारी तापाची लागण झाली होती. त्यांना तावडतोब औषधं आणि प्रतिबंधक उपाय यासाठी मदतीची आवश्यकता होती.

निरोप मिळाल्याबरोबर 'स्टारडस्ट' यानातली यंत्रणा कामाला लागली. कॅप्टन अभिजितचं 'हनिड्यू' हे छोटंसं मदत-यान सुसज्ज करण्यात आलं, औषधांचा साठा घेऊन आणि गणकयंत्रानं ठरवून दिलेलं इंधन घेऊन 'हनिड्यू' यामिनीच्या दिशेनं निघालं, आणि 'स्टारडस्ट'नं आपल्या प्रवाश्यांसह मंगळाकडचा प्रवास पुढे सुरू ठेवला.

□ □ □

'हनिड्यू'चा वेग प्रचंड होता. त्यामुळे क्षणाक्षणाला ते 'स्टारडस्ट'पासून दूर जात होतं. आणि आता या छोट्या यानात कुणीतरी अनाहूत व्यक्ती असल्याची सूचना कॅप्टनला मिळाली होती. क्षणात त्याच्यातला कर्तव्यकठोर अधिकारी जागा झाला. त्यानं आपले डोळे बाजूच्या बंद दरवाजावर रोखले. या दारापलीकडे असलेल्या छोट्या खोलीत औषधं आणि बरंचसं सामान होतं. या खोलीतच कुणीतरी लपून बसलं होतं. त्या अज्ञात व्यक्तीला आपल्या भवितव्याची जाणीव नव्हती आणि आता इतका उशीर झाला होता, की या अनाहूत पाहुण्याचं भविष्य बदलवणं केवळ अशक्य होतं. त्यानं स्वतःहून मृत्यूला निमंत्रण दिलं होतं.

पुन्हा तबकडीकडे पाहून कॅप्टन बंद दरवाजाजवळ आला. आणि मोठ्यानं ओरडला, "आत जो कोणी असेल. त्यानं तावडतोब बाहेर यावं."

त्याच्या ओरडण्याला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. कॅप्टननं पुन्हा दरडावलं, "लवकर बाहेर ये, नाहीतर इथूनच गोळी घालेन."

आता त्याला किंचित हालचाल जाणवली. समोरचा दरवाजा हळूच उघडला गेला. आणि ती

आगंतुक व्यक्ती बाहेर येऊ लागली. ती एक सुंदर, आकर्षक तरुणी होती तिचा पोषाख अतिशय मनोवेधक होता. कॅप्टनच्या दरडावणीमुळे आणि पकडली गेल्याची जाणीव झाल्यामुळे ती घाबरली होती.

कॅप्टन तिच्याकडे आश्चर्याने पाहत राहिला. आपल्या या छोटचा ' हनिडचू 'मधे कुणी आगंतुक शिरेल, आणि तीही अशी आकर्षक तरुण मुलगी असेल अशी त्यानं कधीच कल्पना केली नव्हती.

ती तरुणी खाली मान घालून उभी होती. तिला तावडतोब ठार करून यानाबाहेर फेकणं आवश्यक होतं. तिच्याऐवजी कुणी पुरुष असता, तर आतापर्यंत कॅप्टननं आपलं कर्तव्य पार पाडलंही असतं. पण आता तो विचारात पडला. त्यानं तिला आपल्या शेजारच्या एका छोटचा पेटीवर बसायला सांगितलं.

"तू 'हनिडचू 'मधे कशी काय आलीस ?" कॅप्टननं विचारलं. "तुझं नाव काय ?"

"मी विजया सरनाईक. 'स्टारडस्ट' या मुख्य प्रवासी यानातून मी मंगळावर चालले होते;" ती म्हणाली, "त्यावेळी अचानक हे तुमचं यान 'यामिनी 'कडे जात असल्याची कुणकुण मला लागली. आणि मी यात शिरण्याचं ठरवलं."

"पण का ? 'यामिनी ' हे काही प्रवासाचं ठिकाण नाही." कॅप्टन म्हणाला.

"मला माझ्या भावाला भेटायचंय्," विजया सांगू लागली, "सरकारतर्फे त्याला यामिनीवर संशोधनासाठी पाठवलंय्. गेल्या पाच-सहा वर्षांत आमची भेट नाही. तो गेला तेव्हा मी मॅट्रीकला होते. आता मी पदवीधर झाले. मला मंगळावर नोकरीही मिळाली. हे सगळं मला त्याला सांगायचंच. त्याला भेटल्याशिवाय मला चैन पडणार नाही."

मूर्ख मुली, तू असं यानात चोरून शिरण्यापेक्षा आमच्या अधिकाऱ्याला सांगितलं असतं, तर तुझी वेगळी व्यवस्था केली गेली असती. तू किती मोठा गुन्हा केलाय् आणि त्याचे परिणाम काय होतील, याची तुला कल्पना आहे का ?"

"मी कुणाला न विचारता यानात शिरण्याचा गुन्हा केलाय, हे मी मान्य करते. भावाला भेटण्याच्या विलक्षण ओढीनं मला हा अविचार करावा लागला. त्याबद्दल मी क्षमा मागते. मला तुम्ही जो काही दंड कराल, तो भरायला मी तयार आहे. मला अगदी तुरुंगात टाकलं, तरी चालेल. पण मला माझ्या भावाकडे घेऊन चला कॅप्टन." ती विनवणीच्या स्वरात म्हणाली.

आपण यानात शिरून काहीतरी गुन्हा करतोय याची किंचित् जाणीव तिला होती, पण बिचारीला परिणामांची मुळीच कल्पना नव्हती. तिनं अजाणता, अनवधानानं, भावनेच्या भरात धाडस केलं होतं, आणि त्याला एकच शिक्षा होती, मृत्यू. मानवनिर्मित असा हा नियम बदलवणं मात्र मानवाच्या हातात नव्हतं.

"तुझ्या भावाचं नाव काय ? तू त्याला काही कळवलंय् का ?" कॅप्टननं विचारलं.

"आनंद-आनंद सरनाईक त्याचं नाव. आम्ही दोघंच बहिणभाऊ. बाबा आम्हाला लहानपणी ' विजयानंद ' म्हणायचे, मंगळावर माझ्या कामावर रूजू झाले की एकदम त्याला कळवायचं म्हणून मी त्याला काही कळवलं नव्हतं."

"अरे ! तू आनंद सरनाईकची लहान बहीण आहेस का ? तो तर माझा जिवलग मित्र आहे, आम्ही दोघं रेडियो-सिग्नलिंगच्या प्रशिक्षणासाठी बरोबरच होतो. त्यानं मला ही ' विजयानंद 'ची गंमत बऱ्याच वेळा सांगितली आहे. पण 'यामिनी '-वर आपले दोन गट आहेत. त्यातल्या कुठल्या गटात तो आहे, माहीत आहे तुला ?"

"दोन नंबरच्या गटात."

तिच्याशी बोलता बोलता कॅप्टननं तिची माहिती काढून घेतली, ती त्याच्या मित्राची बहिणच होती, आणि भावाला भेटण्यापलिकडे तिचा कोणताच उद्देश नव्हता. पण या बहिण-भावांमध्ये 'तो' निष्ठूर कायदा होता. आणि त्याची अंमलबजावणी करणं भाग होतं, कॅप्टन आनंदचा मित्र होता तरीही-आणि विजयाशी त्याचं काही वैर नव्हतं तरीही.

कॅप्टननं प्रथम मुख्य यानाशी-स्टारडस्टशी-संपर्क साधला. त्याच्या सहकाऱ्याचा परिचित आवाज आला, "स्टारडस्ट. तुझी ओळख सांग, आणि लवकर बोल."



अनुक्रमणिका

"स्टारडस्ट मी कॅप्टन अभिजित-हनिड्यू-ऑपरेशन यामिनी-मला तावडतोब बॉसशी बोलायचय्."

'स्टारडस्ट'मधे काही क्षण कुजबुज झाली. लगेच त्याला बॉसचा आवाज ऐकू आला;

"काय गडबड आहे, कॅप्टन?"

"सर, 'हनिड्यू'मधे अनाहूत व्यक्ती आलीय."

"मग त्यात विचार करण्यासारखं काय आहे? त्या व्यक्तीला तावडतोब बाहेर ढकलून दे. ती अवकाशात आपोआप मरेल. तुला सगळे नियम माहीत आहेतच."

"पण सर, ही व्यक्ती म्हणजे आपल्या 'यामिनी'वरच्या पथकातल्या आनंद सरनाईकची लहान वहीणच आहे. तिला आनंदला भेटायचंय."

"बापरे! त्या मुलीनं हे भलतंच धाडस केलंय. पण कॅप्टन, आता आपला काही इलाज नाही. ती यानात राहिली. तर 'यामिनी'च्या कक्षेत पोहचाल तेव्हा तुमच्या यानाचं वजन दुप्पट होईल, गणकयंत्रानं केवळ तुझंच वजन लक्षात घेऊन इंधन ठरवलंय्. यामुळे इंधन संपून तुमचे यान केवळ गुरुत्वाकर्षणामुळे प्रचंड वेगानं यामिनीवर आपटेल. म्हणजे तुम्ही दोघं, आणि 'यामिनी' वर असलेले आपले आजारी लोक अशा सगळ्यांनाच मरावं लागेल. हे सगळं टाळण्यासाठी तिला ठार करणं आवश्यक आहे."

"पण सर, थोडा मानवी दृष्टीकोण ठेवून हिला वाचवता येणार नाही कां? थोडा विचार करा सर. आपल्या मित्राच्या वहिणीला ठार करताना मला काय वाटेल?"

"विज्ञान आणि तंत्रज्ञान मानवी भावनांच्या पलिकडे असतं, कॅप्टन. कोण कोणाची वहिण आहे, यापेक्षा तुझ्या यानाचं वजन वाढू न देणं महत्त्वाचं आहे. त्या मुलीनं अविचार केला. म्हणून आपण इतर सगळ्यांचा जीव आणि यान धोक्यात आणू शकत नाही. सगळ्या गोष्टींचा पूर्ण विचार करून तू त्या मुलीला बरोबर ७ वाजून १० मिनिटांनी यानाबाहेर ढकलून द्यावं. अशी मी तुला आज्ञा देतो. तू लगेच मला तसं कळव."

"सर, पण..." तो अर्धवट बोलत असतानाच संपर्क तुटला.

□ □ □

'त्याचं हे संभाषण विजया बाजूलाच उभी राहून ऐकत होती. कॅप्टननं घड्याळात पाहिलं. सहा वाजले होते. आता फक्त एक तास आणि दहा मिनिटे. बस! इतकंच त्या मुलीचं आयुष्य होतं.

"तुमचं काय ठवलंय कॅप्टन? कोणती शिक्षा देणार तुम्ही मला? ते लोक ढकलून दे, ठार कर असं कुणाला म्हणत होते? आपण यामिनीवर केव्हा पोहचणार?" ती एका मागून एक प्रश्न विचारू लागली.

क्षणभरासाठी कॅप्टन सुन्न झाला. या मुलीला सत्याची जाणीव करून द्यायलाच हवी होती. मनात वाक्याची जुळवणी करीत तो म्हणाला, "हे बघ विजया, तू उतावळेपणानं किती विचित्र परिस्थितीत सापडली आहेस, याची तुला कल्पना नाही. यानाचे नियम फार विचित्र आणि कडक आहेत. या यानात आपल्या आजारी लोकांसाठी औषधं आहेत. आणि माझ्यासह हे यान यामिनीपर्यंत पोहचवण्याइतकंच इंधन आहे. गणकयंत्रानं ते ठरवलं आहे. त्यामुळे यानात कुणाही अनाहूत व्यक्तीला राहता येत नाही. अशी व्यक्ती दिसल्याबरोबर तिला ठार करावं, असा मुळी नियमच आहे."

"म्हणजे कॅप्टन, तुम्ही मला ठार मारणार?" भीतीनं काळवंडत विजया म्हणाली, "मी तुमचा काय गुन्हा केलाय? माझ्या ऐवजी तुमची बहीण असती, तर तिला तुम्ही असं ठार मारलं असतं कां? मला तुमची लहान वहीणच समजा, कॅप्टन. मी माझ्या भावाला भेटायला उत्सुक झाले, हा माझा गुन्हा आहे कां?"

तिच्या खांद्यावर हात ठेऊन प्रेमानं थोपटत कॅप्टन हळूवार आवाजात म्हणाला, "प्रिय भगिनी, तू खरंच माझ्या बहिणीसारखी आहेस. आनंद माझा किती चांगला मित्र आहे, तुला माहित नाही. पण गणकयंत्र आपल्या भावना जाणत नाही, विजया. तू इथंच राहिलीस, तर उतरण्याच्या वेळी यानातलं इंधन संपेल. आपलं यान यामिनीवर

आपटलं, तर आपलं नखसुद्धा कुणाला दिसणार नाही."

विजया आता गंभीर झाली. "म्हणजे, कॅप्टन." ती म्हणाली, "याचा अर्थ स्पष्ट आहे. एक तर तुम्ही मला मारणार किंवा तुम्ही मारलं नाही, तर अपघातात मी मरणारच. मी माझ्या हातानं ही परिस्थिती निर्माण, केलीय् म्हणजे माझ्या एकटी-साठी सगळ्यांना धोका पत्करावा लागणार. ठीक आहे. कॅप्टन, माझ्या एकटीच्या मरणानं जर सगळ्या समस्या दूर होणार असतील, तर मी मरायला तयार आहे. तुम्ही खुशाल तुमच्या नियमाप्रमाणे वागा."

भीतीनं काळवंडलेल्या तिच्या चेहऱ्याकडे पाहणं कॅप्टनला अशक्य झालं. तो समोरच्या झगझगीत पडद्याकडे पाहू लागला. पडद्यावर यानाबाहेरचं दृश्य दिसत होतं. त्यांचं उद्दिष्ट असलेला 'यामिनी' ग्रह असंख्य तारकांच्या पार्श्वभूमीवर खुलून दिसत होता. पृथ्वीप्रमाणेच तो स्वतःभोवती फिरत होता. या ग्रहाला दोनच खंड होते आणि मध्ये विशाल सागर होता. यामिनी स्वतः भोवती फिरत असल्यामुळे त्याचा एक खंड हळूहळू दृष्टीपलीकडे, दुसऱ्या बाजूला सरकत होता. याच खंडावर कुठेतरी विजयाचा भाऊ आनंद होता. आणि विजया यामिनीच्या दिशेने प्रवास करीत असतानाच मृत्यूची वाट बघत होती.

□ □ □

"कॅप्टन, मी इथं बसून माझ्या आईबाबांना पत्र लिहू कां?" कॅप्टनची समाधी भंग करीत विजयानं विचारलं, "तुम्ही ही पत्र पोहचवण्याचं काम कराल कां?"

"जरूर! मी अगदी नक्की तुझी पत्रं पोहचवेन" तो म्हणाला.

विजयानं भराभर पत्र लिहायला सुरुवात केली. मध्येच तिनं विचारलं, 'कॅप्टन, आपण आनंदशी बोलू शकणार नाही कां?"

त्याच्या मनातलेच विचार तिनं बोलून दाखवले होते. कॅप्टन एकदम उत्साहित झाला. त्याला घाई करणं आवश्यक होतं. कारण आनंदचं पथक असलेला तो खंड पूर्ण पलिकडच्या बाजूला वळला असता, तर त्याच्याशी रेडिओ संपर्क साधणं अशक्य झालं असतं.

त्याच्या घड्याळीला 'यामिनी'कडून क्षीण आवाजात प्रत्युत्तर आल्यावरोबर तो म्हणाला, "हॅलो ऽऽ, मी 'हनिड्यू'मधून कॅप्टन अभिजित बोलतोय्. तुमच्या पथकातला आपला आनंद सरनाईक आहे ना? त्याला तावडतोब बोलवा."

"आनंद दोन सहकाऱ्यांबरोबर पलिकडच्या पर्वतावर गेलाय्. इतक्यात येईलच. काही महत्त्वाचा निरोप आहे कां?"

"हो. तो आल्यावरोबर त्याला आमच्याशी संपर्क साधायला सांगा. त्याला महत्त्वाची बातमी द्यायची आहे."

"ठीक आहे."

संदेश संपवून कॅप्टन विजयाकडे वळला. ती आई-वडिलांचा निरोप घेणारी अखेरची पत्रे लिहीत होती. आनंद भेटल्यावर त्याला काय सांगायचं याचा तो विचार करू लागला.

"कॅप्टन, आनंद लवकर येऊन आपल्याशी बोलू शकेल, असं वाटतं कां तुम्हाला?"

"हो अगदी नक्की" कॅप्टननं धीर दिला.

"मला त्याचा आवाज ऐकण्याची खूप उत्सुकता आहे, कॅप्टन मला खूप एकटं एकटं वाटतंय्. माझा लाडका भाऊ आनंद! मी मॅट्रीक झाले, तेव्हा त्यानं मला हे घड्याळ देऊन दिलं होतं. खरंच, आपल्यावर किती लोक प्रेम करीत असतात, नाही?"

तिचं बोलणं सुरू असतानाच यामिनी वरून संकेत मिळाला. कॅप्टन धावतच बोर्डजवळ गेला.

"हॅलो ऽ, हनिड्यू? मी आनंद सरनाईक बोलतोस्. माझ्यासाठी काय निरोप आहे?" आनंदचा आवाज आला.

"यार आनंद, मी अभिजित बोलतोय. आपण ट्रेनिंगला असताला तू मला तुझ्या बहिणीबद्दल सांगायचास ना? विजयाबद्दल?"

"हं! तिचं काय? तुला लग्न-बिग्न करायचंय् कां तिच्याशी?"

"मला माफ कर मित्रा. ती माझ्या यानात चोरून शिरलीय. एक अनाहूत म्हणून."

"काय सांगतोस अभि? तिनं हा मूर्खपणा

कसा काय केला ? कशासाठी ?"

"ती 'स्टारडस्ट'मधून इतरांबरोबर मंगळा-वर चालली होती. मला 'यामिनी'साठी हुकूम मिळाला हे तिला कळल्यावर तुला भेटण्यासाठी ती चोरून 'हनिड्यू' मध्ये शिरली. सॉरी यार, विजू मला वहिणीसारखी आहे. पण 'हनिड्यू' यामिनीवर उतरणंसुद्धा महत्त्वाचं आहे. त्यासाठी नियमाप्रमाणे—"

"तुझी काहीच चूक नाही कॅप्टन, ती आहे कुठे ?" आनंदनं विचारलं.

"तू तिच्याशीच बोल" कॅप्टननं विजूला बोलावलं.

"हॅलो, विजू ? तू असं कसं केलंस गं ?"

"मला तुमचे नियम माहीत नव्हते रे ! खरंच माहीत नव्हते," हुंदके देत विजया म्हणाली, "दादा, तुला भेटण्यासाठी मी चोरून शिरले. मला इतक्यात मरायचं नाही दादा. तू तरी काही कर माझ्यासाठी. असे कसे तुमचे नियम ?"

"रडू नकोस विजू. जे झालं त्याला कुणाचाच इलाज नाही. हा नियम माणसानंच बनवला असला, तरी तो बदलवणं कुणाही माणसाला शक्य नाही. तू यानात राहणं सगळ्यांनाच धोक्याचं आहे. अभिजित तुला वहीण समजतो. पण त्याचाही काही इलाज नाही." आनंद म्हणाला.

"तू आईबाबांना सगळं समजावून सांग. खरं म्हणजे मला तुझ्याशी किती बोलायचंय."

ती बोलत असताना यामिनीचं स्वत:भोवती फिरणं कॅप्टनला दिसत होतं. आनंद असलेला तो भूखंड थोड्याच वेळात रेडियो संपर्काबाहेर जाणार होता. आनंदलाही त्याची कल्पना होती. त्यानं कष्टानं विजयाचा निरोप घेऊन कॅप्टनला पुन्हा बोलावलं.

"अभि, तुझी काहीच चूक नाही." आनंद म्हणाला, "तू मनाला लावून घेऊ नकोस. आपले नियम आता गणकयंत्र ठरवतात. तू माझ्यासाठी फक्त एकच कर विजूला कमीत कमी त्रासात मृत्यू येऊ दे."


"दोस्ता, तुझी आणि माझी वहीण यात काही फरक आहे कां ? तू काही काळजी करू..." आणि रेडिओ–संपर्क तुटला.

विजया आता कमालीची गंभीर झाली होती. तिच्या गालावर ओघळलेले अश्रू आता सुकले होते.

□ □ □

ठीक सात वाजून दहा मिनिटांनी कॅप्टननं त्या नियमानुसार आपलं कर्तव्य पार पाडलं. त्याला आता 'यामिनी' अगदी स्पष्ट दिसत होता. त्याचं यान क्षणाक्षणाला यमिनीजवळ चाललं होतं. आता 'हनिड्यू' सुखरूप उतरणार होतं. त्याच्या बाजूची ती चौकोनी पेटी आता रिकामी होती. विजयानं लिहून ठेवलेली ही दोन शेवटची पत्रं त्याच्या समोरच होती. त्या रिकाम्या जागेकडे पाहताना कॅप्टनचे डोळे नकळत पाणावत होते. त्याच्या कानात शब्द उमटत होते, "कॅप्टन, मी तुमचं काय वाईट केलंय ?...मला इतक्यात मरायचं नाहीये हो...कॅप्टन, माझ्याऐवजी तुमची वहिण असती तर, तुम्ही तिला असंच मारलं असतं कां ?...मला तुमचे नियम माहीत नव्हते... खरंच माहीत नव्हते..." (आधारित)

□ □



## गायक नट

अरुण दत्तात्रेय वेलणकर

संगीत नाटकात संगीत भूमिका करणारा नट म्हणजे गायक नट. संगीत नाटकात जशा संगीत भूमिका असतात तशा काही गद्य भूमिकाही असतात. उदाहरणार्थ 'मत्स्यगंधा' या वसंत कानेटकरांच्या नाटकात सत्यवती, पराशर, शंतनू या संगीत भूमिका आहेत तर त्याच नाटकातली सत्यव्रताची–भीष्माची–भूमिका गद्य भूमिका आहे. तेव्हा 'संगीत मत्स्यगंधा' हे नाटक जरी संगीत या विशेषणाने अन्वित असले तरी त्या नाटकात भूमिका करणारा प्रत्येक नट काही गायक नट ठरणार नाही. 'सं. मानापमान' या कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांच्या नाटकात चोराची भूमिका करणारा हा काही गायक नट ठरणार नाही. म्हणून संगीत नाटकात भूमिका करणारा तो गायक नट, असे न म्हणता संगीत नाटकात संगीत भूमिका करणारा तो गायक नट असे म्हटले पाहिजे.

मराठी रंगभूमीविषयी, मराठी संगीत नाटकाविषयी आजवर विपुल लेखन झाले आहे, या लेखनात गायक नट हा शब्दप्रयोग वारंवार उपयोगात आलेला आहे. या विपुल नाट्यसमीक्षेत गायक नट हा शब्दप्रयोग विशिष्ट अर्थाने वापरण्यात आला आहे. हा विशिष्ट अर्थ कोणता? हा विशिष्ट अर्थ असा की गायक नट म्हणजे ज्याच्याजवळ अभिनयसामर्थ्य बेताचेच आहे पण जो गाणे दणक्यात म्हणू शकतो, रंगवू शकतो

तो गायट नट.[१] केशवराव भोळयांनी प्रेक्षकांच्या गायकनटाविषयीच्या समजुतीचे असेच वर्णन केले आहे. ते म्हणतात "पहिल्यापासूनच संगीताला लालचावलेला आमचा श्रोतृवर्ग या संगीत नटांकडून अभिनयाची फारशी अपेक्षा करीत नाही." हा प्रेक्षक गाण्यांना वन्समोअर द्यायला मात्र चटावलेला असतो, असे सांगून केशवराव पुढे म्हणतात–"त्याशिवाय का सवाई गंधर्वांची वेडीवाकडी तोंडे व केशवरावांचे निरर्थक हातवारे व कष्ट प्रेक्षकांनी मुकाट्याने पाहून घेतले ?"[२] आपल्या मनातला अर्थ असाच असतो. या अर्थानेच सर्वत्र गायक नट हा शब्दप्रयोग वापरण्यात येत असतो. तुमच्या माझ्या मनात तर गायक नटाचा असा अर्थ असतोच, पण त्याहून गंमत म्हणजे स्वत: गायक नटांच्या मनातही बहुधा असाच अर्थ असतो ! आपण गायक नट आहोत, संगीत नाटकात काम करतो आहोत, तेव्हा जुजबी अभिनयापलीकडे जाण्याचे आपल्याला कारण नाही, आपण आपले गाणे टिच्चून म्हटले म्हणजे झाले, अशीच स्वत: गायक नटांची समजूत असावी असे वाटते.

नाटयकला ही एक विलक्षण कला आहे. अनेक घटकांच्या परस्परसहकार्याने तिचा इमला उभा राहतो. त्यामुळे पुष्कळदा The Show must go-on या ब्रीदाकडे लक्ष देऊन तडजोडी स्वीकाराव्या लागतात. त्यामुळे असे झाले असावे का ? शेक्सपीयरच्या हॅम्लेटमधील हॅम्लेट या राजपुत्राचे वय विशिपंचविशीचे असावे. पण हॅम्लेटची भूमिका करणारे व गाजवणारे नट पाहावे तो प्रौढत्वाकडे झुकलेले वा वार्धक्याच्या सीमेत थोडी पावले पुढे गेलेले, रूपेरी केसांचे वा टक्कल पडलेले–हे तडजोडीचे उदाहरण नेहेमी देण्यात येते. हे उदाहरण खूपच बोलके आहे. ज्याने अनेक वर्षे कलाक्षेत्रात ठाम उभे राहून, वेगवेगळया भूमिका साकार करून आपले अभिनयनैपुण्य सिद्ध केले आहे, प्रस्थापित केले आहे अशा नटाला सोडून नव्या, अननुभवी पोरसवदा नटाला हॅम्लेटची भूमिका करण्याची संधी कोणी झाले तरी कशी देणार ? हॅम्लेट ही भूमिका शेक्स्पीयरने अशी लिहिली आहे की जी पोक्त, जाणत्या अभिनेत्याची, पक्व अभिनयाची मागणी करते. पक्व अभिनेता देता देता 'पक्व माणूस' या भूमिकेत उभा करावा लागतो अशी ही कोंडी आहे. कै. गणपतराव जोशी यांनी वयाच्या पन्नासाव्या वर्षी केलेली हॅम्लेटची भूमिका नानासाहेब फाटकांनी पाहिली होती. त्या भूमिकेचे सुंदर वर्णन नानासाहेबांनी केले आहे[३] प्रस्थापित गायनाचार्यांशिवाय मानापमानातील धैर्यधर, सौभद्रातील कृष्ण वा अर्जुन या भूमिका दुसऱ्याला देण्याचे धाडस कोण करील ? ज्या नाटयनिर्मात्यांनी 'नवीन रक्ताला वाव' दिला त्यांचा अनुभव काही फारसा चांगला नाही. म्हणून मग छोटा गंधर्व, विमलबाई कर्नाटकी यांचे मानापमान स्वत:चा रसिक म्हणून होणारा मान–अपमान बाजूला ठेवून रसिकांनी पाहिले. नानासाहेब फाटकांचा 'एकच प्याला'तील सुधाकर असाच पाहिला. त्या अभिनवदर्शनाच्या स्मृती आपल्या मनात जपल्या. सुधाकर नुकताच वकिली चालू करणारा तरुण आहे या Texual Fact कडे आम्ही दुर्लक्ष केले. बालगंधर्वांच्या उत्तररायणातील सिंधू, रुक्मिणी, भामिनी पुन्हा पुन्हा पाहून हृदयाच्या अंतर्हृदयात सांभाळन ठेवल्या. नाटयकलेला अशा तडजोडी कराव्या लागतात. या तडजोडीमुळे आम्ही 'गायक नट' या शब्दांचा अर्थ सीमित केला असावा.

इतर नटांना म्हणजे गद्य नटांना शारीरिक अनुकूलता आणि अभिनयसामर्थ्य या दोन गोष्टींची आवश्यकता असते तर गायकनटाला शारीरिक अनुकूलता, अभिनयसामर्थ्य यांच्या जोडीला गायनकला यावी लागते. नुसते गायनकौशल्य नाही तर नाटयानुकूल गायनकौशल्य त्याच्या ठिकाणी असावे लागते. हा त्रिवेणीसंगम नसेल तर गायक नट म्हणून त्याच्यात मोठेच वैगुण्य राहणार. यात शंका नाही. या वैगुण्यासह एखाद्या नटाला गायक नट म्हणून स्वीकारणे ही तडजोडच होय. गायनकौशल्याचा थोडा विचार केला तर रंगभूमीवरील गाण्याला विशिष्ट प्रकारचे गानकौशल्य लागते असे दिसेल, पहिला विशेष म्हणजे हे गाणे उभे राहून म्हणायचे असते. विद्याधर गोखल्यांच्या 'मंदारमाला'मध्ये काही गाणी बैठक मारून बैठकीवर बसून म्हणण्याची सोय आहे ही गोष्ट

वेगळी ! आवाज साधना शास्त्राचे म्हणणे असे आहे की उभ्याने गाताना श्वासोश्वास जास्त नैसर्गिक होऊ शकतो व त्याने गायनक्रिया सुलभ होऊ शकते. (आवाज साधना शास्त्र, वी. आर्. देवधर, पृ. २३) दुसरे वैशिष्ट्य म्हणजे खाखरून खोकलून आवाज 'लावण्याची' रंगभूमीवर सोय नसते. गद्य बोलता बोलता स्वरांची दुनिया उभी करायची असते. कै. सवाई गंधर्व यांचा आवाज लागायला बराच वेळ लागत असे. बैठकीतही आणि रंगमंचावरही. पण एकदा आवाज लागला की ते गाणे ऐकणाऱ्याला खूप करून टाकायचे. बैठकीत हे ठीक आहे पण रंगमंचावर आवाज लागायला वेळ लागणे म्हणजे गायक नट म्हणून त्यांच्या ठिकाणी न्यून होते हेच सिद्ध करणारे आहे. कै. सवाई गंधर्व हे फार मोठे गायक होते, आणि गायक होते म्हणून त्यांना अनेकदा संगीत नाटकात उभे रहावे लागले. पण गायक नट म्हणून हुकमी आवाज लागण्याच्या बाबतीत ते कमी पडत असेच म्हटले पाहिजे. या बाबतीत कै. बालगंधर्वांच्या कौशल्याची अनेकांनी स्तुती केली आहे. गद्यातून पद्यात–स्वरांच्या दुनियेत–ते अलगद प्रवेश करीत. विराम, धसमुसळेपणा, वेगळा आवाज असा काही प्रकार बालगंधर्वात नव्हता. या गानकौशल्याचे काही गायक मात्र स्पर्धेत रूपांतर करीत व आपले सामर्थ्य पणाला लावीत. आधीच्या पात्राने पांढरी दोन मध्ये पद म्हटले की ऑर्गनवाल्याला तीन बोटे दाखवून पांढरी तीन मध्ये यांचे गायन सुरू. बापूराव जोशींसारखे संगीतप्रेमी ज्या काळाला मराठी संगीत रंगभूमीचे सुवर्णयुग असे म्हणतात तो इ. स. १९११ ते १९३३ हा दोन तपांचा काळ म्हणजे नाट्य आणि संगीत यांच्यातील असंतुलनाचा, संगीताच्या वर-चष्म्याचा व नाट्याच्या निकृष्टतेचा काळ होता.[४] पु. ल. देशपांडयांनी म्हटल्याप्रमाणे रंगभूमीवर उभे जलसे चालू झाले होते.[५] 'वन्समोअर्'चे खूळ बोकाळले. गंधर्व झाले तरी एखादे पद १८–१८, २०–२० वेळा म्हणणे हा अत्यंत नाट्यविघातक प्रकार होता. याच काळात 'संगीत नाटक', 'गायक नट' या शब्दांचे अवमूल्यन झाले ! नाटककार, समीक्षक, नट, प्रेक्षक हे सर्वच घटक या ऱ्हासपर्वाला जबाबदार आहेत. केशवराव भोसले आणि नारायणराव राजहंस–बालगंधर्व यांचे 'संयुक्त मानापमान', 'संयुक्त सौभद्र' हे प्रयोग कशाचे द्योतक आहेत ? या दोन महान गायक नटांच्या लोकप्रियतेचे द्योतक आहेत. दोन नटसम्राटांची झुंज लोकांना पहायची होती, मानापमान वा सौभद्र ही नाटके पहायची नव्हती. ती नाटके लोकांनी आधीच अनेकवार पाहिली होती. अनेकांना ती तोंडपाठ झाली होती ! गायक नट हे एक मोठे प्रस्थ झाले होते, हेच संयुक्त प्रयोगाने सिद्ध केले. खाडिलकर, भास्कर-बुवा बखले आणि अल्लादियाखाँ यांनी संयुक्त प्रयोगाला विरोध केला होता. केशवरावांच्या तेजस्वी गायनापुढे बालगंधर्वांची भामिनी निष्प्रभ ठरेल असा धोका त्यांना त्यात दिसत होता. पण 'मी वचनबद्ध झालो आहे' असे त्रोटक उत्तर देऊन बालगंधर्वांनी आपल्या हितचिंतकांचा सल्ला अव्हेरला.[६]

केशव–नारायण या दोघांनाही नाट्यानुकूल गाण्याची तालीम मिळाली होती. प्रतिभा आणि परिश्रमाने त्यांनी संगीत रंगभूमीवर स्वतःची एक शैली प्रस्थापित केली होती. दोघांचेही अनेक चहाते होते. रसिकांना त्यांनी वेड लावले होते. स्वदेशहितचिंतक नाटक मंडळीत लहान केशवला जनुभाई निमकरांनी देवलांच्या शारदा नाटकातील शारदेची भूमिका वास्तवशैलीत पढवून तयार केले होते. जनुभाऊंनी त्याला नाटकी गाण्यात जो विवेक बाळगायचा असतो त्याची संथा दिली.[७] बालगंधर्व हे बखलेबुवांचे शिष्य, केशवराव भोळ्यांनी बखलेबुवांच्या एका बैठकीचे वर्णन केले आहे. त्या बैठकीत भास्करबुवा बखल्यांना तंबोऱ्यावर साथ करायला बसले होते बालगंधर्व आणि मा. कृष्णराव फुलंब्रीकर. बखलेबुवांच्या गळ्यातून जी जी अवघड जागा निघेल ती ती कृष्णा मास्तर सही सही आपल्या गळ्यातून काढत होते. आणि बालगंधर्व ? फक्त अधून मधून षड्ज्–पंचम दाखवत होते. सीधा आकार लावून.[८] बालगंधर्वांच्या गळ्याची जातच वेगळी हे ओळखून बखलेबुवा, कृष्णा मास्तर आणि गोविंदराव टेंबे यांनी उत्तरहिंदुस्थानी चिजांमधून खास निवडक

चिजा बालगंधर्वांच्या गळ्यावर चढवल्या. या चिजांची घट्ट, दिसायला सोपी पण म्हणायला कठीण अशी एक एक बंदिश बालगंधर्वांचा स्वर आणि खाडिलकरांचे 'ठाकठीक बसवलेले' शब्द यांच्या माध्यमातून मराठी संगीत रंगभूमीवर पराक्रम करू लागली प्रेक्षकांना (की श्रोत्यांना ?) दिपवू लागली. प्रेक्षकांना सुखवू लागली. कारण बालगंधर्व त्या त्या भूमिकेचा अभिनयही उत्तम करीत असत. एवढेच नव्हे तर त्यांच्या गायनातही अभिनय होता. दोन्ही अर्थांनी त्यांच्या गायनात अभिनय होता. एकतर गातांना त्यांचा शारीरिक, आहार्य आणि मुद्राभिनय रसानुकूल असा असायचा. शिवाय तो खराखुरा वाचिक अभिनय असायचा. बालगंधर्वांचा स्वर कोरडा, केवल स्वर नव्हता जसा तो शास्त्रीय संगीतात काही बाबतीत अपेक्षित असतो, तो स्वर भावार्द्र स्वर होता. शकुंतला, सुभद्रा, भामिनी, रुक्मिणी यांच्या भावभावनांचे नाजुक तंतू त्या स्वराला बिलगून राहत. स्वर–भाव–एकूण नाट्य यांचे एक संपृक्त द्रावण त्या गाण्यातून चांदण्यासारखे बरसत होते. केशवराव संगीतसूर्य होते तर नारायणराव नाट्यसंगीताची चंद्रिका ही जणू ! "शास्त्रीय दृष्टीने गायनात श्रेष्ठ असलेले नट मी पाहिले आहेत. पण पदातील अर्थाला व रसाला सांभाळून रंगभूमीवर गायन व अभिनय करणारा नट श्री बालगंधर्व यांच्याशिवाय अजून मला आढळलेला नाही." असे नानासाहेब फाटक नमूद करतात.[१]

असे हे केशव–नारायण संयुक्त प्रयोगाच्या आखाड्यात उतरले. संयुक्त प्रयोगात आणि त्यांच्या त्यांच्या कंपनीतील एकखांबी प्रयोगातही त्यांना वन्स्मोअरचा बालिश हट्ट पुरवावा लागला. म्हणून म्हणायचे की गायक नट हे एक प्रस्थ होते. केशवनारायणचा अपवाद बाजूला ठेवला तर बेसुरेपणाची किमत देऊन रंगभूमीवर चक्रीतानांचा पाऊस पाडणारे अनेक नट होते. दे हाता शरणागताची वन्स्मोअर्साठी आवर्तने चालू झाली की ही सारी विनवणी जिच्यासाठी ती भामिनी विंगेत जाऊन बसू लागली. जवडयाच्या ताना घेत चेहरा वेडावाकडा करीत संगीताची धुवांधार बरसात गायक नट करू लागले. अभिनयाच्या वाटेला जाण्याचे त्यांना कारण नव्हते. ते गायक अधिक, नट नाममात्र होते. आपली भूमिका गायकाचीच, नटाची नव्हे अशी त्यांची ठाम समजूत होती. त्यांचा सारा पराक्रम गाण्यात होता. नाटकाच्या 'प्रेक्षकाचे' रूपांतर 'श्रोत्यात' झाले होते. जे खरोखर प्रेक्षक होते ते संगीतनाटकाला व गायक नटाला कंटाळले होते.

गायक नटांनी प्रेक्षकांना श्रोते बनवले. श्रोते बनवले हेही अर्धसत्य आहे, त्यांनी फक्त गायनाचे श्रोते बनवले असे म्हणणेच योग्य होईल. म्हणजे हा श्रोता गद्य संवादांकडे कान देत नसे तर फक्त गाणे ऐकायला आतूर असे. जुन्या संगीत नाटकाच्या प्रेक्षकाविषयी असे सांगतात की गाणे संपले की रंगमंदिराबाहेर पडून चहाचिवडा, विडीकाडी आणि नुकत्याच ऐकलेल्या गाण्याची वाहवा यात श्रोते दंग होत. पुन्हा ऑर्गनचा स्वर कानांवर पडला की पुढचे गाणे ऐकण्यासाठी घाईघाईने आपल्या जागेकडे धाव घेत. नाटकाचा गद्य भाग या आंबटशौकीन श्रोत्यांच्या दृष्टीने नगण्य होता. बरे संगीत नाटकातील गाण्याकडे तरी हा प्रेक्षक नाट्यसंगीत म्हणून बघत होता का ? शंकाच आहे. तो संगीत म्हणून, नेमके सांगायचे तर शास्त्रीय–रागदारी चिजांचे–संगीत या दृष्टीने पाहात होता. या सर्व प्रकारात शास्त्रीय संगीताचे भले झाले, संगीत नाटकाची मात्र थोडी हानीच झाली. शास्त्रीय संगीताच्या दृष्टीने लोकांचा कान तयार झाला. ग्रामोफोनने भूप, यमन, भीमपलास, इत्यादी राग माजघरांपर्यंत पोचवले. गाणे शिकण्याची हौस लोकांत वाढीला लागली. खाडिलकरांच्या संगीत नाटकांची म्हणजे त्यातील पदांची नोटेशन्सची पुस्तके निघाली. हार्मोनियम घेऊन त्यावर ही गाणी वाजवून पाहण्याचा प्रयत्न आबालवृद्धात आणि स्त्रियात वाढीला लागला. हौशीने गाणे म्हणणे म्हणजे नाटकातले गाणे म्हणणे अशी रीत होती. सिनेगीते वा भावगीते अजून प्रतिष्ठित झाली नव्हती. संपूर्ण समाजात एक संगीतप्रेमाचे वातावरण निर्माण झाले, संगीताला प्रतिष्ठा मिळाली. उग्रप्रकृती लोकमान्य टिळकांचे उग्रप्रकृती सहकारी कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर हे संगीत नाटके लिहून या सांगीतिक

वातावरणात रममाण झाले होते. स्वतः खाडिलकरांनी प्रौढ वयात संगीत शिकण्याचा रीतसर प्रयत्न केला. खाडिलकरांना गुरुस्थानी मानणारे त्या काळातले एक नाटचाभ्यासी–नाटककार शंकरराव सहस्रबुद्धे यांनी सांगितले आहे की खाडिलकरांचे निकटवर्ती स्नेही त्यांच्या आडनावातील आद्याक्षर अंत्यस्थानी ठेवून नाटचाचार्यांना गमतीने 'डिलकरखा' म्हणू लागले होते.[१०] या सर्व वातावरणाचा शास्त्रीय संगीताला निखालसपणे फार फायदा झाला. मराठी रंगभूमीचे हे शास्त्रीय संगीतावर फार मोठे उपकार आहेत. या एकूण प्रकारात नाटचसंगीत या द्वंद्वसमासातील नाटच हे प्रथम पद मात्र क्षीण ठरत गेले हेच काय ते वाईट झाले.

कै. मा. दीनानाथ मानापमानात धैर्यधर म्हणून उभे राहिले. ते दिसत रुबाबदार. काम तडफेने करीत. बलवंत नाटक मंडळीतले ते बलवंत गायक होते. धैर्यधराची गद्य वाक्ये ते काहीसे घाईने म्हणत असे सांगतात. पदांमध्ये मात्र त्यांनी पूर्णतः स्वतःची शैली आणली. कित्येक गाण्यांच्या चाली बदलून टाकल्या. ताल बदलले.[११] पहिले धैर्यधर होते. नानासाहेब जोगळेकर. टेंबेबुवा धैर्यधराच्या भूमिकेत वावळट दिसत असे थोरामोठ्यांनी लिहून ठेवले आहे.[१२] पुढे अनेकांनी धैर्यधर केला. संशयकल्लोळातील रेवतीची भूमिका बालगंधर्व उत्तम करीत. पण त्यांच्याहून सरसपणे अभिनय व गायन करून रघुवीर सावकार व कमलाबाई बडोदेकर यांनी बालगंधर्वांचे या भूमिकेचे यश हिरावून घेतले असे केशवराव भोळे लिहितात.[१३] गायकनट म्हणून यशस्वी ठरलेल्या कलावंतांची यादी फार मोठी नाहीं ही वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे. तसे तर गायकनट पुष्कळच होऊन गेले पण खऱ्या अर्थाने गायकनट पदवीला फार थोडे पोचू शकले हे खरे आहे, गायनाचीच छाप अधिक पाडून अनेकांनी गायकनट म्हणून उपजीविका केली असा इतिहास आहे. त्यापैकी अनेकांचे खूप नावही झाले पण ते गायनामुळे झाले हे उघडच आहे.

गायकनटात गायनाची मातबरी आणि अभिनयाची चालढकल असे पूर्वीपासून होते का? किर्लोस्कर देवलांच्या काळातही असे होते का? असे नव्हते अशी लोकांची साक्ष आहे. रागदारी भाग किर्लोस्कर देवलात कमी होता. साकी, दिंडी, आर्या, श्लोक, लावणी, कटाव, संवादपर पदे यांची त्यांच्या नाटकात रेलचेल असायची. गायनविस्तार हा मोजक्याच पदांच्या बाबतीत शक्य असे. भावाविष्कार हे पदांचे प्रयोजन होते. केवळ सांगीतिक मनोरंजन हे नव्हते. नाटचासह संगीत, नाटचासाठी संगीत, नाटचांतर्गत संगीत, नाटच व्यक्त करणारे संगीत अशा सर्व अर्थांनी ते नाटचसंगीत होते, म्हणजे गायक आणि नट या दोन्ही भूमिका समान होत्या तशाच भूमिका किर्लोस्कर देवलांनी लिहिल्या होत्या. केवळ गद्य भागाचा विचार केला तरी शारदा, सुभद्रा, भुजंगनाथ, कृष्ण, शकुंतला ही पात्रे अभिनयाची मागणी करणारी होती. गायन आणि अभिनय या दोन्हींकडे नट, नाटककार लक्ष पुरवत होते. कुठे चुकले तर केरूनाना छत्र्यांसारखे जाणकार संबंधितांना सूचना करीत, दाटतही असत. पदांचे शब्द स्पष्ट, साभिनय आणि सांगीतिकता सांभाळून म्हणणे भाग होते अशीच नाटकाची संहिता असे. कारुण्याची छटा आणल्याशिवाय 'वद जाऊ कुणाला' म्हणले तर चालणार नाही. चेष्टेचा आविर्भाव आणि स्वर लावल्याशिवाय 'साम्य तिळहि नच' पद म्हणता येणार नाही. 'मोडुनि दंडा फेकुन देईन' ही साकी नुसत्या चढया स्वरात नव्हे तर अर्जुनाचा उत्साह दाखवतच म्हटली पाहिजे. 'नच सुंदरि करू कोपा' म्हणताना प्रियेची आर्जवे दिसायला हवीतच. **साभिनय गायन** या पदांच्या संदर्भात अटळ होते. 'लग्नाला जातो मी' म्हणणारा नारद मिष्किल वाटायलाच हवा! या सर्व पात्रांकडे आणि त्यांच्या पदांकडे केवळ सांगीतिकदृष्टचा पाहणे अशक्यच होय. अर्थातच या भूमिका करणारे गायक नट गायक हवेत, नटही हवेत. कमीजास्त चालण्यासारखे नाही! भाऊराव कोल्हटकरांच्या 'शापसंभ्रम'मधील पुंडरीकाच्या भूमिकेचे गणपतराव बोडसांनी सुंदर वर्णन केले आहे.[१४] दिसणे–तेजस्वी रूप, तेजस्वी अभिनय, तेजस्वी स्वर आणि सर्वार्थांनी साभिनय गायन साकारत असे. बाल-

गंधर्वांनी सिंधूची पदे साभिनय म्हणून अजरामर केली. छोटा गंधर्वांनी सतत स्वतःच्या अभिनयावर आणि गाण्यावर परिष्करण करीत, प्रयोग करीत आम्हाला चारुदत्त, कृष्ण, धैर्यधर दाखविला. प्रसाद सावकार नव्या पिढीला असेच 'गायक नट' वाटले. पण ही यादी फार लांबवता येत नाही ! जयराम शिलेदार, जयमाला शिलेदार, कीर्ती शिलेदार, राम मराठे, प्रकाश घांग्रेकर, शरद जांभेकर, विश्वनाथ बागूल, नारायण बोडस, मधुवंती दांडेकर, ज्योत्स्ना मोहिले इत्यादी जुनी-नवी गुणी मंडळी संगीत रंगभूमीवर नांदत असूनही त्यांना खऱ्या अर्थाने संगीत भूमिका करण्याची संधी नव्या संगीत नाटकांनी दिलेला नाही. पं. जितेंद्र अभिषेकींसारखा प्रतिभावान संगीत दिग्दर्शक लाभला पण संगीत नाटकाच्या संहिताच कमी पडल्या. त्यामुळे पुनरुज्जीवित संगीत रंगभूमीवर मराठी प्रेक्षकांना गायक नट / नटी ऐवजी गायक गायिकांचेच दर्शन घडले.

पुनरुज्जीवित संगीत नाटके ही तर खोटी संगीत नाटके आहेत. संवाद किंवा स्वगत म्हणून नव्हे तर 'एक गाणे' हेच त्यातील पदांचे नाटय-रहित स्वरूप आहे. गद्यात थोडाफार अभिनय आणि पदात गायकी शक्ती असे सरळ द्वैतच या नाटकातून उभे राहते. गायन आणि अभिनय या दोन्ही भूमिका एखादे वसंतराव देशपांडे 'कट्यार काळजात घुसली'मध्ये सारख्याच ताकदीने पेलतात पण त्यांना त्यांच्या 'गाण्यात' अभिनय आणणे नाटककाराने शक्य होऊ दिले होते का हा खरा प्रश्न आहे. घेई छंद, सुरत पियाकी ही नुसती गाणी आहेत. साभिनय म्हणायची गीते नव्हेत. अशी साभिनय म्हणायची गीतेच या पुनरुज्जीवित संगीत नाटकात नाहीत ही खरी तक्रार आहे. म्हणजे अभिनय आणि गायन यांच्यात जास्तात जास्त अंतर कोणी निर्माण केलेच असेल तर ते आमच्या नव्या संगीत नाटककारांनी निर्माण केले. मंदारमालामधील तिसरा अंक-नाटयाचा उत्कर्षप्रसंग पहावा. मंदार, माला, मदनगोपाल यांच्या एखाद्या गद्य वाक्यात आवेश, कुत्सितपणा याचा थोडा 'अभिनय' असला तरी बाकी गाण्याचा आखाडा आहे. त्याला नृत्याचे तोरण बांधले आहे असे दिसेल.

किर्लोस्कर-देवलातील नाटयसंगीतात अभिनय आणि गायन यात नाटयाचा वरचष्मा होता. नाटयाने त्यांच्या पदांना गोडी आणि रसवत्तेचे सामर्थ्य दिले. खाडिलकरात सांगीतिक सामर्थ्याचे पारडे जड झाले. नव्या रूपातील संगीत नाटकांनी अभिनय आणि गायन यांची विभक्तताच जोपासली, गायक नटाचा अर्थ सीमित केला. गायक नटातून 'साभिनय गाणे' हा वैशिष्टयपूर्ण अर्थ पुसूनच टाकला. सर्वार्थांनी नाटककारांची ही चूक होती आणि आहे. तत्त्वतः गायक नट हा गद्य नटाहून श्रेष्ठ ठरावा. गद्य नटाला संवादातून सूचित होणाऱ्या नाटयपात्राला आंगिक, वाचिक, आहार्य आणि सात्विक अभिनयाद्वारा साकार करावे लागते. संवादांचा आणि स्वगतांचा नाटयाविष्कार करावा लागतो. गायक नटाला संवाद, स्वगत गद्य आणि पद्य दोन्हीतून नाटयाविष्कार करावा लागतो. 'गायक नट किंवा नटीला रूप, आवाज, शास्त्रीय गायन, आणि अभिनय हे सारेच प्राप्त झाले असले पाहिजे' असे नानासाहेब फाटकांनी म्हटले आहे ते योग्यच आहे.[५] गायक नटाला नुसते गावे लागत नाही नाटयनिष्ठ गावे लागते, साभिनय, रसाविष्कारी, नाटयाविष्कारी गायन करावे लागते. मुळातच गद्य नटापेक्षा अधिक सामर्थ्याची त्यांच्याकडून अपेक्षा ठेवायला हवी. म्हणून म्हणायचे की गायक नट हा एक महान कलावंत असतो. त्याच्यातील कलावंताला कलात्मक आव्हान देणारी नाटके हवीत आणि नाटककार हवा. खऱ्या संगीत नाटकाची निर्मिती व्हायला हवी.

संदर्भ :


१. बाबूराव जोशी, संगीताने गाजलेली मराठी रंगभूमी, काँटिनेंटल प्रकाशन, पुणे दु. आ. १९७४, पृ. ९०

२. केशवराव भोळे, अंतरा, मौज प्रकाशन, मुंबई प. आ. १९६७, पृ. २४

३. नानासाहेब फाटक, स्मृतिसुगंध, सोमैया प्रकाशन, मुंबई प. आ. १९६९, पृ. ८

४. बाबूराव जोशी, उनि पृ. ४८

५. प्रस्तावना 'गीत सौभद्र'
६. नी. म. केळकर, भास्करबुवा बखले, कर्नाटक प्रकाशन संस्था, मुंबई प. आ. १९६७ पृ. २४४
७. केशवराव भोळे, अंतरा पृ. ११६
८. केशवराव भोळे, अस्ताई, मौज प्रकाशन, मुंबई, प. आ. १९६२, पृ. ८१–८२
९. नानासाहेब फाटक, स्मृतिगंध, पृ. १२
१०. शं. ना. सहस्रबुद्धे, नाट्याचार्य खाडिलकर, नाट्यसंशोधन मंडळ, ३१२ सदाशिवपेठ, पुणे, १९३५, पृ ३१२
११. केशवराव भोळे, अंतरा, पृ. ४८
१२. तत्रैव पृ. ४६–४७
१३. तत्रैव पृ. ५९
१४. गणपतराव बोडस, माझी भूमिका, व्हीनस प्रकाशन, पुणे १९६४, पृ. ४२ ते ४४
१५. नानासाहेब फाटक, स्मृतिसुगंध, पृ. ५५.

□□

## विदर्भ साहित्य संघ नागपूर

### निमंत्रण

माननीय सभासद
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

सप्रेम नमस्कार विनंती विशेष

वि. सा. संघाच्या वतीने वर्षभर सतत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. या सर्व कार्यक्रमांची वैयक्तिक निमंत्रणे सर्व सभासदांना पाठविणे आर्थिकदृष्ट्या व व्यवहाराशःही अशक्यच असते.

वृत्तपत्रात प्रत्येक कार्यक्रमाचे निवेदन स्थानिक / आजचे कार्यक्रम सदरात प्रसिद्ध होत असते. वि. सा. संघाच्या सर्व सभासदांना आग्रहाची विनंती आहे की हे निवेदन म्हणजेच कायमचे आग्रहाचे निमंत्रण समजून सर्व कार्यक्रमांना आपण अगत्यपूर्वक उपस्थित राहावे.

कळावे, लोभ आहेच. कार्यक्रमास उपस्थित राहून त्यात वृद्धी करावी.

आपले

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस

राम शेवाळकर
अध्यक्ष

## पाणी

सुरेश आकोटकर

आदमने इव्हाला जवळ घेतले. तिच्या शुष्क चेहऱ्यावरून त्याने हात फिरवला. काय करावे हे त्याला कळेनासे झाले. तिला खूप तहान लागली होती. त्यानं दूरवरून आणलेलं सारं पाणी पिऊ-नही तिची तहान भागली नव्हती. त्या विस्तीर्ण जंगलात जवळपास कुठेच पाणी नव्हते.

आदम रोज सकाळी उठायचा. जंगलात फिरून फळे–मुळे जमा करायचा. मजल दरमजल करीत पाण्याचा शोध घ्यायचा. आतापर्यंत ज्या ज्या ठिकाणी पाणी मिळालं; त्या प्रत्येक ठिकाणी



अनुक्रमणिका

पाणी मिळेलच; ह्याची शाश्वती नव्हती. बरेच झरे आटून गेले असायचे. काही झरे आटण्याच्या मार्गावर असायचे. तरी मिळणारं घोट दोन घोट पाणी भोपळ्यासारख्या फळाच्या पोकळीत तो जमा करायचा. असा भोपळा भरत आला की जंगलातल्या आपल्या वसतीस्थानाकडे परतायचा. त्याने आणलेली फळे आणि पाणी त्या दोघांना दिवसभर पुरायचे.

पण आज विपरित घडलं होतं. आदमने आणलेलं सारं पाणी इव्हने एका दमात पिऊन टाकलं होतं. तरीही ती अतृप्त!

आदमने इव्हला जवळ घेतले. तिच्या कोरड्या चेहऱ्यावरून हात फिरवला.

"इव्ह, असं कसं घडलं ग! तुला एवढी तहान का लागावी?" त्याने इव्हला विचारले.

इव्हलासुद्धा हाच प्रश्न पडला होता. दिवसभर पुरणारे पाणी पिऊनही आपली तहान कायम का असावी? काय झाले आपल्याला?

मग तिला हळूहळू आठवलं. एक गोष्ट तिच्या लक्षात आली. तिनं पानात गुंडाळलेले अर्धे फळ काढले. ते आदमसमोर धरले.

"आदम, हे फळ बघ. ह्यातले अर्धे मी खाल्ले आहे. अर्धे तुझ्यासाठी ठेवले."

आदमने ते फळ हातात घेतले. तो चक्रावला. ते फळ त्याला अपरिचित होते जंगलात आजवर त्याला असे फळ कुण्या झाडाला आढळले नव्हते.

"इव्ह, कोठून आणलेस हे फळ?"

"तू सकाळी निघालास. तेव्हा मी सुद्धा दूरवर भटकून आले. भटकताना मला एका ठिकाणी काही आपल्यासारखीच माणसं दिसली. आजवर मी आपल्या दोघांऐवजी तिसरं माणूस बघितलं नाही. म्हणून घाबरून गेले. पळायला लागले. पण एवढ्यात माझी नजर एका झाडाखाली कुणी-तरी ठेवलेल्या सामानाकडे गेली. त्या सामानात मला हे फळ दिसले. आजुबाजूला कुणी नाही हे बघून मी झाडाजवळ गेले. सामानातले हे फळ हातात धरले. आजवर असे फळ मी पाहिले नव्हते. तूसुद्धा पाहिले नाही. माझी इच्छा बळावली. हे फळ आपल्याला मिळायला हवे, अशी तीव्र लालसा मनात जागी झाली. कुणी आपल्याला बघणार नाही हे पाहून ते फळ घेऊन परतले. अर्धे खाऊन बाकीचे तुझ्यासाठी पानात गुंडाळून ठेवले. पण तेव्हापासून माझी तृष्णा वाढते आहे. भूक नसली तरी तहानेने व्याकूळ होत आहे."

आदमने हातातले अर्धे फळ दूरवर भिरकावले. इव्हच्या तहानेला हे फळ कारणीभूत असावे, ह्याची त्याला जाणीव झाली. इव्हचा त्याला संताप आला. काहीशा रागानेच त्याने इव्हला विचारले,

"तू का गेली होतीस? कुणी सांगितले होते तुला? तुझ्यासाठी मी सारं रान तुडवत असतो. तुला भरवतो. मग तुला असा उपद्व्याप सुचला कसा? मी तुला काही कमी पडू दिले का?"

इव्हच्या डोळ्यात पाणी आले. मग त्यालाच वाईट वाटले. त्याने बोटांनी तिच्या डोळ्यातलं पाणी निपटलं.

त्याला वाटले, आपलंच चुकलं. तिला आपण बोलायला नको. तिची काही चूक नाही. जगा-वेगळं फळ तिनं पाहिलं. अर्धं आपल्यासाठी राखून ठेवलं!

तो तिला कुशीत घेऊन करवाळू लागला.

"इव्ह, मनाला लावून घेऊ नकोस, आता प्रश्न आहे फक्त पाण्याचा! रानातले सारे झरे आटत चालले आहेत. अगदी दूरपर्यंतसुद्धा कुठली नदी नाही, नाला नाही. कितीतरी ठिकाणी भट-कून दिवसभऱ्याइतकं पाणी गोळा करावं लागलं. तू तर नुकतंच आणलेलं सारं पाणी संपवलं आहे! तरीही तहान भागली नाहीच! आता काय करावे?

इव्ह बोलली नाही. त्याच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले. एखाद्या ठिकाणी पाण्याचा भरपूर साठा उपलब्ध असता तर तिथे जाऊन राहता आले असते. पण—

एक विचार त्याच्या मनात चमकून गेला. तो इव्हला म्हणाला,

"एक मार्ग आहे इव्ह. तू ज्या दिशेने भटक-लीस, तिकडे मला घेऊन चल. तू पाहिलीस तशी माणसे आपल्या प्रवासात भेटतील. कदाचित ह्या फळांचे झाड त्यांनी निर्माण केले असेल. ती फळे ही माणसं खात असतील त्यांचीही तहान तुझ्या तहानेसारखीच असेल. म्हणून त्यांच्यापाशी

पाण्याचा कुण्या न् कुण्या रूपात मोठ्ठा साठा असेल. चल, ह्या माणसांच्या वस्तीला जाऊ. तिथे राहू. त्याशिवाय आता पर्याय नाही."

इव्ह तयार झाली. दोघेही उठले. एका दिशेने चालू लागले. इव्ह रस्ता आठवायची. रस्ता नसेल तर झाडाझुडुपांच्या खुणा लक्षात घ्यायची. दिवसभर दोघेही जंगल तुडवत राहिले. दिशा वेळोवेळी बदलत गेल्या.

इव्हचा जीव व्याकूळ झाला होता. तरी ती पायांना नेट देऊन चालत होती. आदमनं तिला आपल्या भरभक्कम खांद्याचा आधार दिला होता.

खरं म्हणजे आदमलाही खूप तहान लागली होती. पण त्याबद्दल तो इव्हजवळ अवाक्षर बोलला नाही. कारण तहानेने इव्हचे प्राण कंठाशी आले होते.

मजल दरमजल करीत दोघेही एका वृक्षापाशी येऊन पोचले. इव्हने त्या झाडाकडे बोट दाखवले. तिला काय म्हणायचे आहे, हे तो समजला. ते झाडापाशी आले. झाडाखाली कसलेही सामान नव्हते.

त्याला वाटले, येथले आपले सामान घेऊन माणसं कुठेतरी निघून गेली असावीत. त्यांची इतक्यातच कुठेतरी वस्ती असेल.

इव्हला आधार देत आदम पुढे चालू लागला. पण इव्हने पाऊल उचलले नाही.

"का, काय झालं ?" आदमने तिला विचारले. ती म्हणाली,

"आता नाही माझ्याने चालणे होत. मला पाणी हवं. नाहीतर माझे प्राण—"

आदमने एकदम तिच्या तोंडावर हात ठेवला.

"नाही. माझ्या इव्ह; असं बोलू नकोस. तुझ्याविना माझं कोण आहे ? थांब, धीर सोडू नकोस इव्ह मार्ग सापडेल."

आदमने तिला पाठीवर घेतले. आपल्या खांद्यावरून तिचे समोर आलेले हात हातात घेतले. इव्हचा भार सांभाळत तो पुढे चालू लागला. एव्हाना संध्याकाळ झाली होती.

बराच वेळ असे चालल्यानंतर जंगल विरळ होत गेले. सर्वत्र काळोख पसरू लागला. रस्ता काढीत तो पुढे चालत होता. प्रचंड विश्वासाने पुढे पावलं टाकत होता.

जंगल संपले तेव्हा सर्वत्र अंधार पसरला होता. आजूबाजूला काहीच दिसेनासे झाले. नाही म्हणायला आकाशातल्या तारका तेवढ्या दिसत होत्या. त्यांच्या अतिफिक्कट उजेडात डोळ्यांपासून वीतभर अंतरावरचे तिचे हात त्याला अस्पष्ट दिसत होते.

जंगल संपलं तेव्हा तो थांबला. पुढे कुठल्याही झाडांच्या काळोखी सावल्या नव्हत्या. समोर सपाट भूमी असल्याचे त्याला जाणवले.

तो थांबला आणि इव्ह कण्हू लागली. त्याने पाठीवरून तिला खाली उतरवले. तिनं जमिनीवर अंग टाकलं. तो घाबरला. तिचे अंग अंग कुरवाळू लागला. तिचे कण्हणे वाढत गेले. ती पाण्यासाठी आक्रंदत गली. तिच्या चेहऱ्यावरले भाव त्या अंधारात त्याला दिसत नव्हते. तरीही कल्पनेनं तिच्या वेदनांची त्याला जाणीव होत होती' भ्रमिष्टासारखी त्याची अवस्था झाली.

इतक्यात जवळच त्याला कसलातरी प्रकाश दिसला. एक हालचाल करणारा प्रकाश.

आदमने इव्हला उचलले. पुन्हा पाठीवर घेतले आणि प्रकाशाकडे चालू लगला.

थोड्या वेळाने प्रकाश लुप्त झाला. त्याने त्या प्रकाशाची निश्चित दिशा लक्षात घेतली. रस्ता कसा आहे, पुढे काय आहे इत्यादींचे त्याला भान नव्हते. लुप्त झालेल्या प्रकाशाच्या दिशेला त्याचे डोळे होते. त्याच दिशेला पावलं होती.

इतक्यात हळूहळू चंद्राची कोर आकाशात अवतरली. चांदण्यांच्या प्रकाशात त्या कोरीने आणखी थोडी भर घातली. त्यामुळे आता समोरचे थोडे फार दिसायला लागले होते. त्याची चाल वाढली. आत्मविश्वासाने तो झपझप चालू लागला. त्याच्या सर्वांगातून घामाचे थेंब टपटपत होते.

थोड्या वेळाने त्याला भुंकण्याचा आवाज ऐकू आला. तो थांबला. आपल्या समोर काही झोपड्या पाहून त्याला हायसे वाटले. आपल्यासारखी माणसं ह्या खोपटांमध्ये रहात असावीत असा त्याने अंदाज बांधला. तो घरांच्या दिशेला चालू लागला. कुत्रे भुंकण्याचा आवाज स्पष्ट होत गेला.

इतक्यात बाजूला जमीन खोल खणली आहे, हे त्याच्या लक्षात आले. ती विहीर होती.

चालता चालता त्याने विहिरीत डोकावले. तो एकदम आनंदाने ओरडला.

इव्हऽऽ इव्ह...बघ्. मिळालं पाणी !"

आदमने इव्हला खाली उतरवले. विहिरीपाशी झोपवले. इव्हने किंचित डोळे उघडले. मोठ्या आनंदाने त्याने तिचा चेहरा हातात घेतला.

"इव्ह, खूप पाणी जमा आहे इथे !"

इव्हने डोळे ताणून विहिरीकडे पाहिले. मग अस्पष्टशी ती उद्‌गारली,

"खूप खोल खड्डा—"

तो पार वितळला. विहीर खोल असल्याचे आत्ता कुठे त्याच्या ध्यानात आले. निर्जीव डोळ्यांनी त्याने विहिरीत डोकावले, आपले हात पाण्यापर्यंत पोहचू शकत नाहीत ह्याची त्याला कल्पना आली. विहिरीत त्याला उतरता येत नव्हते. पाणी शेजारी असून इव्हला आपण ते पाजू शकत नाही, म्हणून त्याचा जीव कळवळला. असहायतेनं तो समोरच्या झोपड्याकडे बघू लागला.

इतक्यात इव्ह किंचाळली. पाण्यासाठी आक्रोश करू लागली. समोरच्या झोपडीशेजारचा कुत्रा आता मोठमोठ्याने भंकू लागला. इव्हचा आवाज कुत्र्याच्या आवाजात मिसळून गेला.

"थांब इव्ह, अशीच पडून रहा. येथून हलू नकोस." तो गद्‌गद्‌लेल्या स्वरानं इव्हला म्हणाला.

मनाचा हिय्या करून आदम त्या झोपडीपाशी आला. कुत्र्याचा भुंकण्याचा आवाज आणखी वाढला.

कुणीतरी झोपडीचे दार उघडले. त्याच्या हातात कसलातरी दिवा होता.

जंगल संपताना थोडा वेळ दिसून लुप्त झालेला प्रकाश हाच; ह्याची त्याला कल्पना आली. तो प्रकाश हातात घेऊन आपल्या–सारखीच एक व्यक्ती दारावर उभी असल्याचं त्याच्या लक्षात आलं. त्या माणसानं कुत्र्याला चूप केलं. मग आदमला विचारलं,

"कोण आहे ?"

"मी आदम—" हातानं चेहऱ्यावरचा घाम निपटत आदम बोलू लागला.

माझ्या इव्हनं कुठंतरी फळ खाल्लं. त्यामुळे तिला तहान लागली आहे. ती त्या पाण्याच्या खड्ड्यापाशी तळमळते आहे. आम्ही जंगलातली माणसं ! तेवढंच आमचं जग. तुमच्या जगाची आम्हाला कल्पना नाही. म्हणून मदत करा. इव्हविना माझं कुणी नाही."

त्याच्या घशात हुंदका दाटून आला. पुढे त्याला बोलता आलं नाही. मग त्या माणसानं बोलायला सुरुवात केली.

"बघा आदमराव, आमच्या इलाख्यात तुम्ही पहिल्यांदा आला आहात. हा प्रदेश तुम्हाला नवीन. प्रत्येक प्रदेशाचे काही नीतीनियम असतात. म्हणून. आपला प्रदेश सोडून असं भटकू नये !

"या परिसरात हा एकुलता एक पाण्याचा खड्डा. आम्ही त्याला विहीर म्हणतो. आमची टोळी इथं राहते. एकत्र जगता यावे, राहता यावे म्हणून एकता राखण्यासाठी आम्ही काही नियम स्वतःवर लादून घेतले आहेत. ते नियम आम्हाला तोडता येत नाही. तोडलेच तर गुन्हेगाराला शासन दिल्या जाते.

"ही विहीर आमच्याकरिता आहे. ती आमच्याकडून खणल्या गेली. म्हणून तिचं पाणी केवळ आमचं आहे.

"पाणी हवंच असेल तर आमच्या म्होरक्याला जाऊन तुम्हाला विचारावं लागेल. आम्ही त्याला नायक म्हणतो. आमच्यातला सर्वाधिक गुणसंपन्न माणूस असतो तो ! टोळीचा कारभार सुरळीत चालावा म्हणून आम्ही त्याला निवडून देतो.

"आदमराव, तुम्ही आमच्या नायकाला विचारा. पण इथे राहू नका. त्यासाठी आमच्या टोळीत सामील व्हावं लागेल. इथले रितीरिवाज मान्य करावे लागतील."

माणूस बोलायचे थांबला. आदमने विचारले ?

"कुठे राहतो नायक ?"

"झोपड्यांच्या सरतेशेवटी पांढऱ्या रंगाचे देऊळ आहे. तिथे आमच्या टोळीचं जागृत दैवत आहे. देवळाच्या बाजूला नायकाचा वाडा आहे."

माणूस घरात जायला परत फिरला तोच आदम माणसाला म्हणाला.



अनुक्रमणिका

"पण सध्याचं तरी थोडं पाणी द्या हो! नाही म्हणू नका."

"कसं देऊ आदमराव. विहिरीतून पाणी काढताना कुणी पाहिलं तर? मी जीवानिशी मरेन."

रडवेल्या चेहऱ्यानं आदम मागे वळला. माणसाला त्याची थोडीफार दया आली.

"थांबा थोडे–" माणसाने हळू आवाजात त्याला थांबवले.

पुन्हा नव्या आशेनं आदम झोपडीजवळ थांबला. माणूस घरात गेला. कसल्यातरी भांडयांत पाणी घेऊन आला.

माणसाने भीतीने इकडेतिकडे बघून घेतले. शेजारची सारी दारं बंद होती. वातावरण सामसूम होतं. माणसाच्या घरातून मात्र आदळआपट होत असल्याचा आवाज आदमला ऐकू आला. हा आवाज इव्हच्या आवाजासारखा आहे, हे त्याच्या लक्षात आलं.

"घ्या आदमराव पाणी! पण कशात घेता?" माणसाने कुजबुजत आदमला विचारले.

"कशात घेऊ?" आदमने प्रश्न केला.

"शूऽऽ हळू बोला! भांडं मी देऊ शकत नाही. पाणी इव्हला पाजताना कुणी पकडलं तर माझं नाव सांगू नका व आता कुणालाही पाणी मागू नका."

माणसानं आदमला रीतिरिवाजाच्या दोन गोष्टी समजावून सांगितल्या.

"मग आता पाणी कशात घेऊ?" आदमने मघापास्नं रेंगाळलेला प्रश्न पुन्हा त्याला विचारला. माणूस उत्तरला,

"हात पुढं करा..."

"पेक्षा इव्हला इथे आणतो. काही वेळ लागणार नाही."

"अहो, इतका वेळ नाही! मला भीती वाटते. घ्या लवकर. ओंजळ करा हाताची. नाहीतर तेही मिळायचं नाही."

आदमनं हातांची ओंजळ केली. माणसाने त्याच्या ओंजळीत पाणी ओतले. आदमनं कृतज्ञतेनं त्याच्याकडे बघितलं. पण आदमचे आभाराचे दोन शब्द ऐकायला माणूस थांबला नाही. त्याने कुत्र्याला आत घेतले व दार बंद केले.

ओंजळीतले पाणी सांभाळत तो इव्हपाशी आला. चालताना हेलकाव्याने थोडे पाणी सांडले होते. थोडेफार बोटांच्या फटीतून झिरपले होते. ओंजळ अशी रिकामी होताना त्याचा जीव कळवळत होता.

तळमळत पडलेल्या इव्हजवळ आदम बसला.

"इव्ह, आलो ग—"

त्याच्या ओंजळीतले काही थेंब तिच्या चेहऱ्यावर टपटपले. तिने मान उचलली. त्याने ओंजळ तिच्या ओठांना लावली. पाणी बाजूबाजूला सांडताना त्याला तीव्र वेदना झाल्या.

तिने दोन घोटात ओंजळ रिती केली. त्याचे तळहात आधाशीपणे चाटू लागली. तिची दशा त्याला बघवली नाही. त्याने आपले हात तिच्या तोंडापासून दूर केले. त्यालाही आता खूप तहान लागली होती. त्याने हळुवारपणे इव्हचा देह कवेत घेतला. तिच्या चेहऱ्यावर आपला चेहरा झुकवला. इव्हच्या ओल्या ओठावरून त्याने जीभ फिरवली. बाजूची विहीर आपल्याकडे बघून क्रूर हसते आहे, असे त्याला वाटले.

आदमला भडभडून आले. तिच्या कुशीत चेहरा लपवत तो रडू लागला. तिनं त्याच्या केसांवरून हात फिरवला. अबोलपणे त्याचे सांत्वन केले.

पुन्हा नव्या आशेनं होता–नव्हता त्या जोमानं तो उठला. इव्हला सांभाळत घरांच्या रांगेसमोरून जाऊ लागला.

गाव संपल्यावर शेवटी एक देऊळ त्याच्या दृष्टीस पडले. चंद्र–चांदण्यांच्या अंधूक प्रकाशातही त्याचा पांढरा रंग स्पष्ट दिसत होता. तो देवळापाशी आला.

देवळाच्या बाजूला एक वाडा पाहून त्याच्या आशा पालवल्या. इव्हला आधार देत तो पुढे चालू लागला. इतक्यात देवळाच्या पायऱ्यांपाशी वाढलेल्या झुडुपामागे कसलातरी आवाज ऐकून तो थांबला. आवाजाचा कानोसा घेऊ लागला. दोन मानवी स्वरातली कुजबूज त्याच्या कानी पडली. एक आवाज आपल्या आवाजासारखा आणि दुसरा इव्हच्या आवाजासारखा आहे, हे त्याने ओळखले.

"माझ्या तोंडाला खूप पाणी सुटले आहे." एक स्वर म्हणाला.

इव्हने खाड्कन डोळे उघडले.

"मलाही खूप तहान लागली आहे. तहान भागव माझी. दुसरा स्वर कुजवुजला.

इव्हनं शरीराची हालचाल केली. आवाज बंद झाला.

इव्हनं थरथरत झुडुपाकडे बोट दाखवले आणि ती आक्रंदली.

"पाणीऽऽ...पाणीऽऽऽ"

ती आक्रोश करू लागली. झुडुपाकडे त्याला ओढू लागली.

झुडुपाच्या मागून एक आडदांड माणूस बाहेर आला. दुसरी व्यक्ती गावाच्या दिशेने पसार झाली.

दात ओठ खात तो माणूस त्यांच्याजवळ आला. आदम भांबावला. तो काही बोलायच्या आत त्या माणसाने आदमच्या मुस्कटात खाड्कन थप्पड मारली.

आदमच्या हातून इव्ह निसटली. ती खाली कोसळली.

"पाणीऽऽ–" इव्ह ओरडू लागली.

माणसाने क्रूर हास्य केले.

"थांब, तुझी तहान भागवतो!"

माणूस पुढे सरकला. त्याने खसकन् इव्हला जवळ ओढलं. ती आणखी किंचाळली,

"पाणीऽऽ पाणीऽऽ"

थकला भागला आदम पुढं झाला. त्यानं माणसाला इव्हपासून दूर करण्याचा प्रयत्न केला.

माणूस पेटून उठला. आदमवर लाथाबुक्क्यांनी प्रहार करू लागला. आदमने इव्हला घट्ट पकडून ठेवले. इव्ह किंचाळत होती. माणूसं मारत होता. आदम नुसताच सहन करीत होता. प्रतिकार करण्यासाठी त्याची शक्ती संपली होती. तो असहाय्यतेनं खाली कोसळला. इव्ह ओरडली,

"पाणीऽऽ पाणीऽऽ"

माणसाने इव्हला आदमपासून अलग केले.

तो दातओठ खात तिला झुडुपाच्या दिशेने ओढून नेऊ लागला. ती किंचाळू लागली. तिच्या मुखातून एकच शब्द फुटत होता—पाणी...

लाथाबुक्क्याने जखमी झालेल्या आदमने उठण्याचा प्रयत्न केला. उभे राहण्यासाठी तो धडपडू लागला. डोळे फाडून इव्हची दशा बघू लागला. इव्हच्या किंकाळ्या थांबत गेल्या.

माणसाने फरफटत तिला झुडुपाजवळ आणले. तिची हालचाल थांबली.

आदमला वाटले, इव्ह निर्जीव झाली आहे.

कुठून तरी त्याच्यामध्ये बळ संचारले. त्याने शक्ती पणाला लावली. आदम उठून उभा राहिला. आता त्याला कसलेच भान राहिले नाही. त्याचे डोळे अंगार ओकू लागले. त्याचा देह ताठरला.

तो झुडुपापाशी आला आणि इव्हच्या देहावर झुकू लागलेल्या माणसाला लाथेनेच दूर केले. आदमने सर्व शक्तीनिशी त्या माणसाला हातात धरले. वळ एकवटून वर उचलले. गरागरा फिरवले आणि देवळाच्या पायरीवरल्या दगडावर झोकून दिले. एक किंकाळी सर्वदूर पसरली.

आणि मग सगळं शांत झालं.

आदमने एकवार देवळाकडे पाहिलं. देऊळ थरथरते आहे, असे त्याला वाटले. त्याचा चेहरा कठोर होत गेला.

आदम झर्रकन इव्हजवळ आला. त्याने इव्हला उचलले आणि समोरच्या वाड्याकडे जायला निघाला.

अचानक त्याचे लक्ष देवळाच्या बाजूच्या भिंतीकडे गेले. तो एकदम थांबला. जमिनीपासून दोन हात वर त्याला दिसले की कुठल्यातरी प्राण्याच्या आकाराचे मुख भिंतीला लावले असून मुखातून थेंब थेंब काहीतरी गळते आहे; चंद्रप्रकाशात ते थेंब चमकत आहेत.

इव्हला घेऊन तो भिंतीजवळ आला. गोमुखातून एकेक पाण्याचा थेंब खाली पडत होता. जमिनीचा बराच भाग गच्च ओला झाला होता.

तो गोमुखापाशी आला. त्या ओल्या जमिनीवर बसून त्याने इव्हला मांडीवर घेतले. पाण्याचा एक एक थेंब तिच्या तोंडावर पडू लागला.

आदमने तिचे ओठ विलग केले...

हळूहळू इव्हचा अचेतन देह शुद्धीवर आला. तिच्या ओठांची हालचाल झाली. पाण्याचा थेंब न् थेंब ती प्राशन करू लागली.

तिची हालचाल होत असलेली पाहून आदमच्या डोळ्यातली आग हळूहळू शांत होत गेली. संतापाने थरथरणारे त्याचे हात इव्हला गोंजारू लागले.

रागाच्या भरात आपल्या तोंडून शब्दही फुटला नाही, ह्याची त्याला जाणीव झाली. त्याला वाटले, आतापर्यंत आपले ओठ कुणी शिवले होते? आपण काहीच कसं बोलू शकलो नाही? इतका वेळ आपले भान कुठे होते?

इव्हने हळूहळू डोळे उघडले. त्याला तिच्याशी बोलावेसे वाटले. पण तिच्या प्राशनात अडथळा नको म्हणून त्याने मनात दाटलेले कढ पचवन टाकले.

हे पाणी येते कोठून? —त्याच्या मनात अचानक हा प्रश्न निर्माण झाला.

आणि ठराविक अंतराने हे थेंब पडतात कसे? —तो स्वत:लाच प्रश्न करू लागला.

अचानक जागेवरूनच त्याने मान वर केली. पाणी गळणाऱ्या गोमुखाला डोळा लावला. आतली इवलीशी पोकळी दुसऱ्या टोकावर त्याला प्रकाशमान भासली.

काहीसा विचार करून त्याने इव्हला उठवले. दोघेही उभे राहिले. त्यांचे देह चिखलाने भरले होते...

आदम आणि इव्ह पायरीजवळ आले. मघाचा माणूस तसाच पडला होता. त्यांनी तिकडे लक्ष दिले नाही.

दोघेही देवळाच्या गाभाऱ्यात शिरले. गाभारा एका पणतीच्या उजेडात प्रकाशमान झाला होता.

त्या उजेडात त्यांनी पाहिले की कसल्यातरी मूर्तीवर एक कसलेसे पात्र टांगले आहे. त्या पात्राच्या खालून मूर्तीवर एकेक थेंब गळतो आहे. एका छोटचा नालीतून हे पाणी वाहते आहे. नाली भिंतीच्या छिद्रापाशी संपते आहे.

"बघ इव्ह—ह्या दैवताला बघ—तुझ्यासारखीच तहान लागली आहे." •

आदमला आत्ता कुठे वाचा फुटली होती.

"बघ इव्ह, तुझ्यासारखंच तो पाणी अंगावर घेतो आहे."

"काय आहे हे?" इव्हचे ओठ विलगले.

"हे ह्या गावचं दैवत आहे. पहिला भेटलेला माणूस सांगत होता."

आदमनं टांगलेलं पात्र खाली काढलं. इव्हच्या ओठांना लावलं. इव्ह पाणी पिऊ लागली. आपली युगायुगाची तहान भागवू लागली.

अर्धे पाणी पिऊन झाल्यावर तिने पात्र आपल्या हातांनी आदमच्या तोंडाला लावले. आदम आधाशीपणे पाणी पोटात रिचवू लागला.

दोघेही पाणी पिऊन तृप्त झाले. मग ते रिकामे पात्र त्यांनी पुन्हा टांगून ठेवले.

तृप्त मनानं तो गाभाऱ्याच्या भिंतीला टेकला. इव्ह त्याच्या कुशीत शिरली. दोघांनीही डोळे मिटले.

—बऱ्याच वेळाने त्यांना जाग आली. पणती विझली होती. आदमने गाभाऱ्यावाहेर बघितलं. आकाशात तांबडं फुटलं होतं. सकाळ होत होती. त्यांच्या अंगावरचा चिखल सुकला होता.

"इव्ह, चल उठ आता." आदम तिला म्हणाला.

"कुठं जायचं आता?" तिनं विचारलं.

"कुठं नाही. इथेच रहायचं. ह्यानंतर मी आदम नाही. तू इव्ह नाही. माणूस म्हणून जगायचं. माणसासारखं वागायचं आणि माणूसपण भोगायचं"

"कसं?"

"असं—" असे म्हणून तो उठला. इव्हचा हात धरला. गाभाऱ्यावाहेर आला.

दारासमोर एक कुत्रा उभा होता. त्यांच्याकडे बघत भूंकू लागला.

आदमनं त्याच्या कमरेत एक लाथ हाणली. केकाटत कुत्र्यानं धूम ठोकली.

देवळाच्या पायऱ्या उतरताना ते थांबले. त्या माणसाच्या मृत देहाजवळ एक माणूस उभा होता.

आदमने डोळे रोखून त्याच्याकडे पाहिले. तो माणूस भीतीने कापू लागला.

"कोण आहेस तू?" आदमच्या स्वरात जरब होती.

"मी—मी ह्यांचा नोकर—"

"हा कोण?"

"आमचा नायक..."

आदमने त्वेषाने मृत माणसाकडे बघितले आणि तो ओरडला,

"जा, गावातली चार माणसं सांग. ह्याला जंगलात पुरून द्या."

"होय मालक–"

"आणि वाड्यात आणखी कोण आहे ?'

"कुणी नाही मालक. फक्त मी आणि माझी बायको."

"ठीक आहे. ह्याला पुरवायला सांगून ये आणि आमच्यासाठी खाण्यापिण्याची व्यवस्था कर. आम्हाला स्नानं उरकायची आहेत."

"होय मालक. करतो सारं. तुम्ही चला वाड्यावर. समोर जाऊन मी प्यारीला सांगून ठेवतो सारं ! हेही सांगतो की गाभाऱ्यातून प्रगट झालेले..."

"कोण प्यारी ?" आदमने त्याला मध्येच विचारले. तो म्हणाला,

"माझी बायको..."

त्यानं आदम–इव्हला हात जोडले. घाईघाईने तो निघून गेला.

क्षणभर आदमने इव्हकडे पाहिले.

क्षणभरच इव्हने आदमकडे पाहिले.

मग पायऱ्या उतरून ते वाड्याच्या दिशेनं चालू लागले.

□ □

## ॥ क वि ता ॥



### पोरं / नारायण कुळकर्णी कवठेकर

पोरं खेड्यांहून येतात.
पायात चप्पल
ना डोक्याला तेल.
ढुंगणावर ठिगळ पायजम्याला;
वर पट्ट्याचा मनिला
अर्ध्या बाह्यांचा.
पोरं
ग्लानीत असल्यासारखी
मराठीची कविता ऐकतात
अन् अर्थशास्त्राचा सिद्धांत.
जगाचा नकाशा पाहतात
अन् अकाउंटंसीची आकडेमोड.
सकाळी वावरातून घरी
डोक्यावर आणलेल्या कडब्याच्या
भाऱ्यातला एखादा पिवळा तुकडा
त्यांच्या केसात अडकून असतो.
वहीवर अक्षरे त्यांच्या पेनमधून
थकव्याहून संथ ओघळतात.
तेवढ्यात होते घोषणा
सांस्कृतिक मंडळाच्या कार्यक्रमाची.
अन् हॉलमध्ये पोरं ऐकतात
तरुण पिढीच्या जबाबदारीचे व्याख्यान
एखाद्या थोर पुरुषाच्या जीवनांवरचे आख्यान,
हातात यस्टीची पास धरून
मोटर स्टँडच्या दिशेने पाहत....
अन् अखेरीस उभ्याने जन गण मन
म्हणता म्हणता तर पोरं अगदी
थकून थकून जातात—
आत्ता कोलमडून पडतील की काय....
□ □

## दोन कविता / विजया दीक्षित

### १. धुके

हे निशब्द धुके कशाचे
जे उभे हात उभारून
माझ्या गांवच्या शिवेवरती ?

हे तळमळते माझे अंतर,
की तुटते आज सदाचे
माझे मातीचे माहेर.

मी न कधीही केस सोडले
आणि गेले नदीतीरावर माध्यान्हीला.
तरीही मज हे कसले देणे ?
कुठवर जाणे, कुठे चालणे ?

पाऊल माझे तुटते आहे,
जळात अर्धे, स्थळात अर्धे

### २. ज्ञानेश्वरी

आभाळ अनिर्वचनीय होते तेव्हा,
झाडे अर्वाच्य बोलू लागतात.
बेघरपण मिरवणारे पक्षी
गाणी गातात परतत्त्व स्पर्शाची.
हे माझ्या श्रान्त हृदया,
तू इथेच घनगर्द झोपून जा,
फक्त उशाला घे,
बासन सोडलेली ज्ञानेश्वरी !

□ □

## तूर्त / उ. रा. गिरी

तूर्त
ने
मला
माझ्यातून माझ्याकडे....
तुझ्याकडे केव्हा यायचे
ते
मग
बघू
सवडीने पुढे....

□ □

## कविता / जीवन वळवंत आनंदगावकर

सगळया ढेल्यातला मुईमुग काढेपर्यंत
मुईमुगाचे वेल काळपटून गेले आहेत.
खाल्लाकडे सारखा वाहणारा मनान
वारा कुठे जाऊन थांबेल देव जाणे !
अवेळी खिंकाळणाऱ्या घोडीपुढे
निम्मी वैरण कायम असते.
आख्ख्या दोन भाकरी खावून
वखवखणाऱ्या कुत्र्यावर मी
जीव लावू शकत नाही !
किंवा नुसत्याच निळया आभाळावर
मी पोट भरू शकत नाही.
वांवाळीच्या कोरड्या ढगावर मी
लिहिणार नाही एकही ओळ.
पावसाच्या प्रतिक्षेत उंचावलेली
माझी मान
मुरगळून जातेय जागच्याजागी !
पण अजूनही आकाशात
लेकुरवाळे ढग जमा होत नाहीत.

□ □

## सांजप्रहर / लक्ष्मीकांत तांबोळी

हे उदास सांजप्रहर
दिवसाचे सरलेपण
पेलुनिया नभओझे
पंखांचे थकलेपण

एकुटपण झाडांचे
वाटांचे हरलेपण
ओठावर शब्दांचे
मौनांकित अधुलेपण

दूरच्या तळयात कुठे
कमळाचे मिटलेपण
सोनकळा लेवुनिया
नभ मिरवी अथिलेपण !

□ □

## असे आयुष्य झाले की.... / श्रीकृष्ण राऊत

असे आयुष्य झाले की मिठाने दूध नासावे;
कशाचा धूर दाटे हा ? धुराला श्वास श्वासावे !

भुकेने का कळ्या खाव्या? फुलांच्या पाकळ्या खाव्या?
असा हा कोण आधाशी ? तरीही तोंड वासावे !

खरे का शब्द हे काळे ललाटी कोरते सटवी ?
मिटेना डाग दुःखाचा किती प्रारब्ध घासावे !

सरावा जन्म हा सारा अशा कैफात स्वानंदी;
निरागस लेकरू तान्हे जसे झोपेत हासावे !

लपूदे आड प्राणाच्या तुझ्या आत्म्यातला भंगी;
मुखाला मात्र नमाने सुगंधी भस्म फासावे !

स्वतःची वागवावी तू चिता खांद्यावरी राजा;
नवा हा कायदा आला जित्याने प्रेत भासावे !

□ □

## काठावर / नीळकंठ घोडे

या काठावर तम गहिरे अन्
त्या काठावर ऐने
सांग साजनी कुठे ठेवू मी
मम हृदयीचे गाणे ?

या काठावर सत्य पांगळे
त्या काठावर नृत्य
जळता जळता वात धरेला
सांगुन जाईल कथ्य.

या काठावर प्रकाशझाडे
त्या काठावर भास
धरता धरता बोट तुझे मी
गळयात रुततो फास

या काठावर बंद कवाडे
त्या काठावर क्षीतिज
वणवण भटकत दारोदारी
भीक मागते नीज.

या काठावर काटेरी बन
त्या काठावर उपवन
कसे उमटले भालावरती
हे फुलाफुलाचे व्रण ?

□ □

## नदी.... / सुखदेव ढाणके

तुझा जन्म गे
वाहणारी नदी
तुला डोह खोल असती अपार
किनारी ही झाडे
की यातनालये ही
चढविती कुणाला उन्हाचे बहार.

धारेतुनी तुझ्या
वाहतात काचा
रक्ताळती पाय तेथे गुराचे
कागदावरी माझ्या
उमटून येती
शब्द रोज बाकलेल्या खुरांचे.

हरवले कुठे
कळेना मलाही
सांजावताना दिव्यांचे थवे
इथे कोरला गे
अंधार आहे
सांगू कसे, केव्हा जन्मासवे.

□ □

## चौफुला / श्रीपाद गंगाधर कावळे

(१)
साधना संकल्प ना साध्य शोधाया निघाले
लक्ष जे लक्ष्यावरी, मृगजळे शोधून आले
ना कुठे कलदार नाणे, शोधले येथे कलंदर
भाग्य माझे फाटके, भेटले मजसी बिलंदर

(२)
राहिले ना मंच येथे, ते पलीते पेटणारे
संपले झंकार इथले, हुंकार केवळ राहिले
खालसा झाले कधीचे, वारसाही संपली
संपली अंगार इथली, नाट्य केवळ राहिले

(३)
सांप्रताला ग्रासले, आम्हीच काळे फासले
छाटली आम्ही मुळे, शोधतो आता कुळे
केव्हडे चालाख आम्ही, पारध्यांना शोधतो
पारधी आम्हीच ते, टाकुनी गेलोत जाळ

□ □

## आण ! / कृष्णा चौधरी

आज झावळले डोळे
तुझा पाहता देव्हारा
पंढरीच्या पांडुरंगा !
तुझ्या येताच आवारा !

आज फिटले पारणे
किती पुण्ये फळा आली
किती युगांची ही माझी
तुझी डोळाभेट झाली !

आता कसले मरण
व्यर्थ लौकिकाच्या खंती
तुका बैसला विमानी
जिजा टाकून एकांती !

अरे पांडुरंगा ! तुझे
इथे पाठवी विमान
तुकयाच्या अभंगांची
टाळ-गोधडीची आण !

□ □

## इंद्रधनुची पावले / सुनील शिनखेडे

कसे कोंडल्या श्वासाला
भान फुलल्या दिसांचे
रान अजून हिरवे
गात गाणे पावसाचे !

आता सरावले डोळे
चंद्र लाजरा पाहण्या
वय झाले झाले झाले
विझू चालल्या चांदण्या !

सूर कुण्या मैफिलीचे
सांग येती कानांवर
दूर बाळाला अंगाई
मज फुटे गहिवर !

सारे जगणेच आता
पुन्हा असे जन्मा आले
नव्हे मावळती दिशा
इंद्रधनुची पावले !

□ □

## सारेच ते निघाले / कल्याण इनामदार

जे लागले उन्हाचा वेशीत डाव मांडू
सारेच ते निघाले त्यांच्या घरात गांडू

पायाखालील माती नव्हती तरी स्वतःची
आभाळ लागले हे, वेडया भरात कांडू

चतकोर चंद्र येता खिडकीतुनी कुणाच्या
हे लागले गजांशी आपापसात भांडू

ओठांवरी शिव्यांचे मोहोळ लागताना
सारीच लाळ यांची लागे सुरात सांडू

मिटवून घट्ट डोळे जे पाहती तमाशा
टेकू म्हणून असतो, त्यांच्या फडात दांडू

□ □

## हिशेब / सुखदेव ढाणके

आजच आठवावेत ना तुला
साऱ्या जन्मांचे हिशेब.
एवढयात तर
मीच मला आठवेनासा झालोय सखे.
तरीही थांब तू
एवढा स्मरणफुलांचा ढीग
आधी व्यवस्थित लाऊ दे.
यानंतर घरी जायचे आहे
हो एक सांगायचे राहिलेच
घरात दिवा नाहिय्
तेव्हा एक करू....
रक्तानेच जाळू रात्र...आणि
तुझ्या गात्राच्या प्रकाशात मग
देईन तुला वाचावयास
आभाळ गोंदणाच्या वेळच्या
कंटक सुक्तांचे महाअरण्य.
त्याच्या एकेका पानावर असेल
माझा एकेक जन्म...आणि...
अधोरेखित केले असतील मी
माझेच मृत्यू...संदर्भहीन
म्हणून म्हणतो
आजच आठवावेत ना तुला
साऱ्या जन्मांचे हिशेब...

□ □

## इतिहास / बाळकृष्ण बन्नोरे

नद्यांच्या महापुरांचे
रचता येते प्रलय-सूक्त
अथर्व-शीर्ष भूकंपनांचे
महाकाव्ये रणचंडिकांची :
कारण, अक्षरांची झूल
बसते चपखल
अशा ठोकळ त्वचेवर.
जगाचा इतिहास म्हणे
थापल्या जातो असाच
शाडूच्या मूर्तीसारखा
सहज संभावितपणे
पदसिद्ध आणि वृत्तबद्ध;
ती भक्षेपवाज पाने
चावल्याही जातात
शाळकरी मुलांच्या चॉकलेटी चवीने.

मुर्दाड इतिहासा !
त्या तुझ्या छद्‌मस्थ
वाघनखांचे ठसे
उमजले तरी उमटत नाहीत
(केवडयातील सापासारखे)
कुठल्याही खुल्या न्यायालयात
पुराव्यानिशी....
तू मोजलेस बारेमाप
पानिपतावरील अस्थिकलशांचे घेर
जळत्या खंदकांचे क्षेत्रफळ चौफेर
पण....आले नाहीत नजरेच्या टप्प्यात
टाचेवर उंच होत
जिवाच्या आकांताने फडफडणारे
आतील तळहातांचे
शाप-गर्भ इशारे,
वॉटर्लूच्या पळत्या पावलांच्या
जहाल धुळखुणा
ऑक्टोपसच्या सर्वात्मक छावण्यांतून
पोटावर निरंतर सरपटणाऱ्या
गोगलगायींचे ढिगारे....

सोनेरी बांधणीच्या
छबीदार दस्तऐवजा !

रंगमहालातील वार-योषितांनी
तुझ्या त्या सरंजामी पौरुषाला
ईसवी सनावळीला
बहाल केलेले वर्खवाज विडे
अजूनही चघळतांत निर्लेप
तुझे हे नेक आधुनिक वारसदार
शककर्त्यांच्या रुबाबात
संस्कृतीच्या लंगोटया चढवीत
चोरून कॅमेरे बघणाऱ्या
परिव्राजकाच्या
विदग्ध मांजर-खुशीत....

मुद्राराक्षसा ! तुझ्या त्या मलपृष्ठावरील
ऑलिव्हच्या हिरव्या पानांचा तोरा
चोचीत भरणाऱ्या कबूतराचे
विटके रेखाचित्र
कायमचे टाक निपटून
पुढील ताज्या आवृत्तीत
आणि त्या ऐवजी दाखव
ब्लेकने अमरपट्टा दिलेल्या
वाघाचे जळजळीत डोळे
आणि शेजारी
आपल्या गुलजार बोटांनी
त्याच्या पुष्ट कातडयाचे
रंगचाप मोजणारी
पॅरीसची निर्भय रूपनगिनका
अतिनतन कालदर्शिका
कालदर्शिका....

□ □

## अभिनय.... / कॉम्रेड

आदरणीय प्रिये,
मीही देऊ शकलो असतो
तुझ्या, हळव्या कोमल प्रेमपत्रांची
उदात्त उन्नत उत्तरे.
सेंटेड गुलाबी कागदावर
इव्हिनिंग-इन-पॅरिसचा
फवारा मारून
तुझ्यासोबत घेतलेल्या
ओल्या शपथांची
नक्षीही काढली असती त्यावर.
लिहिले असते...
तुझ्या आठवणींनी मला
कशी झोप येऊ शकली नाही रात्रभर:
कशी कोसळत होती
तुझी सोनकांती, डाव्या बाजूला
काळजावर.
पण खरे सांगू ?
काल दिवसभर.
काम शोधण्याचे काम करून
मी उशीराच रात्री घरी आलो तेव्हा
माझ्या बाजेवरच्या शिंक्यावर
कशीबशी तगून राहिलेली
अर्धी भाकर खाऊन
मी दोन लोटे ढकढक पाणी प्यालो
आईच्या समाधानासाठी, ढेकर दिली
तेव्हा आई म्हणाली ! बाळ !
उद्या जर आपल्याला
काम मिळाले नाही तर
परवाच्या दिवशी तू
नुसतेच दोन लोटे पाणी पिऊन
करू शकशील का
ढेकर दिल्याचा अभिनय ?
नंतर मात्र
आदरणीय प्रिये,
देऊ शकलो नाही मी
तुझ्या हळव्या कोमल प्रेमपत्राची
उदात्त उन्नत उत्तरे.

□ □

## सखीचं घर / राजीव जोशी

आपलं घर जहाजात ठेवून
जहाज समुद्र प्रवासाला चालल्याचं सांगताना
माझी सखी खूप आनंदली होती.
...आता, समुद्राच्या पाण्यात पाय बुचकळवून
ती आपल्या घराला स्पर्श करण्याचं
समाधान मिळवतेय,
आणि घराची ख्याली-खुशाली
समुद्राला विचारतेय्.
घर प्रवासाला धाडण्यापूर्वी
तिनं मनासारखं रंगवूनही घेतलं होतं.
तिचं घराचा स्पर्श आठवीत राहणं
अगदी स्वाभाविक खरं,
मला तिच्या घराच्या रंगाची काळजी
वाटतेय इतकंच.

आमचा रंगारी एकदा म्हणाला होता
साहेब, आपल्या मनाचा आणि घराच्या भिंतींचा
लै संबंध असतो बघा...
उटलाय तुमचा बी रंग. रंग लावा रंग.
त्याच्या म्हणण्यात बरचसं तथ्य असलं तरी
माझी आणि घराची एक गंमतच आहे...

घरापासून दूर जाताना
घराची गच्च घडी करून मी ठेवून देतो
डोळ्यांच्या कोपऱ्यात
पाठ टेकल्यावर सभोवताली उभं असतं माझं घर
आणि मग नेहमीच्याच गप्पा भिंतींशी
आता बरीचशी अवगत झालीय्
भिंतींची भाषा आणि
भिंतींवर सर्वत्र असतात
माझ्या माणसांच्या सुखदुःखाचे रंग.

सखे, घरच समुद्र प्रवासाला पाठवल्यावर
भिंतींची पोकळी जाणवणं साहजिकच.
तुझ्या डोळ्यात
तुझ्या घराची घडी आहे
ती उलगड तर जरा...

□ □



अनुक्रमणिका

## अभागी प्रिये ! / रमेश पाटील

शिवारातून पायवाटा गावात शिरत असतात
नदी-नाल्याच्या उथळ पाण्याचा तेव्हढा आवाज
आणि परतणारे पाखरांचे थवे
किलबिलत असतात
गंधगर्भ विहरणाऱ्या झुळुकेनं
भारून आसमंत सारा
ओथंबून येतो
अस्तास गेलेला सूर्य
एकांतात
औदासिन्य पसरून जातो.
तेव्हा तू माझे दुःख घेऊन येतेस
संवेदनेत सर्व पेरून जातेस
अभागी प्रिये !
तेव्हा मी माझ्यात नसतो
तू आणून दिलेले दुःख
सारखा कुरवाळत असतो फक्त !

□ □

## मोसम / लक्ष्मीकांत घुमे

इथला दरवर्षी येणारा मोसम
दुष्काळग्रस्त झाल्याच्या वार्ता ऐकून
थव्याथव्याने उडणाऱ्या पाखरांनी
सीमापार जाण्यासाठी आगेकूच सुरू केल्याचे
जाहीर केले आहे...
ते उडू लागलेत
दुष्काळ ग्रस्त भागाच्या पाहणीकरिता
पाठविलेल्या छोट्या
हवाई जहाजमधल्या-निरीक्षकासारखे
आणि स्पेशल रिपोर्ट घेऊन
चाललेयत दूर... दूर...
आपण कुठवर जपायचे प्रिये,
भूकबळी गेलेल्या माणसांचे आकडे अन्
रोज एका सांजेच्या पिठाकरिता
कुढत मरत जाणारे
श्वास अन् श्वास
चल आपणही निघू या आता
कुठवर मोजून खायचे
तुझ्या अन् माझ्या भाकरीचे
घास अन् घास !

□ □

## व्यथा / नीरजा

हल्ली याच्या रक्ताला
कुबट वास यायला लागला आहे
एकदा धुतले पाहिजेत केस चांगल्याश्या शाम्पूने
खरे तर काय राहिले आता
ह्याच्या डोळयांतून सतत झिरपणारे रक्त
आणि त्यासाठी लागणाऱ्या छटाकभर तेलासाठी
दिवसभरची वणवण.
कुलशील पहात वसले
अन् शेवटी
एका स्वैरिणीच्या पाच पापांच्या ताटातील
भिक्षा झाले.
त्यापेक्षा उभी राहिले असते बाजारात
तर वंशाची काळजी मिटली असती
अन् पिढ्यान पिढ्या होणारी
बदनामी तरी टळली असती
आता आपणच दिलेले शाप उःशाप
आणि आपणच केलेल्या प्रतिज्ञा
कुठल्या थडग्यात गाडायच्या ?
कुंडाच्या चार चौकटीतला मासा आंधळा झाला
तेव्हाच साऱ्या वाटा बंद झाल्या होत्या
अंधारात मी तरी कुठं धर्म शोधणार
अधर्मालाच दिली सारी दाने
तेव्हापासून आजपर्यंत
किती वस्त्रहरणे, किती वस्त्रहरणे....

□ □



अनुक्रमणिका

# गीता साने : बंडखोर साहित्यकर्तृत्व

## तारा धर्माधिकारी

विदर्भ साहित्य संघाचे ३६ वे वार्षिक सम्मेलन अहेरी (जिल्हा गडचिरोली) येथे दिनांक २० व २१ आक्टोबर १९८४ रोजी श्रीमती गीता साने यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. त्यानिमित्ताने श्रीमती गीता साने यांच्या कर्तृत्वाची आणि वाङ्मयाची ओळख करून देणारा हा विशेष लेख — संपादक

पन्नास वर्षांपूर्वीच स्त्रीमुक्तीची वाट चोखाळणाऱ्या बंडखोर व प्रज्ञावंत पण कोणत्याही राजकीय पक्षाच्या चौकटीत न मावणाऱ्या गीता साने यांचा स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्धचा लढा आजतागायत चालू आहे. जन्म वऱ्हाडात आणि पदवीपर्यंतचे शिक्षण नागपुरात घेतलेली ही विदर्भकन्या. १९३१ साली नोकरीच्या निमित्ताने उत्तर प्रदेशातील मीरत येथे वास्तव्य केल्यानंतर १९४४ पासून आजपर्यंत त्या बिहारमधील धनबाद येथील खाणकामगार स्त्रियांमध्ये व शैक्षणिक क्षेत्रातील विधायक सार्वजनिक कार्यात अग्रेसर राहून कार्य करीत आहेत. भारतीय स्त्रीजीवनाच्या सर्व पैलूंचा त्यांनी अभ्यास केला आहे. पन्नास वर्षांपूर्वी त्यांनी दहा कादंबऱ्या लिहिल्या. त्यांची साहित्यनिर्मिती जीवननिष्ठेतून उदयास आली. त्यांच्या वठलेला वृक्ष, निखळलेली हिरकणी, हिरवळीखाली या कादंबरीतील बंडखोर विचारांनी मराठी समाजाला हलवून सोडले होते. कुटुंबसंस्था, विवाहपद्धती, हुंडा वरसंशोधन, सामाजिक चालीरीती, अनिष्ट रूढी, अंधश्रद्धा या साऱ्यांना बळी पडलेल्या त्यांच्या नायिका सुशिक्षित, पदवीधर असून त्यावेळच्या समाजातही बंड करून उठलेल्या आहेत. त्यांच्या धुके आणि दहीवर, आविष्कार यासारख्या राजकीय विचारांची पार्श्वभूमी लाभलेल्या कादंबरीतील नायिका देखील पदवीधर, प्रगल्भ आचारविचाराच्या असून पुरुषांशी समानतेच्या भूमिकेतून वागणाऱ्या आहेत. १९६४ साली लिहिलेले चंबळची दस्युभूमी हे पुस्तक सर्वार्थाने त्यांच्या चिंतनशील स्वभावाचे दर्शन घडविणारे आहे. वीस वर्षांपूर्वी त्यानी हे पुस्तक लिहिण्यासाठी चंबळचे खोरे पालथे घातले, डाकूंच्या कुटुंबियाच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या हे खरोखरच विलक्षण वाटते. पुस्तकासाठी संदर्भग्रंथ, अहवालाचे वाचनमनन तर केलेच, पण त्याबरोबर प्रत्यक्ष अनुभूती घेण्याचा दांडगा उत्साह दाखविला हे लेखिकांच्या बाबतीत एकमेव उदाहरण असावे. नुकतीच त्यांनी लेखनासाठी काश्मीरच्या खेड्यांचीही भ्रमन्ती केली. आजही आदिवासी समाजाच्या स्त्रियांचे प्रश्न सोडवून घेण्यासाठी त्यांच्या जीवनाचे प्रत्यक्ष दर्शन घेण्यासाठी जंगलांमधून रानोमाळ हिंडण्याची त्यांची जिद्द कायम आहे अशा तऱ्हेने साहस, दुर्दम्य चिकाटी आणि त्याचबरोबर स्वतंत्र प्रतिभेने, चिंतनाने व मननाने एखाद्या प्रश्नाची उकल करण्याची त्यांची प्रवृत्ती वयाच्या ७८ व्या वर्षीही कायम आहे, हे पाहून स्त्रीमुक्तीची वाट कोणती म्हणून आम्ही वारंवार आक्रोश करतो ती हीच असे बिनदिक्कतपणे म्हणावेसे वाटते.



अनुक्रमणिका

त्यांच्या आयुष्यभराच्या चिंतनातून व स्त्रीविषयक सर्वांगीण समस्यांच्या अभ्यासातून साकारलेले त्यांचे नवे 'भारतीय स्त्रीजीवन' प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तक निश्चितच मार्गदर्शक ठरणार आहे. वर्षानुवर्षे रावणाऱ्या कष्टकरी श्रमिक स्त्रियांतील जागृती त्यांना अत्यंत आशादायक वाटते. एक दिवस स्त्री विजयी होणारच! फक्त "उत्तिष्ठ, जागरत" हा मूलमंत्र लक्षात घेऊन स्त्रियांनी ही मुक्तीची यात्रा चालू ठेवली पाहिजे असा त्यांचा संदेश आहे.

□ □ □

आपण संक्रमण काळात आहोत. यांत्रिक व तांत्रिक मनूतून एका नवीन युगात प्रवेश करीत आहोत. जुनी मूल्ये, जुन्या प्रतिष्ठा गडवडून ढासळू पहात आहेत. नवीन मूल्ये व नव्या प्रतिष्ठांची स्थापना करावयाची आहे. या मूल्यपरिवर्तनाची सिद्धी आपल्यापैकी दरेकावर अवलंबून आहे. यात किती तरी व्यक्तींना आहुती द्यावयाची आहे. युद्धात जे कामास येतात, तेही–नव्हे तेच युद्ध जिंकतात. या परिवर्तनाच्या प्रक्रियेत स्त्रियांची भूमिका कोणती याचा मूलभूत विचार करणाऱ्या गीता साने या एक बंडखोर, प्रतिभाशाली व प्रत्यक्ष सार्वजनिक कार्य करणाऱ्या स्त्रीमुक्तीच्या पुरस्कार्त्या असून स्त्रियांना नव्या विचाराचे वळण देण्याचे कार्य करीत आहेत.

साधारणपणे स्त्री ही स्थितिवादी मानली जाते. क्रांतीचे नेतृत्व नेहमी कुठला तरी पुरुषच करीत असतो. पण स्त्रीजीवनाची मूल्ये मात्र स्त्रियांनाच बदलावी लागणार आहेत. पुरुषापेक्षा स्त्रीची परिस्थिती अधिक प्रतिकूल व विषम आहे. पण परिस्थिती जितकी अधिक प्रतिकूल तितकाच पराक्रमाला वाव अधिक असतो. स्त्रीचे बंड कशात आहे? जो शरीराने दुबळा असेल, त्याला स्वतंत्र जीवनाचा अधिकार नाही, त्याने स्वायत्त जीवनसिद्धीची आकांक्षा धरू नये, स्वेच्छेने जगण्याची अभिलाषा करू नये, असा परंपरेचा दंडक आहे. या परंपरेच्या विरुद्ध स्त्रीला बंड करावयाचे आहे. स्त्री ही शरीराने दुबळी, नाजुक असली तरी या बंडाचे नेतृत्व तिच्याचकडे गेले पाहिजे. कारण तो तिचा अधिकार आहे. शरीरबळ हे जीवनाच्या पात्रतेचे अंतिम गमक नव्हे, हे प्रस्थापित करणे हेच स्त्रीचे ध्येय आहे. अशा पराक्रमी तरुणीचा विकट मार्ग प्रकाशमान करण्याचे कार्य गीता साने करतात.

गीता साने यांचा जन्म वऱ्हाडात वाशीम येथे ३ सप्टेंबर १९०७ साली झाला. मध्यमवर्गीय कुटुंबात मोडणारे त्यांचे वडील विद्याविभूषित होते व व्यवसायाने वकील होते. श्री. भाऊराव उर्फ जनार्दन साने. साने दांपत्याला एकूण पाच मुली व एक मुलगा होता. भावंडांमध्ये गीताताई सर्वात वडील होत्या. वयाच्या आठव्या वर्षी त्या हिंगणे येथे शिकावयास राहिल्या. काही दिवस मिशनरी शाळेतही शिकल्या. वयाच्या पंधराव्या वर्षी त्या अमरावतीच्या सुप्रसिद्ध गव्हर्मेंट गर्ल्स् हायस्कूल येथे वसतिगृहात राहून शिकल्या. मॅट्रिकच्या परीक्षेत प्रथम श्रेणीत पास होऊन शिष्यवृत्ती पटकावली. उच्च शिक्षणासाठी त्या नागपूरला आल्या. त्यावेळच्या सायन्स कॉलेजमध्ये त्या विज्ञानाच्या विद्यार्थिनी होत्या. उत्कृष्ट रीतीने बी. एस्सी. पास झाल्या. वऱ्हाडात ते दिवस हिंदुमुसलमानाच्या दंग्यासाठी गाजत होते. या दंग्याची झळ त्यांच्या कुटुंबाला लागली. त्यांच्या वडिलांवर खून, लूट इ. चे आरोप आले. खटले चालू झाले. त्यात वडील निर्दोष सुटले. ह्यात दोनतीन वर्षे निघून गेली पण त्यानंतर वडिलांनी वकिली केली नाही. ते गांधीजींच्या असहकार आंदोलनात सामील झाले. त्यांच्या मातोश्रींनीही सत्याग्रहाचा मार्ग अवलंबिला. आता साऱ्या कुटुंबाची जबाबदारी गीताताईंवर आली.

आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांनी उत्तर प्रदेशातील मीरत या गावी शिक्षिकेची नोकरी पत्करली. एखाद्या तरुण स्त्रीला आपल्या कुटुंबाची जबाबदारी स्वीकारून अशी हिंमत दाखविता येते हे त्यांनी त्या काळातच सिद्ध केले. त्या म्हणतात, "मला मीरतला काही त्रास झाला नाही. देशभक्ताची मुलं म्हणून आम्हाला सहानुभूती मिळत होती. कधी पडदा पाळला नाही. हिंडण्याफिरण्याचे बंधन पाळले नाही. कधी भीती वाटली नाही व धोकाही झाला नाही." १९३१ ते १९४४ पर्यंत त्यांनी मीरत येथे नोकरी

केली. भावंडांच्या शिक्षणाची व्यवस्था केली व लहान भावाला इंजिनियर केले. या काळात त्यांच्या आसपास साम्यवादी विचारांची मंडळी वावरत असल्यामुळे व श्री. नरसिंग साम्यवादी विचारांचे असल्याने त्यांच्यावर कम्युनिस्ट असल्याचा शिक्का बसला, पण त्या कोणत्याही राजकीय पक्षाच्या सभासद नव्हत्या.

१९३२ साली गीताताईंचा प्रेमविवाह श्री. नरसिंग धगमवार यांच्याशी झाला. त्यांच्या सांगण्यानुसार या विवाहाला फक्त दीड रुपया खर्च आला. लग्नानंतर त्यांनी आपले नाव बदलले नाही की रूढ सौभाग्यचिन्ह, 'मंगळसूत्र' यांचा कधीच वापर केला नाही. पन्नास वर्षापूर्वी स्त्रीचे स्वतंत्र व्यक्तिमत्व जोपासण्याचा त्यांचा हा बाणा हेच त्यांच्या जीवनाचे वैशिष्टच आहे. श्री. नरसिंग यांनी पुढे धनबाद येथे नोकरी धरली. गीताताईंनी मीरत येथे १३ वर्षे नोकरी करून १९४४ साली काही मैत्रिणींच्या सोबत नोकरीचा राजीनामा दिला व धनबादला प्रयाण केले. धनबादला श्री. नरसिंग यांना नोकरीत बऱ्यापैकी पैसा मिळू लागला. त्यामुळे त्यांना आता शाळेत नोकरी मिळेना, पण स्वस्थही बसवेना. म्हणून १९४५ साली त्यांनी ट्रेनिंग (प्रशिक्षण) घेतले. ह्या काळात त्यांच्या दोन्ही मुली–वसुधा धगमवार व बीना धगमवार (आता पद्मनाभन) होस्टेलमध्ये शिकावयास राहिल्या. त्यामुळे करमत नव्हते म्हणून गीताताईंनी १९५६ ते १९६१ या काळात पुन्हा शिक्षिकेची नोकरी केली. पण १९६१ मध्ये 'चंबळची दस्युभूमी' पुस्तक लिहिण्यासाठी रजा मागितली. व ती मिळाली नाही म्हणून नोकरीचा राजीनामा दिला. याच दरम्यान श्री. नरसिंग यांची नोकरी सुटली. त्यांच्या खाणीत काम करणारा कामगार 'लाल शर्ट' घालून कामावर आला म्हणून त्याला काढून टाकण्याचा सल्ला तुम्ही द्यावा असा खाण मालकांनी त्यांना आग्रह केला, पण ते तयार झाले नाहीत व त्यांनी नोकरी सोडली व वकिलीचा व्यवसाय चालू केला. अशा तऱ्हेने गीताताईंचे वैवाहिक जीवन अत्यंत सुखी आहे ! श्री. नरसिंगसारखे यजमान सहचर म्हणून लाभल्यामुळे त्यांचे स्वतंत्र जीवन कुठल्याही प्रकारे कुंठित झाले नाही.

त्यांची कन्या वसुधा धगमवार अतिशय तल्लख बुद्धीची आहे. तिने कायद्याच्या क्षेत्रात लंडन विश्वविद्यालयाची पीएच्. डी.ची पदवी मिळविली आहे. आज सामाजिक न्यायाच्या संदर्भात ती न्यायालयातील कैद्यांचे प्रश्न हाताळत असून तिच्या कामाबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्तीही तिची प्रशंसा करतात. आईची प्रतिभा, साहसी वृत्ती व सामाजिक बांधिलकी तिच्यात पुरेपूर उतरली आहे. लहान कन्या विवाहित असून तिची मुलगी चित्रा म्हणजे गीताताईंची नात ! तिच्यासोबत जगताना त्यांना नव्या पिढीच्या तरुण विचारांचा व सहवासाचा मनमुराद आनंद लुटता येतो. तिच्यासाठी त्यांनी सुंदर सुंदर कविता रचल्या. बालसाहित्याचा अभ्यास केला. त्यांच्या प्रतिभेला–अभ्यासाला कुठलाही विषय वर्ज्य नाही.

धनबादला आल्यापासून त्यांनी खाणकामगार स्त्रिया, आदिवासी स्त्रिया इ. कष्टकरी स्त्रियांच्या प्रश्नांशी समरस होऊन, त्यांच्या सोबत राहून त्यांचे प्रश्न अभ्यासून समाजकार्य केले आहे. त्या सांगतात की या कामगार स्त्रियांना मी विचारले, "एवढे जमिनीच्या आत जाऊन तुम्ही काम करता, त्रास नाही वाटत ?" त्या म्हणतात," नाही वाटत. कारण कामाचे पैसे मिळतात. त्याची गरज असते व आत गेल्यावर हवा थंड असते. जमिनीवर जसे हवामान बदलत असते, तसे आत होत नाही." आज वर्षानुवर्षे त्या या स्त्रियांसोबत काम करीत आहेत. १९५१ पासून काही वर्षे त्या कोल माईन्स वेलफेयर कमिटीवर होत्या. त्यांनी कामगारांसाठी घरे बांधणाऱ्या लेबर को–ऑपरेटिव्ह सोसायटीवर सतत १६ वर्षे काम केले. चीफ मायनिंग इंजिनियरशी सतत संपर्क साधून, वाटाघाटी, चर्चा करून, मागण्या मांडून, वेळप्रसंगी भांडण करूनही कामे केली. जमीन मिळायला दहा वर्षे लागली, पण त्यांच्या म्हणण्यानुसार स्थानिक अधिकाऱ्यांची मदत मिळते. पुढे त्या ऑनररी मॅजिस्ट्रेट झाल्या. तेथे खाणीत काम करणाऱ्या स्त्रियांचे, मुलांचे हाल पाहून त्यांनी कायद्याचा अभ्यास करावयाचे ठरविले व त्यासाठी इंडियन पीनल कोड व क्रिमिनल प्रोसिजर कोड यांचा

सखोल अभ्यास केला. ह्या कायद्यांत बदल झाल्या-खेरीज कामगार स्त्रियांची स्थिती सुधारणार नाही असे त्यांचे मत आहे.

कामगार स्त्रियांच्या प्रश्नाबाबत संशोधन करण्यासाठी लंडनहून आलेली एक मुलगी या कामगार स्त्रियांसोबत राहिली, हिंडली, फिरली, सिनेमेसुद्धा पाहिले. त्या खाणकामगार स्त्रियांची अशी मागणी आहे की, अशा सामाजिक कार्यकर्त्या आमच्यासोबत राहतील तर आमचा फार मोठा फायदा होईल. आमच्या युनियनतर्फे आम्ही तिला चांगला पगारसुद्धा देऊ. अशा तऱ्हेने या कामगार स्त्रियांमध्ये जागृती होऊ लागली आहे हे गीताताईंना अत्यंत शुभ लक्षण वाटते. त्यांच्या मते लेनिन आणि मार्क्स यांच्या इतका स्त्रीविषयक समस्यांचा सखोल अभ्यास इतर कुणीच केलेला नाही. या दोघांना हे सतत जाणवत होते की जोपर्यंत स्त्रीचे पाय 'पाळणा आणि चूल' यालाच बांधले राहतील तोपर्यंत ती कधीच घराच्या बाहेर पडू शकणार नाही आणि स्त्रियांनी उत्पादकश्रमात भाग घेतल्याखेरीज देश समृद्ध होऊ शकणार नाही. आमच्या देशात म. गांधींनी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेण्याची प्रेरणा दिली. राजाराम मोहन रॉयसारख्या व महर्षी कर्व्यांसारख्या समाज-सुधारकांनी स्त्रीशिक्षणाचे व प्रबोधनाचे प्रचंड कार्य उभारले, पण स्वातंत्र्यानंतर सदतीस वर्षा-नंतरही मध्यमवर्गीय स्त्रिया मात्र चालीरीती, रूढी, परंपरा, धार्मिक श्रद्धा यांच्या विळख्यात अडकून पडल्या आहेत, याची त्यांना खंत वाटते. पन्नास वर्षापूर्वी त्यांनी आपल्या साहित्यात केलेले स्त्रीसमस्यांचे दर्शन अत्यंत बोलके, अभ्यासपूर्ण व निश्चितच चिंतनीय आहे.

गीताताईंची आद्यनिष्ठा जीवनावर आहे. जीवन व समाजनिष्ठा असल्याशिवाय साहित्याचा उदयच होत नाही. साहित्यातून जीवनाकडे व जीवनातून साहित्याकडे सतत येरझारा घालणारा त्यांचा प्रवास चालू आहे. माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठेने जगता आले पाहिजे, ही जाणीव उराशी बाळगूनच त्यांनी साहित्याच्या प्रांगणात पदार्पण केले आहे.

**साहित्यिक गीता साने**

साहित्य व संस्कृतीचे मूल्य मानवाची प्रतिष्ठा आणि सर्व प्रकारचे स्वातंत्र्य हेच असते. जीवन-निष्ठा उराशी बाळगून लिखाण करणाऱ्या साहित्यिकाच्या लेखणीतून त्याचे मन व हृदयच द्रवरूप होऊन कागदावर उतरत असते. गीता साने यांनी एकूण अकरा पुस्तके लिहिली आहेत. त्यापैकी दहा पुस्तके १९३० ते १९४२ या कालखंडात लिहिली आहेत. तरुण वय, अन्यायाचा प्रतिकार करण्याची तीव्र इच्छा, चिंतनशील वृत्ती आणि बंडखोर विचार या पार्श्वभूमीवर त्यांचे हे साहित्य अत्यंत जिवंत वाटते व आज पन्नास वर्षानंतरही त्यातील विचारांचा ताजेपणा प्रत्ययास येतो. त्यांच्या कादंबऱ्यातील नायक नायिका पदवीधर, सुशिक्षित आहेत म्हणून त्यांच्या मुखातून जे विचार, ज्या जाणिवा व्यक्त झाल्या; त्यांचा आशयही गंभीर आहे. त्यात फक्त तात्कालिक सामाजिक व्यक्तींचे चित्रण आहे. एवढेच नव्हे तर तत्कालीन क्रांती, सामाजिक परिस्थिती, राजकीय स्थित्यंतरे यांचे सम्यक दर्शन आहे.

साहित्याचा उगम सांस्कृतिक असतो आणि अस्तित्त्वही सांस्कृतिक पातळीवरच असते; या भूमिकेतून गीता साने यांच्या साहित्याचा विचार व्हावा. पन्नास वर्षापूर्वी त्यांनी आपल्या संस्कृतीत प्रचलित असलेली कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, विवाहपद्धती, रूढी, चालीरीती इत्यादींवर परखड टीका केली आहे व अखिल भारतीय स्तरावरची स्त्री कशी शारीरिक व मानसिक दृष्ट्या असहाय, परावलंबी व शक्तिहीन झाली आहे याचे विवेचन केले. भारतीय स्त्री जीवनाच्या अनुषगाने त्यांनी समाजशास्त्र, कायदा यांचा सखोल अभ्यास केला. पन्नास वर्षापूर्वी त्यांच्या नायिका स्वतंत्र विचाराच्या, प्रगल्भ बुद्धीच्या व स्त्रीपुरुष समान-तेच्या पुरस्कर्त्या होत्या. म्हणूनच अन्यायाचा प्रतिकार करणाऱ्या व बंडखोर विचारांच्या होत्या. स्त्री–जीवनाच्या ज्या मौलिक समस्या आहेत आणि त्या सोडविण्याच्या दृष्टीतून समाजशास्त्रज्ञ सैद्धान्तिक पातळीवर झगडत असतात; त्या समस्या गीताबाईंच्या साहित्यातील स्त्री–पात्रे प्रत्यक्ष वास्तवाशी भिडून सर्वांगाने समजावून घेऊन

सौडवण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यांनी सर्व कादंबऱ्यातून स्त्रीजीवनाच्या ज्या विविध समस्यांचा उहापोह केला त्या समस्या एवढ्या मौलिक स्वरूपाच्या आहेत की ज्याचे उत्तर आजही सापडलेले नाही. पुरुष वर्चस्वाचे संस्कार भारतीय स्त्रीच्या मनात इतके खोलवर रुजले आहेत की घटनेने तिला समानाधिकार देऊन ३४ वर्षे लोटली तरी त्याची जाणिव तिला अद्याप झाली नाही, ही त्यांची खंत आहे. त्यांचे १९३०–४२ या कालखंडातील बव्हंशी साहित्य हे स्त्री–जीवनावरील अन्यायाची गाथा असून आपल्या पात्रांच्या द्वारे त्यांनी त्याचे परखडपणे विवेचन केले आहे. त्यासाठी समाजशास्त्र, मानसशास्त्र यांचा अभ्यास करून वास्तवतेचा मागोवा घेत त्यांनी साहित्याच्या प्रांगणात प्रवेश केला. त्यांचे सारे साहित्य त्यांच्या जीवननिष्ठेतून उतरले आहे. पन्नास वर्षांपूर्वी बंडखोर विचारांनी स्वतः स्त्री–मुक्तीची वाट चोखाळणाऱ्या व इतरांसाठी ही पाऊलवाट आखून देणाऱ्या या लेखिकेने स्त्रीजीवनातील प्रत्येक अन्यायाचा परामर्ष घेण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यांची पहिली कादंबरी 'वठलेला वृक्ष' म्हणजे कुटुंबसंस्थेत स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाची कहाणी आहे. स्त्रीच्या गुलामगिरीवर आधारलेली ही कुटुंबसंस्थेची इमारत डळमळल्यावाचून राहणार नाही, असा परखड इशारा पन्नास वर्षांपूर्वीच त्यांनी देऊन ठेवला व कुटुंबसंस्थेवर घणाघाती प्रहार केला. त्यानंतर लागोपाठ निखळलेली हिरकणी 'लतिका', 'हिरवळीखाली' या स्त्री–समस्या–प्रधान कादंबऱ्या लिहून स्त्री–मुक्तीच्या वाटा चोखाळणाऱ्या, अन्यायाविरुद्ध संघर्ष करणाऱ्या बंडखोर नायिका चित्रित करून स्त्री–हृदयातील स्वातंत्र्य ऊर्मीची जाणिव समाजात साहित्यातून प्रकट केली. त्याकाळी स्त्रियांच्या भूमिकेबाबत क्रांतिकारी विचार बाळगणाऱ्या ज्या काही मूठभर स्त्रिया होत्या, त्यात त्यांची गणना करावी लागेल. १९३० सालीच त्यांच्या कादंबरीवर श्रीमती कमला चट्टोपाध्याय यांनी समीक्षा लिहून या बंडखोर भूमिकेबद्दल त्यांची प्रशंसा केली होती. त्या काळी विवाहानंतर पतीच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी नोकरी करून त्यांच्या बेकारीच्या काळात साऱ्या कुटुंबाची पोषणकर्ती बनलेली 'वठलेल्या वृक्ष'ची नायिका विमल, स्वातंत्र्य आंदोलनात स्वतः समर्पित करणाऱ्या तरुणाबद्दल आस्था बाळगून मदत करणारी, अपत्य जन्माच्या वेदनांनी शरीराने खंगून गेलेली 'विमल' ही कुटुंबसंस्थेचा बळी आहे. ती म्हणते, "स्वतंत्र स्त्री आपल्या हक्काची मागणी करते. औदार्याने तिचे समाधान होत नाही. पुरुषाच्या कार्यक्षेत्रात पदार्पण करताच मी पुरुषाचे हक्क मागत होते. पण मनाचा तो मोठेपणा पुरुषांजवळ नाही. दयेची भिक्षा म्हणून चतकोर भाकरी आमच्या पदरी घालायला ते आनंदाने तयार आहेत. या भिक्षेवर आमची आई संतुष्ट होती. बाबा तिला आदराने वागवीत. पण मी पुढच्या पिढीची होते. मानाचे चांदीचे ताट मला नको होते. त्या चांदीच्या ताटाची योग्य ती व्यवस्था करण्याचा हक्क मी हिसकावून घेण्याचा प्रयत्न करीत होते. हाच घरोघर निर्माण होणारा लढा होता." पुरुषवर्चस्व व विवाहसंस्था याबाबत त्या म्हणतात, "हिंदु विवाह ही रेशमाची गाठ आहे. ती तुटता तुटत नाही व सुटतही नाही. हिंदू विवाह पद्धती, हिंदू विवाह कायदा या स्त्रीला सतत अन्यायकारकच ठरत आला आहे. या साऱ्या समस्यांचे अत्यंत सोप्या मार्मिक भाषेत विवेचन करताना त्या म्हणतात, "लग्न ही प्रत्यही घडणारी गोष्ट आहे. मग ही खरेदी–विक्रीची गोष्ट अजून बंद का बरं पडत नाही? विशेषतः शाळा कॉलेजातून जाणाऱ्या मुलींना 'पाहण्याची' काय आवश्यकता आहे?" स्त्रीचे हे दुर्दैव आजतागायत कायम आहे. म्हणूनच पन्नास वर्षानंतरही त्यांच्या लेखणीचे सामर्थ्य घटले नाही. शिवाय या पाहाण्याचा पद्धतीने सौंदर्याची किंमत अवास्तव वाढली आहे. विवाहयोग्य वयात साऱ्याच मुली समान असतात. काहींचे सौंदर्य स्थायी असते. बहुतेक मुलींना मातृपदाशी टक्कर द्यावी लागते. या संकटातून पार पडायला सकस शरीर लागते. संसाराचा गाडा सुरळीत चालायला वधुवरांचा स्वभाव देवघेवीचा लागतो. पण लग्नाचा सौदा सौंदर्य व संपत्ती यांच्या बळावरच ठरतो. मुलामुलींना आपली निवड करू द्या; नाही तर कोणतीही अव्यंग वधू स्वीकारा पण. वरपक्षाला दोष देण्यात

काय अर्थ ? मुलगी आयुष्याच्या जोडीदाराची अपेक्षा करीत नाही तर विलासी धनिकाची करते आणि विवाहेच्छू आपल्या मालकीच्या विलासिनीच्या शोधात असतो. आमच्या वधुपरिक्षा व विवाह पद्धती सडलेल्या मनाची दुर्गंधी. दुर्दैवाने ५० वर्षानंतर आजही 'पाहण्याचा', 'वरसंशोधना'चा कार्यक्रम चालूच आहे. कारण सुशिक्षित स्त्रीला आजही 'जोडीदार' नको आहे. संरक्षण करणारा रक्षणकर्ता नवरा हवा आहे. आजही स्त्रियांना स्वातंत्र्य नको आहे. संरक्षण हवे आहे. तिची जबाबदारी उचलण्याची हिंमत नाही, धैर्य नाही. उलट विवाहाचा सोनेरी पिंजरा तिला अधिक प्रिय आहे. पण तिच्या हे ध्यानी येत नाही की या सोनेरी पिंजऱ्यात तिचे जीवन घुसमटून निष्क्रीय बनले आहे. म्हणूनच आज स्वातंत्र्याच्या सदतीस वर्षानंतरही समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून, लोकशाहीची नागरिक म्हणून तिची प्रतिमा तयारच झाली नाही. ही लेखिकेची खरी वेदना आहे. आजही स्त्री समाजाला, देशाला व प्रत्यक्ष कुटुंबालाही भारभूत वाटते, हीच स्त्री-जीवनाची खरी शोकांतिका आहे.

"जनावरांनाही भूतदया दाखविण्यासाठी संस्था निर्माण होत आहेत, तशा आम्हा स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची दाद घेण्यासाठी का होत नाहीत ? देवापुढे बकरी बळी दिलेली पाहून ज्या करुणार्णवांची हृदये हेलावतात. त्याना स्वतःच्या बहिणी, कन्या इ. चे आर्त स्वर का ऐकू येत नाहीत ?"

"जुन्या मालकाच्या खुंट्यावरून सोडून नव्या मालकाच्या खुंट्यावर बांधलेल्या गाईप्रमाणेच मला वाटत होते. तिच्याप्रमाणेच माझे मन मूक हंबरडा फोडीत होते." आश्चर्य हेच वाटते की स्त्री हृदयाच्या या वेदना आज पन्नास वर्षानंतरही कमी झालेल्या नाहीत.

**'स्त्रीमुक्ती'चा विचार**

स्त्रीमुक्तीचा सर्वांगाने विचार करणारी 'हिरवळीखाली' ही कादंबरी वैचारिक प्रतिभेची झेप दाखविणारी प्रभावी कादंबरी ठरली आहे. त्यात नायिका वनिता मातृत्वाच्या आनंदासाठी समाजाचे सारे रूढ संकेत तोडून टाकणारी व वैचारिक पातळीवरून जगणारी स्वतंत्र स्त्री आहे. "ती निसर्गभक्त होती. रूसो, थोरो, टॉलस्टॉय हे तिचे आवडते ग्रंथकार होते. ती काही प्रमाणात गांधींची उपासक होती. खादी वापरत असे," असे तिचे वर्णन लेखिकेने केले आहे. नायिकेचे व्यक्तीचित्रण करताना त्यांनी स्त्रीजीवनाचे सर्व पैलू विचारात घेतले आहेत. या कादंबरीतील प्रकरणांची शीर्षके सुद्धा फार बोलकी आहेत. तडफड, रूढी, शिव्याशाप, देवाच्या दारी दास्याच्या शृंखला, दयेचे दान, अज्ञात जग, जुनी व नवी सावित्री, अर्धा वाटा, श्रीमंताच्या स्त्रिया, अर्थोऽहि कन्या परकीय एव, गुलामगिरी, कुचंबणा, सत्तेपोटी, मुलगा की मुलगी, श्रद्धेचा घाणा, काटेरी कुंपण, महिषी की दासी, दीपशीखा, भरारी..." त्यांनी स्त्रीशिक्षण, विवाह कायदा, एकत्र कुटुंबपद्धती, आर्थिक स्वातंत्र्य, पुत्रप्राप्ती, सामाजिक संकेताविरुद्ध बंड करून स्वीकारलेले मातृत्व, विवाहित स्त्रीच्या संसारात प्रवेश करणारी नवऱ्याची मैत्रीण इ. सारे प्रश्न हाताळले असून कुठे पाल्हाळीक वर्णने नाहीत. कंटाळवाणे संवाद नाहीत. उलट नायिकेचे पुढे काय झाले असेल ही उत्सुकता अखेरपर्यंत टिकून राहते. वनितेच्या पात्रातून सामाजिक अनिष्ट चालीरीतींवर कडक प्रहार करण्याची एकही संधी लेखिकेने सोडली नाही.

"कुठेही स्त्री दिसली की समाजाचा प्रत्येक घटक एकच प्रश्न करतो-पतिता की पतिव्रता ! कुलीन की कुलटा आणि या एका प्रश्नावर आमचे भवितव्य अवलंबून असते."

"आम्ही स्त्रिया सर्व प्रकारच्या त्यागाला तयार आहोत; पण आमचे पावित्र्य अबाधित राहिले पाहिजे आणि पावित्र्य म्हणजे काय तर आमच्या शरीरभोगाचा हक्क एका व्यक्तीसाठी राखून ठेवणे ! हे पावित्र्य राखणे हेच आमचे जीवनसार ! हेच आमच्या जीवनाचे ध्येय !"

"पुरुषाचे पावित्र्य सोन्याचे भांडे, कुठे डाग पडायची भीती नाही आणि पडला तरी विस्तवात घातले की पवित्रच ! स्त्रियांची अब्रू-काचेची फुलदाणी-नव्हे मूर्तीच। जरा भग्न होताच, तडा जाताच पूजेला निरुपयोगी ! मग या दोन भांड्यांचे जमायचे कसे ?

"तुला पंचवीस रुपयांचे एक लुगडे घ्यायचे तर

दहा दुकाने पालथी घालतेस, पन्नास नमुने पहाते आणि जन्माचा जोडीदार मात्र डोळे मिटून पसंत करशील ?

"तुम्हा सुशिक्षित मुलींची दास्यवृत्ती पाहिली की पोटात ढवळते–आज तुमची लग्ने म्हणजे निव्वळ बाजारी सौदे !

"पुरुषांना वेश्यागृहाची लाज वाटत नाही. घरात पोरांचे कारखाने काढतांना ते शरमिंदे होत नाहीत. कुलीन मुलींची विटंबना करताना त्यांच्या हृदयाचा थरकाप होत नाही," असे परखड उद्‌गार त्यांनी पुरुषांच्या वृत्तीबद्दल काढले होते.

"मी शिक्षणाने स्वतंत्र झाले, पण या स्वातंत्र्याचा उपयोग मला घेता येत नाही. अमेरिकेत एकाएकी दास्यमुक्त झालेल्या निग्रो गुलामासारखी परिस्थिती आहे. घरकामात माझा जन्म गेला. ज्ञानासाठी मी वाचले नाही, परीक्षेसाठी वाचले. मला विचार करता येत नाही. ती शक्ती माझ्या-अंगी कधीच नव्हती" हे त्यांच्या स्त्रीपात्राचे उद्‌गार आजतागायतही स्त्रीजातीबद्दल किती सयुक्तिक वाटतात ? त्याचे हे निरीक्षण पन्नास वर्षा-पूर्वी केलेले असले तरी आजही लागू पडते, रूढीच्या साच्यातून एकसारख्या मूर्ती काढण्यात समाजाला इतके यश येईल असे कधीच वाटले नव्हते. स्त्रियांची मुलगा व मुलगी असा भेद करण्याची वृत्ती किती खोल रुजलेली आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही. कारण 'सखू जाईल सासरी, वकू जाईल सासरी, डुबऱ्या माझा कामाचा' हा विचार प्रत्येक आईच्या मनात आजच्या आधुनिक काळातही कुठेतरी लपलेला असतोच. मुलगी पर-घरी जाणार म्हणून आईला पर्वा नाही, परकी पोरगी घरी येणार म्हणून सासूला माया नाही. पुरुषांचे पुरुषी हृदय म्हणून ते हुकूम गाजविणार ! हजारो मुली हेच जीवन कंठीत असतात. प्रस्थापित समाजाच्या प्रवाहाच्या विरुद्ध टक्कर देत पुढे जायचे त्यांना माहितच नसते. दास्याच्या पायात पडलेल्या श्रृंखला जन्मभर पायात वाळगतात. जणू खुंटयाला बांधलेली गुरेच !"

स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या आजच्या समस्या यापेक्षा काही वेगळया आहेत काय ? पन्नास वर्षा-पूर्वी सर्व स्त्री समस्यांची अशाप्रकारे उकल करणारे साहित्य मराठी लेखकाने अथवा लेखिकेने लिहिल्याचा अथवा प्रयत्न केल्याचा एकही पुरावा मराठी साहित्यात आढळत नाही. त्यांनी उल्लेख केलेले स्त्रीचे संस्कारक्षम मन आजही संस्काराच्या कोषातच दडलेले आहे. तिचे वैवाहिक व कौमार्या-बाबतचे संस्कार, पुरुषाचे वर्चस्व मानण्याची वृत्ती, त्याच्या रक्षणातच राहण्याची प्रवृत्ती, मुलगा, मुलगी यांचे संगोपन करताना न कळत होणारा भेदभाव यामुळे स्त्रियांची प्रगती गोगलगाईच्या पावलाने चालू आहे. स्त्रीला शारीरिक श्रमाच्या क्षमतेची जाणीव आहे, तसे तिच्या आंतरिक शक्तीचे तिला भान झाले नाही; म्हणून सर्वार्थाने आजही 'स्त्री' अवला राहिली आहे. या उक्तीची सार्थता त्यांच्या 'लतिका' कादंबरीतूनही दृगोचर होते.

**लतिका**

स्त्री ही दुबळी, अगतिक भित्री बनल्याने तिचा कसा कोंडमारा होतो, हे लतिकेच्या रूपाने केलेले वर्णन अत्यंत वाचनीय आहे. नायिका राधा हिचे तिच्या मर्जीविरुद्ध लग्न ठरते, तेव्हा १९३७ साली तिने हे लग्न मोडावे म्हणून तिची वहीण किशोरी आग्रह धरते. कारण ती स्वत: बंडखोर विचारांनी पेटलेली आहे–"अंगात तेज असेल तर वाट फुटेल तिकडे चालती हो, हातपाय हलव नाहीतर जन्मभर बंदिवान होशील." लग्नानंतर राधा पूर्वीच्या प्रियकराचे 'वेड' निघावे म्हणून त्याची शुश्रुषा करण्यास जाते. पण, यासाठी समाज, तिचा नवरा, तिला क्षमा करीत नाही. विवाहाचे बंधन तोड-णाऱ्या स्त्रीला समाजात पतिताच व्हावे लागते. राधेचा प्रियकर कुमार म्हणतो, "प्रेमाने पुरुषाचे समाधान होते पण स्त्रीसाठी पुरुषाचे प्रेम हा तिच्या जीवनाचा पाया बनतो. त्यावर ती संसाराची इमारत उभारते. मुलेबाळे, घरदार या ऐहिक गोष्टीत ती आकंठ बुडते. नातवंडांची स्वप्ने पाहू लागते. मग नवरा व पुत्र सोडून आलेल्या या राधेला मी काय देऊ ? कायदा हेच म्हणणार की तुम्ही व्यभिचारी आहात. मुलीच्या कपाळी हाच शिक्का येणार आणि समाज तापलेल्या मोहरा उठविणार ! पापी–विवाहबाह्य संबंधाचे स्वरूप व स्त्रीचे दुबळे व्यक्तिमत्व वर्णन करणारी ही कादं-बरी सामाजिक परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन व

अनुभूतीचा स्पर्श यामुळे सजीवपणे रेखाटली गेली आहे. तुला स्वातंत्र्याची जरूर कधी भासलीच नाही. जन्मली, जगली, प्रजोत्पादन केले. मेली ! हाच तुझा इतिहास ! तुझ्या शरीरात कणा कोठे नाहीच. त्यांच्या अभावी तुला स्वतःचा तोल दुसऱ्याच्या आधाराने सांभाळावा लागतो, ही स्त्रीजातीच्या 'लतिके'ची करुण कहाणी लेखिकेने अत्यंत हळुवारपणे शब्दांकित केली आहे. लेखिकेचा आशावाद मात्र स्पृहणीय आहे. नायकनायिका उगवत्या सूर्याच्या साक्षीने नव्या जगात प्रवेश करतात. "निधड्या छातीने पुढे सरू या, मधुर जीवनाचा आनंद लुटू या. अनेक विदीर्ण झालेल्या जीवांना थोडे सहाय्य करू या."

**फेरीवाला : सामाजिक परिस्थितीचे विदारक वर्णन**

दारिद्र्याने, बेकारीने पिचून गेलेल्या 'एका मध्यमवर्गीय पदवीधर तरुणाची ही शोकांतिका आहे. "निसर्गाने जे कुस्करलं, पायदळी दिलं. त्याला भूतकाळ तेवढा आहे, भविष्य नाही, आशा नाही, प्रकाशही नाही."

मानवाने संस्कृती निर्माण केली. दुर्बलाचं संरक्षण हा संस्कृतीचा मूलमंत्र आहे, पण हे संरक्षण कोणाला मिळत आहे ? इतकी सुखसाधनं निर्माण होताहेत, पण जनतेच्या परिस्थितीत का फरक पडत नाही, हा प्रश्न लेखिकेने समोर मांडला आहे.

अनंताला नोकरी मिळू शकली नाही. फेरीवाल्याचा धंदा–व्यवसाय जमला नाही. पदरी वैफल्य व निराशा आली. त्यामुळे व्यसनाधीनता. प्रेयसी असलेली विधवा 'शकुंतला' वेश्या झाली तरीही तिच्याशी तो, लग्न करतो. पण त्यातूनही उजाड, वैराण आयुष्यच नशिबी येते.

पन्नास वर्षापूर्वीच्या समाजजीवनातील सारी शल्ये लेखिकेने या कादंबरीत वर्णन केली आहेत. कौटुंबिक व्यवस्थेत विधवेचे जीणे किती लाचार असते याचा नमुना 'शकुंतला'. तिला परिस्थितीने लाचार होऊन एका मुसलमानाचा आश्रय घ्यावा लागला. तिच्या वेश्या जीवनाची कथा–शोकांतिका लेखिकेने बौद्धिक पातळीवरून रंगविली आहे. कादंबरीत वैचारिक संवाद, वर्णने विखुरलेली असून कामुकतेचे त्यात कुठे दर्शनही नाही. पण शरदबाबूंच्या बंगाली नायिकेचा प्रभाव आहे. साधी, सरळ व उच्च विचारसरणीची ही नायिका. 'नाना'चे पात्र घालून त्याकाळी स्वातंत्र्य आंदोलनात उडी घेणाऱ्या ध्येयवादी तरुणाचे जीवन कसे उदात्त होते हेही दाखविले आहे. अशा तऱ्हेने वेश्याजीवन, पतितोद्धार, पतिताविवाह, धर्मांतर-समस्या, दलित वस्तीची सुधारणा, दारिद्र्य निर्मूलनासाठी चाललेला जीवनसंघर्ष या साऱ्या तत्कालीन सामाजिक समस्यांचा विचार लेखिकेने या निमित्ताने केल्याचे दिसून येते.

**राजकीय कादंबऱ्या : ध्येयवादी तरुणतरुणींचे जग**

लेखिकेच्या 'आविष्कार' व 'धुके आणि दहीवर' या राजकीय कादंबऱ्या आहेत. स्वतः लेखिकेनी वाचनाची व विविध राजकीय प्रणालींचा तुलनात्मक अभ्यास करण्याची वृत्ती या कादंबऱ्यांमध्ये प्रकर्षाने दिसून येते. 'आविष्कार' ही साधारणतः सायमन कमिशनच्या बहिष्काराच्या काळाची कादंबरी. जनतेच्या जागृतीची प्रचिती येऊ लागली होती. नायक दशहतवादी, चळवळीतील कार्यप्रवण तरुण, ध्येयवादाने भारलेला ! कादंबरीभर क्रांतिकारकाच्या चळवळीचे वर्णन आहे.

"कि घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने । लब्ध प्रकाश इतिहास निसर्गमाने । जे दिव्य दाहक म्हणून असावयाचे । बुद्ध्याच वाण धरिले करि हे सतीचे ।"

त्या काळी क्रांतिकारक हातावर शीर बाळगूनच राजकारणात उडी घेत. अशाच एका तरुणाची ही प्रेमकथा ! नायकाची मैत्रीण वीणा मात्र दशहतवादी चळवळीचा त्याग करून कॉंग्रेसच्या असहकार आंदोलनात शिरली आहे. लेखिका प्रत्यक्षच राजकीय जीवनाच्या वातावरणात जगत असल्यामुळे क्रांतिकारी तरुण नायकाचे व त्याच्या मित्रवलयाचे जीवनक्रम व त्यासोबतच गांधी, असहकार आंदोलनातील–दारुबंदी पिकेटिंग, अस्पृश्यता चळवळ इत्यादीचे वर्णन अत्यंत जिवंत व हुबेहुब वाटते. ही कादंबरी लेखिकेच्या तरुणपणीच्या जीवनातील आठवणीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न आहे, यात संशय नाही क्रांतिकारक 'अजय'च्या कणखर निष्ठुर जीवनात अत्यंत हळुवारपणे, कोमल भावनांना हात घालून प्रेमाचा 'आविष्कार' घडविणारी इनाक्षी–यांचा प्रणय चळवळीच्या जीवनांतील

विविध घटनांमधून फुलत जातो. एकूण कादंबरीचा दर्जा उच्च असून वैचारिक आहे.

**'१९४२' चे मंतरलेले दिवस**

१९४२ च्या मंतरलेल्या राजकीय वातावरणात प्रसिद्ध झालेली त्यांची दुसरी कादंबरी आहे. 'धुके आणि दहीवर' त्या काळाची पार्श्वभूमी लक्षात येताच हे स्पष्ट होते की यात वेगवेगळ्या राजकीय प्रणालींचा पुरस्कार करणाऱ्या पात्रांद्वारे कथानकाची उभारणी झाली असून 'अखेर' या प्रकरणात लेखिका मनोगत स्पष्ट करते- 'राजकारण हा माझा विषय कधीच नव्हता. आजारी मनाला विरंगुळा म्हणून ही कहाणी लिहिली. १९३५ च्या मतदानालाही मी गेले नाही. वर्तमानपत्रे वाचण्याचा रोग मला विशेषसा कधीच नव्हता. जीवनाची ही सत्यकहाणी आहे. त्यात कुठला प्रवाह, कुठली गती! त्यातून लिहिण्याची आवड नाही, सवयही नाही' पदवी परिक्षा पास झालेली, मोकळ्या मध्यमवर्गीय कुटुंबात विचार व आचारस्वातंत्र्य लाभलेली प्रगल्भ बुद्धीची नायिका व महात्मा गांधींच्या चळवळीस जीवन समर्पित करणारा नायक यांचा वैचारिक प्रवास चित्रित करणारी ही कहाणी. नायिकेवरील प्रेमामुळे त्याच्यासोबत आश्रमपद्धतीने राहून समाजसेवा करू लागते. अस्पृश्यता, जातीभेद, दारिद्र्य, कुळांचे शोषण, कर्जात बुडालेला हीनदीन वर्ग यांच्या समस्यांना सामोरी जाते. वस्तीचे सर्व प्रश्न अहिंसामय मार्गाने सोडविण्याचे व्रत घेतलेल्या नायकाशी तिचे मतभेद होतात. अपयश, पराजय पचविताना गांधीजींच्या शिष्यांना अत्यंत मनस्ताप सोसावा लागत असे. नायिकेचा दुसरा भाऊ साम्यवादी दाखवून 'सत्याच्या प्रयोगाची' कशी कुचाळी केली जाई हेही दाखविले आहे. "तुमची लोकसेवा म्हणजे दहा वीस विहिरी बांधणे, एक दोन तळी व देवळे अस्पृश्यांना खुली करणे, चार दोन शाळा उघडणे" एवढीच! अशा प्रकारे गांधीप्रणित सत्याग्रह, अहिंसा, शांततामय संप, सत्याची बाजू धरण्याचा आग्रह या तत्त्वांचा अभ्यासपूर्ण उहापोह लेखिकेने केला. पण शेवटी सत्य-अहिंसेची तत्त्वे अव्यावहारिक, अशक्य आहेत, किंवा त्यांच्या पुरस्कर्त्यांची दृष्टी कोती व विचार अपुरे असतात म्हणून नायिकेच्या पदरी निराशा येते. राजकीय विषयांची तात्त्विक चर्चा करताना मतभेदाचे मुद्दे वारंवार उपस्थित होत असतात. म्हणून बौद्धिक दृष्ट्या कादंबरीचा दर्जा तत्कालीन राजकीय कादंबऱ्यांशी मिळता-जुळता आहे. त्यावेळी स्त्री लेखिका बोटावर मोजण्या इतक्याच होत्या. त्यातून राजकीय विषयावर स्वतंत्र कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखिका तर फारच विरळा होत्या, म्हणून ही कादंबरी अधिक लक्षात राहते.

समाज जीवन व राजकारण यावर प्रकाश पाडणारी स्वतंत्र कादंबरी असे वर्णन केलेली व १९४१ साली प्रसिद्ध झालेली 'माळरानात' ही कादंबरी एका सुखवस्तु कुटुंबातील दोन भावांची कथा. एक फडक्यांच्या नायकासारखा वैभवाकांक्षी, सुखासीन आयुष्य जगू पाहणारा आणि दुसरा शेतकऱ्यांची संघटना बांधणारा, त्यांच्या सुखासाठी स्वतःच्या संसाराचे सुख वाऱ्यावर सोडणारा समाजवादी. या दोन वृत्तींच्या चित्रणातून त्यावेळचे सामाजिक जीवन श्रीमंती गरिबीच्या विषमतेने कसे होरपळले होते, स्त्रीची भूमिका कशी गौण होती व एकूण सामाजिक जीवनाविषयी शिकलेल्या माणसांची मनेही कशी उदासीन होती, हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

१९४७ साली प्रसिद्ध झालेली 'दीपस्तंभ' ही आणखी एक समस्याप्रधान कादंबरी आहे. "अण्णाने भंग्यांसाठी संघ काढला होता. भंग्यांची परिस्थिती अतिशय वाईट होती. पगार अपुरे, काम गलिच्छ, कामाचे तास फार. बायकांना आठ रुपये व पुरुषांना १० ते १५ रु. महिना मिळे." म्हणून भंग्यांचा संप घडून आला. जीवनाच्या निर्दयतेला ग्रासून बहुजन समाज जेव्हा रूढीच्या भितीला टकरा देतो, जुलमाच्या श्रृंखला तोडून टाकण्यास सज्ज होतो तेव्हा क्रांती घडून येते. या सुंदर पण भीषण समाज क्रान्तीची स्वप्ने बेकारीने जर्जर झालेल्या तरुण पिढीला पडू लागली. त्यावेळची ही परिस्थिती! नायिका एका श्रीमंत पोलीस अधिकाऱ्याची मुलगी. एका ध्येयवादी पण गरीब तरुणाचा संसार सजविण्यासाठी, सुखाचा, वैभवाचा त्याग करते. गीताबाईंच्या कादंबरीचे नायक नायिका आव्हान स्वीकारणाऱ्या आहेत. दारिद्र्याने वजलेल्या, अपुरेपणाने खुजे झालेल्या जीवांचे

आक्रंदन पाहून त्यांच्या सहाय्याला धावून जाणारे आहेत. हीनदीन जीवनाला टवटवीतपणा यावा म्हणून झटणारे आहेत. 'दारिद्र्य हे कोनाड्या-सारखे आहे. इथे उंची-रुंदी वाढण्याचा प्रश्नच नाही.

सामाजिक बांधिलकी हा त्यांच्या पात्राचा स्थायीभाव आहे पण त्यातही साहित्यिक मूल्ये जोपासण्याचा, मानवी मनोव्यापाराचे गुंफलेले पदर हळूवारपणे सोडविण्याचा गुण आहे. 'आपले वैरी' ही एक कादंबरी १९४१ साली प्रकाशित झाली. त्यात शिक्षकांची संघटना बांधणाऱ्या, त्यांना प्रतिष्ठा मिळावी म्हणून झटणाऱ्या ध्येयवेड्या शिक्षकाचा जीवन संघर्ष अत्यंत प्रभावीपणे चित्रित केला आहे. त्या काळात होणाऱ्या हिंदुमुसलमानाच्या दंग्याचे वर्णन केले आहे. स्त्रियांच्या कोत्या वृत्तीचे व अनुदारपणे वागणूक देण्याच्या स्वभावांचे मार्मिक वर्णन केले आहे. अत्यंत रुक्ष, काळवंडलेल्या जीवनातही त्यांना रुपेरी किनार दिसते. क्रांतीचे वाहन भूक आहे. पण भुकेवर वसून आलेली क्रांती प्रगल्भ विचारांच्या व कृतीच्या सिंहासनावर न वसविली तर ती निर्जीव होऊन तिचे कलेवर— होते. भूक समाजात धिंगाणा घालते. क्रांतीचे वाहन तयार आहे पण तिची प्रतिष्ठापना आपण करणार कुठे ? उच्च आदर्शाचे, स्वच्छ विचारांचे, अति-मानवी कल्पनांचे व असामान्य धडाडीचे द्रष्टे आपल्या समाजाला निर्माण करता येत नाहीत. मग या क्रांतीची पूजा बांधायची कशी ? पन्नास वर्षांपूर्वी शिक्षकाच्या भूमिकेत प्रतिष्ठित, क्रांतिकारी बदल घडून यावा म्हणून अहोरात्र धडपड करणारा त्यांचा नायक आर्थिक कोंडीत सापडला असला तरी त्याचा जीवनाशय व्यापक स्वरूपाचा होता. लेखिकेच्या कल्पकतेचे एक उत्तम उदाहरण या कादंबरीत आढळते. विज्ञान त्यांच्या आवडीचा विषय होता.

सगळीकडे संप होतात. मजूर तर नेहमीच संप करतात पण पोस्टमन, शाळामास्तर, नव्हे कारकून सुद्धा संपावर गेले. मग ढगांनीच का संप करू नये ? त्यांच्या मागण्यांची यादी तर हवी तेवढी मोठी होईल.

(१) सूर्याने एवढे भरमसाठ तापू नये, आमचे अंग भाजते.

(२) सागराने आपल्या मेघ सैनिकांना over-seas पाठवू नये.

(३) वाऱ्याने आमच्याबरोबर इतकी धिंगा-मस्ती करू नये.

(४) पर्वताच्या डोक्यावर आपटून आमचा चुराडा होतो, तरी पर्वतांनी डोकी जरा नमवावीत.

आमच्या मागण्या पूर्ण न झाल्यास आम्ही आपले काम पूर्णपणे थांबवू. सामान्य जनतेचा आणि क्रांतीचा संबंध किती जवळचा असू शकतो ! सामान्यांच्या जीवनातच देशाचे हित समावलेले आहे, हा विचार गीता साने यांच्या साहित्याने वारं-वार पटविण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच पन्नास वर्षानंतरही त्यांचे साहित्य शिळे वाटत नाही. कारण लोकशाहीचा विधाता सामान्य माणूस हा आजही विविध विचारप्रवाहांच्या लाटे-सरशी वाहत जात आहे. त्याचे स्वतःचे अधिष्ठान काय असावे हे आजही त्यास समजले नाही.

**चंबळची दस्युभूमी : चिंतनशील साहित्य.**

चंबळची दस्युभूमी हे १९६५ साली प्रकाशित झालेले पुस्तक लेखिकेच्या चिंतनशील मनाचा, गाढ अध्ययनशीलतेचा आणि चिकाटीने एखाद्या प्रश्नाचा उलगडा होईपर्यंत पाठपुरावा करण्याच्या वृत्तीचा उत्कृष्ट नमुना आहे. सतत दोन वर्षे शोध घेऊन इतिहासाचा, विज्ञानाचा आणि वस्तुस्थितीचा मागोवा घेत केलेला हा प्रवास आहे 'क्रिमीनॉलॉजी' या शब्दाला योग्य मराठी पर्यायी शब्द अजूनही सापडत नाही. 'अपराधविज्ञान' हा शब्द फार बोजड वाटतो. लेखिकेने विदेशातील संदर्भग्रंथांचा आधार घेऊन डाकूग्रस्त जीवन असलेल्या चंबळखोऱ्यात भ्रमन्ती करून हे पुस्तक लिहिले आहे. त्या म्हणतात, "मी प्रथम दस्युभूमीत गेले तेव्हा मला फारच त्रोटक माहिती होती. दोन वर्षाच्या वाचन-मननानंतर त्या समाजाचे आगळे चित्र माझ्या नजरेसमोर साकारू लागले. पण कल्पनाचित्रे नेहमीच अपुरी पडतात. कारण त्यांना लांबी रुंदीची दोनच परिमाणे आपण वापरतो, खोलीचे तिसरे परिमाण अनुभवातून निर्माण करावे लागते." प्रसिद्ध डाकू लाखनसिंह किंवा मानसिंग यांचेच गाव नमुना पाहणीसाठी घेण्याची त्यांची जिद्द

होती. पण माहिती अपुरी असल्याने त्यांनी दुसरे गाव निवडले व आकडेवारी घेतली. दस्यूंच्या समस्येचा विचार करताना दारिद्र्य, पोलीसांचा जुलूम, संतापीवृत्ती व हातातील बंदुका, प्रदेशाची दुर्गमता, कायद्याच्या उणिवा आणि डाकूंना मिळणारी प्रतिष्ठा हे सर्व मुद्दे लक्षात घेऊनच त्यांनी सारासार विवेचन केले. दस्यूंची समस्या व दस्युभूमीचे दर्शन ही पहिली दोन तीन प्रकरणे अभ्यासपूर्ण माहितीने भरलेली असूनही सुरस कथेसारखी अत्यंत वाचनीय झालेली आहेत. दस्युभूमीच्या ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक व भौगोलिक संदर्भात दस्यूंचे रंग त्यांनी अत्यंत समर्पक शब्दात पण अगदी यथार्थतेने रंगविले आहेत.

"चंबळचा हा अनभिषिक्त राजा रुधिरप्रिय आहे, कारण रागाच्या मुसळधार वर्षावात तो जन्माला आला, पोसला व त्याने पुरुषार्थ गाजविला. तो तोंड झाकीत नाही की रंग फाशीत नाही. त्याचे व्यक्तिमत्व रुबाबदार आहे. डोळे पाणीदार व सावध आहेत. तो क्रूर आहे. पण माणसातून उठलेला नाही. त्याला संताप येतो तसा स्नेहही वाटतो. त्याला मुक्या जनावरांचेही प्रेम आहे. या सर्व गोष्टी त्याच्याकडे परंपरेने आलेल्या आहेत. मर्यादा पुरुषोत्तम राम त्याला वंद्य व अनुकरणीय वाटतो. तो धार्मिक आहे. विसाव्या शतकातल्या या डॉन क्विझोटला स्वतःच्या प्राणांची पर्वा नाही व इतरांच्या प्राणाची किंमत नाही" अशा या दस्यूच्या भावविश्वाशी आपण कुठेही संपर्क साधू शकत नाही. पोलीसच्या गोळीशिवाय त्यावर कुठलीही उपाययोजना करण्यात आली नव्हती. म्हणून विद्वान, बुद्धिमान, तापस व सामाजिक समतेचे उपासक विनोबा भावे यांनी हे आव्हान स्वीकारले. त्याचाही लेखिकेने खोलवर अभ्यास केला. विनोबांच्या तीक्ष्ण दृष्टीला 'समस्या डाकूंची नाही. डाकूगिरीची आहे,' हा प्रत्यय आला. रक्ताचा थेंबही न सांडता दलितांच्या बेड्या तोडण्याची तळमळ पूर्ण करण्यासाठी त्यांच्या भूदानाचा जन्म झाला. जनतेच्या मागण्या रक्तपातावाचून पूर्ण करण्याचा मार्ग सापडताच तेलंगणाचे भहाकुंड आपोआप विझले. पण सामाजिक क्रांतीच्या संदर्भात आचार्यांची चंबळमधील पदयात्रा फुकट गेली असे त्यांना वाटते. परंतु त्यांनी डाकूगिरीच्या क्षेत्रात निर्माण होणारे प्रश्न व्यावहारिक पातळीवरून सोडविण्यासाठी शांती समितीची स्थापना करून ते कार्य सुरू केले, हे काही कमी महत्त्वाचे नाही, असे त्या म्हणतात.

'मुलुखगिरी' हा क्षत्रियांना धर्माने, समाजाने, परंपरेने दिलेला अधिकार आहे. तो भारतीय घटनेने अचानक कां काढून घ्यावा, नष्ट व्हावा ही डाकूंची समस्या आहे. आचार्य विनोबांच्या पराभवाची जात ठरविताना त्या विवेचन करतात की सामूहिक हृदय परिवर्तन करण्याची शक्ती कोणाला असेल तर ती एकट्या धार्मिक विचारालाच आहे. अशी दोन प्रचंड परिवर्तने मानवी इतिहासात बुद्ध व जीझस यांनी करून दाखविली आहेत. अशा-तऱ्हेने दस्युभूमींच्या समस्यांचे आव्हान आपल्या मूलभूत श्रद्धांना आहे. लोकशाहीने जनतेला संरक्षणाची हमी दिली आहे, त्याला आहे. लेखिकेने केलेला सामाजिक समस्यांचा अभ्यास, चिंतन आणि ती मांडण्याची अभ्यासपूर्ण पद्धती यामुळे समाजशास्त्राच्या कुठल्याही अभ्यासकाला या साहित्याबद्दल आदर वाटल्याखेरीज राहत नाही. लेखिकेची दृष्टी सदैव आशावादी आहे. दस्युसमस्या एकच समस्या नसून इतर समस्यांएवढी भयानकही नाही, औद्योगिकरणाच्या वाटचालीत नवी घडी बसेल, त्यात ही प्रतिक्रांतीची ठिणगी आपोआप विझून जाण्याचाही संभव आहे. पण नरभक्षक आपल्या मरणाने मरेल अशी वाट पहाण्यात माणुसकीचा व पुरुषार्थाचा अभाव मनाला खटकणारा आहे, हे त्यांचे भाष्य एका प्रज्ञावंत विचारसरणीचाच पुरावा आहे

मराठी साहित्यांतील समस्याप्रधान तरीही सामान्य वाचकांना आकर्षून घेणारे हे पुस्तक फार मोलाचे ठरले आहे, कारण मराठी साहित्यात अशी विचारप्रवर्तक पुस्तके बोटांने मोजण्याइतपतच आहेत. माणूसकीच्या निष्ठा व जाणिवा खोलवर जपलेल्या त्यांच्या साहित्यिक लेखणीने शेवट करताना लिहिले, "अनेक वर्षानंतर जेव्हा चंबळमध्ये एखादी वृद्ध आजी आपल्या नातवाला दुलईत बसून गोष्ट सांगेल तेव्हा म्हणेल, "बाबांनो, आता डाकू राहिले नाहीत बरं का ! आणि तेव्हा तिच्या

सुरकुतलेल्या चेहेऱ्यावर जे समाधान विलसत असेल ते टिपण्यासाठी मी तिच्या घरातील विद्युत प्रकाशात डायरी लिहिताना क्षणभर थांबीन आणि तिचा चेहरा न्याहाळीन–' त्यांच्या जीवनातील हा आशावाद, उत्साह व भविष्याला कवेत घेण्याचे साहस आज वयाच्या ७८ व्या वर्षीही कायम आहे हे पाहून त्याच्याबद्दल वाटणारा आदर द्विगुणित झाल्यावाचून राहत नाही.


**भारतीय स्त्रीजीवनाचे अंतर्मुख करणारे दर्शन**

अशा या प्रतिभाशाली स्त्रीच्या साहित्याची व्यापकता अखिल भारतीय स्त्रीजीवनाच्या सर्व थरातील स्त्रियांच्या समस्यांना स्पर्शून गेली आहे. तरुणवयातही हौसमौज, नटणेमुरडणे त्यांच्या व्यक्तित्वाला कधीच परवडले नाही. उलट समस्यांना बेधडक सामोरे जाऊन आव्हान पेलण्याची वृत्ती आणि अविरत संघर्षाला तोंड देण्याची तयारी, याचीच त्यांनी लहाणपनापासून पूजा बांधली आहे. देशाकरिता स्वार्थत्याग करून सुखाची होळी करणाऱ्या आदर्श स्वातंत्र्य सैनिकांच्या पिढीच्या त्या प्रतिनिधी आहेत. पक्षबंधनात न अडकता निरपेक्ष चिंतन, मनन आणि प्रत्यक्ष कृती याद्वारे समाजसेवा करणाऱ्या त्या 'यती' आहेत. चैन व सुखलोलुपता यांचा विचारही न करता ध्येयवादाच्या व त्यागाच्या मुशीतून गीता साने यांचे बंडखोर व्यक्तिमत्व साकारले आहे 'माझ्या बंडखोर विचारांना मी कधीच मागे खेचले नाही. याचे सारे श्रेय माझ्या वडिलांना आहे' असे त्या अत्यंत कृतज्ञतापूर्वक सांगतात. त्यांची समवयस्क मंडळी व आचार्य दादा धर्माधिकारी यासारखे विचारवंतही म्हणतात, "महाराष्ट्रातील क्रांतिकारी स्त्रियांचा इतिहास लिहिताना गीता साने व अंबू वहेरे जोगळेकर यांचा उल्लेख केल्याशिवाय पुढे जाताच येणार नाही." अशातऱ्हेने अर्धशतकापूर्वीच स्त्रीमुक्तीची निष्ठावान, जागरूक, जिज्ञासु व सुबुद्ध स्त्रियांची करून 'उंबरठ्या' बाहेर पडणाऱ्या नायिकांचा आदर्श साहित्याद्वारे समाजापुढे ठेवून, अन्यायाविरुद्ध लढा उभारणाऱ्या गीता साने यांचा एकच संदेश आहे. "उठा जागृत व्हा. लोकशाहीच्या रथाचे जबाबदार नागरिक बना. स्वतःवरील अन्याय दूर करण्याचे सामर्थ्य अंगी आणाल तरच दुसऱ्यावरील अन्यायाचे परिमार्जन करू शकाल. म्हणून बांधिलकीच्या पुढे जाऊन स्त्रियांच्या दुःखात 'सामीलकी' दाखवा स्त्रीमुक्तीची यात्रा चालू द्या." गीता साने यांच्या सारख्या विरादरी फळो फुलो हीच भगवंताच्या चरणी प्रार्थना !

△ △ △



अनुक्रमणिका



युगवाणी, सप्टेंबर/ऑक्टोबर
१९८४ (दिवाळी विशेषांक)
मूल्य आठ रुपये

YUGWANI : Regd. No. NGP 2

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर,
सरचिटणीस विदर्भ साहित्य
संघ, सीताबर्डी, नागपूर–१२
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी,
नारायण मुद्रणालय, धनतोली,
नागपूर–१२
मुखपृष्ठ मुद्रण : मधुकर वैद्य, मधुकर
आर्ट्स, धन्तोली, नागपूर–१२

अनुक्रमणिका